मंगळवार, ३१ जानेवारी २०२३

⊙ किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१५९

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● TUESDAY 31 JANUARY 2023

adhunikkesari.com Adhunik Kesari

● YEAR-02 ● ISSUE-159 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-14 ● PRICE-5


# लोकांनी आनंदाश्रूंनी स्वागत केले

## राहुल गांधी : भारत जोडो यात्रेचा समारोप

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : मी भारत जोडो यात्रा सुरु केली तेव्हा मला सांगण्यात आले होते की तुम्ही शेवटचे चार दिवस म्हणजेच जम्मू काश्मीरमध्ये जाल तेव्हा कारने फिरा. पायी फिरू नका. कारण तुमच्यावर ग्रेनेड हल्ला होऊ शकतो. मात्र काश्मीरमध्ये ग्रेनेड नाही मिळाला. उलट लोकांनी आनंदाश्रूंनी माझे स्वागत केले. काश्मीरवासीयांचे प्रेम मला मिळाले. मी असाही विचार केला की या निमित्ताने आपण विरोधकांना माझा पांढरा टीशर्ट लाल करण्याची संधी द्यावी. ती मी दिली होती. मात्र असे काहीही घडले नाही, असे राहुल गांधी यांनी म्हटले आहे. सोमवारी काश्मीरमध्ये भारत जोडो यात्रेच्या समारोपात राहुल गांधी यांनी हे वक्तव्य केले.**



राहुल गांधी पुढे म्हणाले की, मला महात्मा गांधींची शिकवण आहे की, जगायचे तर न घाबरता जगायचे आहे. मी चार दिवस दिले होते माझा टी शर्ट रंगवायाचा असेल तर लाल रंगात रंगवा. मला जम्मूच्या लोकांनी ग्रेनेड हल्ला नाही दिला तर मला भरभरून प्रेम दिले. मी आता जम्मू काश्मीरच्या लोकांना सांगू इच्छितो की तुमचे दुःख दूर करण्यासाठी मी प्रयत्न करेन.

मी हिंसा पाहिली आहे, सहन केली आहे. ज्याने हे पाहिलेले नाही त्यांना हे कळणार नाही. मोदी, अमित शाह, आरएसएस चे लोक यांनी हिंसा पाहिलेली नाही. ते घाबरतात. मी चार दिवस पायी चाललो मात्र मी तुम्हाला खात्रीने सांगतो की भाजपाचा एकही नेता अशा प्रकारे चालू शकत नाही. कारण त्यांना भीती वाटते.

आज तुम्ही बर्फात उभे आहात पण तुमच्यापैकी कुणालाही थंडी वाजत नाहीये. सगळे पावसात उभे होते पण कुणी भिजले नाही. थंडी असूनही तुम्हाला थंडी वाजत नाहीये कारण देशाची शक्ती तुमच्यासोबत आहे असेही राहुल गांधी यांनी म्हटले आहे. प्रियंकाचे भाषण ऐकून माझ्या डोळ्यात पाणी आले. कारण मी कन्याकुमारी ते काश्मीर अशी भारत जोडो यात्रा काढली होती. संपूर्ण देशात आम्ही पायी चाललो.

खरे सांगायचे तर तुम्हाला अजब वाटेल पण मी गेली अनेक वर्षे दररोज आठ दहा किमी धावतो. देश आपल्याला कन्याकुमारी ते काश्मीरपर्यंत चालणे सोपे असेल असे वाटले होते. मला वाटले होते की हे फार कठीण नाही. मी बराचसा व्यायाम करत होतो त्यामुळे थोडा गर्व मला झाला होता. तसे होणे अगदी स्वाभाविकही आहे. पण नंतर गोष्टी बदलल्या. मी जेव्हा लहान होतो तेव्हा मी फुटबॉल खेळत असे. एकदा कॉलेजमध्ये फुटबॉल खेळत असताना मला दुखापत झाली होती. मी ही गोष्ट विसरून गेलो होतो कारण नंतर गुडघा दुखणे बंद झाले होते. मात्र कन्याकुमारीपासून चालू लागलो त्यानंतर पाच दिवसांनी गुडघा ठणकू लागला. माझा सगळा गर्व त्याच क्षणी संपला असेही राहुल गांधी यांनी म्हटले आहे. मला जी बाब सोपी वाटली होती ती माझ्यासाठी कठीण झाली.

चर्चेतली बातमी

## मंत्र्यांवर गोळी झाडणारा पोलिस मानसिक रुग्ण

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** ओडिशा आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री नबकिशोर दास (६०) यांच्यावर सहायक पोलिस उपनिरीक्षक गोपालकृष्ण दास याने गोळ्या झाडल्या. ज्यामध्ये नबकिशोर दास यांचा मृत्यू झाला. आरोपी गोपाल दास हा मानसिक रुग्ण असल्याचा दावा आता त्याच्या पत्नीने केला आहे. गोपालकृष्ण दास बायपोलर डिसऑर्डर या आजाराने ग्रस्त असून मागच्या आठ वर्षांपासून तो उपचार घेत असल्याचेही पत्नीने सांगितले. यासोबतच ब्रह्मपुर येथील एमकेसीजी मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटलचे मनोचिकित्सा विभागाचे प्रमुख डॉ. चंद्रशेखर त्रिपाठी यांनी देखील गोपालकृष्ण दास मनोरुग्ण होता, असे सांगितले आहे. डॉ. त्रिपाठी पुढे म्हणाले की, दास दहावर्षांपूर्वी माझ्याकडे उपचार घेण्यासाठी आला होता. त्याला खूप लवकर राग यायचा. त्याच्यावर मी उपचार करत होतो. मात्र तो औषधे वेळेवर घेत होता की नाही याबाबत मला खात्री नाही. जर औषधे वेळेवर घेतले नाहीत, तर हा आजार पुन्हा उसळू शकतो. गोपालकृष्ण अखेरचा माझ्याकडे वर्षभरापूर्वी आला होता. त्यानंतर तो भेटायला आला नाही. आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ सांगतात की, बायपोलर डिसऑर्डरमध्ये रुग्णाच्या वर्तनात अचानक बदल होतात. कधी रुग्ण अतिशय आनंदी असतो तर कधी खूप तणावात जातो. या आजारामध्ये औषधे आणि समुपदेशन दोन्ही खूप गरजेचे असते.

## भाजपासोबत हात मिळवण्याऐवजी मरण पत्करू

आधुनिक केसरी न्यूज

**पटना :** आम्ही भाजपासोबत हात मिळवण्याऐवजी मरण पत्करू. २०१७ मध्ये आम्ही एनडीएत गेलो ही आमची मोठी चूक होती, असे म्हणत बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी भारतीय जनता पार्टीसोबत युतीबाबतच्या सर्व शक्यता सोमवारी फेटाळून लावल्या.

नितीश कुमार यांनी भाजपाला आठवण करून दिली की, दोन पक्षांची युती होती तेव्हा भाजपाला मुस्लीम मतदारांसह




जनता दलाचे सर्व समर्थक मतदान करायचे. भाजपाच्या हिंदुत्वाच्या विचारधारेमुळे जे लोक भाजपासोबत नव्हते त्यांची मते जनता दलामुळे भाजपाला मिळत होती. भारतीय जनता पक्षाने दावा केला आहे की, पुढच्या वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत त्यांचा पक्ष बिहारमध्ये ४० पैकी ३६ जागा जिंकेल. नितीश कुमार यांनी भाजपाच्या या दाव्याची खिल्ली उडवली. कुमार म्हणाले की, उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव आणि त्यांचे वडील लालू प्रसाद यादव यांच्या विरोधात भ्रष्टाचाराच्या 'निराधार' आरोपांनंतर २०१७ मध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीसोबत हातमिळवणी करणे ही आमची चूक होती. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांचा पक्ष जनदा दल युनायटेडने (जदयू) भारतीय जनता पक्षासोबत युती तोडून राष्ट्रीय जनता दल (राजद) आणि काँग्रेससोबत सरकार स्थापन केले आहे.

## डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्येचा सीबीआय तपास पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणाचा तापस पूर्ण झाल्याची माहिती



सीबीआयच्यावतीने  हायकोर्टात देण्यात आली आहे. या प्रकरणी केंद्रीय तपासयंत्रणेने नव्याने सुरू केलेला तपासही पूर्ण झाला असून नव्या तपासअधिकाऱ्यांनी तसा अहवाल दिल्लीतील मुख्यालयात पाठवला आहे. या अहवालावर येत्या तीन आठवड्यांत सीबीआय आपली भूमिका स्पष्ट करेल असे एएसजी अनिल सिंह यांनी स्पष्ट केले. याची नोंद घेत याप्रकरणी आरोपींनी दाखल केलेल्या याचिकेवरील सुनावणी तीन आठवड्यांकरता तहकूब केली. याप्रकरणी आरोपपत्र दाखल होऊन पुणे सत्र न्यायालयात खटलाही सुरू झाला आहे. ज्यात 32 पैकी 15 साक्षीदारांची साक्षही नोंदवून पूर्ण झालीय, अशी माहिती अनिल सिंह यांनी कोर्टाला दिली. मात्र यासंदर्भात हायकोर्टातही याचिका प्रलंबित असल्याने त्याचा खटल्यावर थेट परिणाम होतोय. तसेच कायद्यानुसार आता मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणावर देखरेख ठेवण्याची गरज नाही, अशी मागणी करत या प्रकरणातील दोन आरोपींनी हायकोर्टात याचिका दाखल केली आहे. न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती प्रकाश नाईक यांच्या खंडपीठासमोर याप्रकरणी सोमवारी सुनावणी झाली. त्यावेळी कायद्यानुसार, आरोपपत्र दाखल केल्यानंतर उच्च न्यायालयाने तपासावर आता देखरेख ठेवू नये. तेव्हा न्यायालयानंही या प्रकरणाच्या तपासावर आता देखरेख ठेवू नये, अशी मागणी आरोपी शरद कळसकर आणि विक्रम भावे यांच्यातर्फे न्यायालयाकडे करण्यात आली आहे.

## महाराष्ट्राच्या 'शक्तिपीठ आणि नारीशक्ती'चा द्वितीय क्रमांक

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भारताच्या ७४ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्लीत कर्तव्यपथावरील पथसंचलनात महाराष्ट्राच्या चित्ररथाने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले होते. महाराष्ट्रातील प्रसिद्ध साडेतीन शक्तीपीठे आणि नारीशक्तीया संकल्पनेवर आधारीत चित्ररथ सादर करण्यात आला होता. या चित्ररथाला देशभरातून दुसऱ्या क्रमाकांचे पारितोषिक मिळाले आहे. तर उत्तराखंड राज्याचा पहिला तर उत्तर प्रदेशचा तिसरा क्रमांक आला आहे.

प्रजासत्ताक दिनानिमित्त कर्तव्यपथावर महाराष्ट्राने नारी शक्ती व साडे तीन शक्तीपिठांचा महिमा चित्ररथाच्या माध्यमातून दाखविला होता. महाराष्ट्राने यापूर्वी ४० वेळा राजधानी दिल्लीत मुख्य पथसंचलनात चित्ररथ सादर केलेला आहे.



स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी वर्षानिमित्त यावेळी "साडेतीन शक्तीपीठे आणि नारीशक्ती" ही संकल्पना सादर करण्यात आली होती. महाराष्ट्र हा संत, देवदेवतांची भूमी आहे. महाराष्ट्रात ज्याप्रकारे अनेक समाजसुधारक होऊन गेली, तशीच महाराष्ट्राला मोठी धार्मिक परंपरा राहिली आहे. कोल्हापूरची अंबाबाई, तुळजापूरची तुळजाभवानी, माहूरची रेणुकामाता हे तीन पूर्ण शक्तीपीठे आहेत. तर वणीची सप्तश्रृंगी हे अर्धे शक्तिपीठ आहे. या शक्तिपीठांचे दर्शन दिल्लीतील पथसंलनात सर्वांना घेता आले होते.

# ग्रामसुरक्षा यंत्रणेच्या हेल्पलाइनमुळे वाचला सहा एकर ऊस

## ग्राम सुरक्षा यंत्रणेच्या वापरामुळे तातडीने मदत मिळणे शक्य

आधुनिक केसरी न्यूज


जयप्रकाश बागडे

बालम टाकळी : शेवगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीतील बालमटाकळी येथील सुनीता मोहन शिंदे आणि जमुनाबाई देवीलाल परदेशी यांच्या शेतातील ऊसाला दुपारी दोनच्या सुमारास अचानकपणे आग लागल्याने येथील तलाठी बाबासाहेब अंधारे यांनी ग्राम सुरक्षा यंत्रणेच्या हेल्पलाइन नंबर वरून ही माहिती संपूर्ण गावाला दिल्यामुळे आग विझवण्यासाठी ग्रामस्थ धावले. यामुळे सहा एकर ऊस वाचवण्यात ग्रामस्थांना यश आले. शुक्रवार दिनांक 28 जानेवारी रोजी दुपारी बालमटाकळी येथील सुनिता मोहन शिंदे व जमुनाबाई देवीलाल परदेशी यांच्या सहा एकर ऊसाला अचानकपणे आग लागली होती. सदर आग विझवण्यासाठी आसपास कोणीही नव्हते. सर्व ऊस हा आगीच्या भक्षस्थानी जाण्याआधी याची माहिती तलाठी भाऊसाहेब बाबासाहेब अंधारे यांना मिळाल्यावर त्यांनी लगेच ग्रामसुरक्षा यंत्रणेच्या हेल्पलाइन 18002703600 नंबरवरून ही माहिती संपूर्ण गावाला कळवली. काही वेळातच तेथे गावकरी मदतीसाठी धावले व ऊसाला लागलेली आग ग्रामस्थांच्या मदतीने विझवण्यात यश आले. सहा एकर ऊस वाचला असेल तर तो फक्त ग्राम सुरक्षा यंत्रणेच्या माध्यमातून लोकांना एका वेळी फोन कॉल



गेल्याने लोक आग लागली तिकडे धावले आणि सहा एकर ऊस यानिमित्ताने वाचला असल्याचे शेतकरी सुनिता मोहन शिंदे व जमुनाबाई देवीलाल परदेशी यांनी या यंत्रणेला धन्यवाद दिले.

आपल्या पोलीस स्टेशनच्या हद्दीतील सर्वच गावात ग्राम सुरक्षा यंत्रणा कार्यरत करण्यात आली असून चोरी दरोड्या सारख्या घटना, महिलांवरील अत्याचाराच्या घटना, लहान मुले  हरवले. वाहन चोरी, गंभीर अपघात, वन्य प्राण्यांच्या हल्ल्या संदर्भातील घटना, जळीताच्या व आगीच्या घटना व इतरही अनेक घटना ग्राम सुरक्षा यंत्रणेच्या वापरामुळे तातडीने मदत मिळणे, दुर्घटनांना आळा घालण्यासाठी प्रभावीपणे शक्य होत आहे. आपल्या पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व नागरिकांनी ग्रामसुरक्षा यंत्रणेचा संकटाच्यावेळी प्रभावी वापर करावा व पोलीस यंत्रणेस या निमित्ताने सहकार्य करुन आपले संरक्षण या यंत्रणेचा वापर करून आपणच करावे, असेही आवाहन ग्राम सुरक्षा यंत्रणेचे विभागीय अधिकारी गणेश लोकरे यांनी केले आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी

स्वामी विवेकानंदाना उणेपुरे ३९ वर्षांचे आयुष्य लाभले होते, पण एवढ्या अल्प आयुष्यात त्यांनी जे प्रचंड कार्य केले ते सामान्य व्यक्तीला दोन जन्म घेतले तरी करणे कठीण आहे. वेदांचा आणि भारतीय संस्कृतीचा परिचय त्यांनी जगाला तर करून दिलाच पण भारतीयांनाही तो सोप्या भाषेत नव्याने करून दिला. त्यांचे तेजस्वी विचार ऐकून शिकागो येथील धर्मपरिषदेत सर्वच पाश्चात्य धर्मप्रसारक अक्षरशः स्तिमित झाले. त्यांनी जेव्हा सांगितले की सर्व धर्मांचे सार एकच आहे. कोणताही धर्म श्रेष्ठ नाही. असे सहज, सोपे आणि सुंदर विचार धर्माबद्दल यापूर्वी कोणी व्यक्त केले नव्हते. जो तो आपलाच धर्म कसा श्रेष्ठ आहे हेच सांगत होता. म्हणून स्वामीजींचे विचार सगळ्यांनाच आकर्षित करून घेणारे ठरले. ' न्युयॉर्क क्रिटीक ' या वर्तमानपत्राने म्हटले की, ' स्वामीजी दैवी वक्तृत्वाचे धनी तर आहेतच, परंतु त्यांचे धीरगंभीर उद्गार देखील त्यांच्या काषाय वस्त्रात शोभून दिसणाऱ्या तेजस्वी मुखमंडलाहून काही कमी आकर्षक नाहीत.' ज्या काळात आजच्या इतकी वाहतुकीची साधने नव्हती अशा काळात स्वामी विवेकानंदांनी संपूर्ण भारत भ्रमण केले. जग तर त्यांनी पहिलेच होते. पण भारतातील लोकांची स्थिती नजरेखालून घातली. त्यांनी त्या काळात शिक्षणाबद्दल जे विचार मांडले ते आजही तितकेच उपयुक्त आहेत. त्यांची उपयोगिता काळ बदलला तरी तसूभरही कमी झालेली नाही. परदेशात जाण्याआधी स्वामीजी भारत भ्रमण करीत असताना १८९२ च्या सुमारास बेळगावात श्री हरिपद मिश्र यांच्याकडे उतरले होते. त्यावेळचा एक प्रसंग श्री हरिपद मिश्र यांनी सांगितला आहे. तो त्यांच्याच शब्दात, "एक दिवस बोलण्याच्या भरात स्वामीजींनी ' पिकविक पेपर्स ' या कादंबरीतील दोनतीन पाने पाठ म्हणून दाखवली. मी ती कादंबरी अनेकदा वाचली असल्यामुळे स्वामीजींनी म्हटलेला भाग कुठला आहे हे तेव्हाच माझ्या लक्षात आले. स्वामीजींचे ते पाठांतर ऐकून मला खूपच आश्चर्य वाटले. संन्यासी असूनही सामाजिक कादंबरीतला भाग यांना कसा पाठ झाला असावा ? त्यांनी ती कादंबरी पूर्वी बहुधा अनेकदा वाचली असावी असे मला वाटले. त्यांनी ते पुस्तक किती वेळा वाचले असे मी त्यांना विचारल्यावर ते म्हणाले, ' दोनदा. एकदा शाळेत असताना आणि पाचसहा महिन्यापूर्वी आणखी एकदा. ' त्यांचे उत्तर ऐकून तर माझ्या आश्चर्याला सीमाच राहिली नाही ! मी विचारले, ' मग ते तुमच्या लक्षात कसे राहिले ? आमच्या का नाही राहत ?' त्यावर स्वामीजींनी उत्तर दिले, ' कोणतीही गोष्ट एकाग्र मनाने वाचावयास हवी. कोणत्याही अभ्यासात एकाग्रता ही हवीच." 

क्रमशः



# माणूस घडविणारे शिक्षण हवे... स्वामी विवेकानंद



# आनंदी पहाट

## वैचारिक बैठकीत सामील व्हावे

आधुनिक केसरी

विचारांचा पाया मजबूत असलेल्या व्यक्तीच्या मानसिक कळसाची उंची मोजणे सहज शक्य होतेच असे नाही. अशा व्यक्तीपेक्षा त्या व्यक्तीच्या विचारांचेच आकर्षण, कौतुक आणि आदर अधिक असल्याचे दिसून येत असते. ह्याची जाणीव आपण ठेवणे आवश्यक असते. अशी वैचारिक प्रगल्भता प्राप्त करणाऱ्यांपैकी आपणही एक असायला काय हरकत आहे, असा विचार आपल्या मनात यायला हवा. विचारवंतांच्या वैचारिक बैठकीत सामील व्हायला कसे मिळेल, ह्याच दृष्टीकोनातून प्रयत्न करण्यात येणे महत्वाचे ठरते. कारण, अशा विचारवंतांच्या वैचारिक, मानसिक कळसाला स्पर्श करून येणारा प्रकाशाचा, आशेचा प्रत्येक किरण मार्गस्थ होण्यासाठी अनेकांना योग्य दिशा दाखवत असतो. दशदिशांपैकी कोणत्याही दिशेने मार्गस्थ झाले, तरीही यश प्राप्तीच्या मार्गाचे दर्शन होतच राहते. आपल्या अंतर्मनाला संस्कारच शिस्त लावत असतात. एक विशीष्ट आकार, दिशा आणि गती प्राप्त करून देत असतात. मुळातच ह्या विचारांची व्याप्ती आपण समजून घेणे सर्वप्रथम जरुरीचे असते. आपल्या प्रत्येकाच्या जीवनांत अंतर्मानावरील संस्कार खूप महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. त्याशिवाय आपल्या विचारांमध्ये परिपक्वता येतेच असे नाही. संस्काराशिवाय जीवनमूल्य शून्य ठरत असते. संस्कारच आपल्याला श्रेष्ठ बनवत असतात, उत्तम आकार देत असतात. आपल्या सर्वोत्तम जीवनाचा पाया उत्तम संस्कारांवरच अवलंबून असतो. संस्कारांशिवाय जीवन भरकटलेल्या जहाजाप्रमाणे, विमानाप्रमाणे असते, एकप्रकारे विमनस्क अवस्थेतील मन कोणतीही पातळी गाठू शकते. त्याचप्रमाणे, संस्कृती सुद्धा, संस्कारांवर आधारित असते. संस्कार म्हणजे आपल्या अंतर्मनावर सामाजिकदृष्ट्या महत्वाच्या आणि उपयुक्त ठरतील अशा चांगल्या सवयी, असे म्हणता येईल. आपल्यामध्ये यासाठी आवश्यक ते सद्गुण असणे जरुरीचे असते. अशा गुणांचा केवळ व्यक्तिगत लाभ होत नसतो, तर समाजातील प्रत्येक घटक लाभार्थी ठरत असतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

**जीवाचा आधार | तुच माझ्या ||**
काय उपकार | सांगु मायबापा ||
दावला हा सोपा | मार्ग मज ||१||
होतो मुका देवा | मुढ मी जन्माचा ||
बोलू लागे वाचा | तुझ्या कृपे ||२||
संगतीने तुझ्या | जाणला मी वंश ||
ज्ञानीयाचा अंश | जागा झाला ||३||
उजळली आता | आत्म्यासह काया ||
संसाराची माया | क्षीण झाली ||४||
जन्मोजन्मी तुझे | लाभो उपकार ||
जीवाचा आधार | तुच माझ्या ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण

आधुनिक केसरी

**थोर व्यक्तीस आदर्श जरूर माना; पण कोणाच्याही जीवनशैलीची कॉपी करू नका. कालाच्या गतीकडे दुर्लक्ष करू नका.**

**एक मिनिट देखील वाया घालवू नका. सतत कार्यरत रहा. Entertainment आणि Enjoy या एकाच इंग्रजी स्वरवर्णाने सुरू होणा-या परस्परविरोधी गोष्टी आहेत.**




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आधुनिक केसरी

**मन के सुख मन कर्म को, मन का ओट हजार । मन विनोद मन बागफल, मन नाटक हेय सार ।।५२।। (स्वर्वेद द्वितीय मण्डल द्वितीय अध्याय) ०२/०२/५२**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
मनाचे सुख, मनाचे कर्म, मनाची आवरणे हजारो आहेत. मनाचा विनोद, मनाच्या मानसिक बागेतील फळं आणि त्याचा सर्व नाच सोडून आत्म्याद्वारे परमेश्वराची उपासना करावी. मनाच्या संगतीने जीवाचे कल्याण होऊ शकत नाही.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.**

# बध्दमुक्तनिरूपण

आधुनिक केसरी

महापुण्य पदरी असेल तरचं वेदांचा अभ्यास होईल असे 30व्या ओवीत प्रत्यक्ष समर्थ आपल्याला सांगतात. पूढे असेही म्हणले आहे की एक पूर्ण श्लोक किंवा अर्धा श्लोक किंवा त्यातील एक भाग किंवा नुसता एक शब्द जरी मनापासून श्रवण केला तर अनेक दोष नाहींसे होतील. वेद,पुराण,शास्त्र यांचा श्रवणभक्तिने सुध्दख माणुस पवित्र बनून जातो. व्यासांनी भागवत ग्रंथात हेही सांगितले आहे. मुक्त व ज्ञानी पुरूष देहाने जगात वावरत असताना आपली ब्रम्हाकारता ढळूं देत नाहीत. ऊदा, आत्मज्ञानी पुरूषांनी ब्रम्हवस्तु आपले मूळरूप आहे असे सांगितले मग ती कशी आहे याची कल्पना करू लागतो. शब्द,स्पर्श, रूप,गंध,वास अशा वेगवेगळ्या कल्पना करून आपले अनुभव विश्व बनते. या चराचरात अनेकरूपांचा खजिना भरलेला आहे तेव्हा या विश्वाचें ज्ञान आत्मसात करण्यासाठी हेच अनुभव विश्व उपयोगी पडते. परंतु स्थलकालातीत निर्गुण, अद्रुष्य, निर्विकल्प, अव्यक्त, अचिंत्य,असंग आणि अनंत असणारी ब्रम्ह वस्तु इंद्रियांना व कल्पनांनी आकलन होत नाही.




सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# प्रपंच भगवंताचा आहे असे जाणून करावा

आधुनिक केसरी

हे जे सर्व जग दिसते, त्याला कुणी तरी नियंता आहे असे तुम्हाला वाटते का ? एखाद्या नास्तिकाला विचारले की 'हे जग कुणी निर्माण केले ? ' तर तो काय सांगेल, तर पांचभौतिक तत्त्वांपासूनच याची उत्पत्ती झाली आहे. पण ही तत्त्वे कुणी निर्माण केली ? त्यावर तो सांगेल, 'ते मात्र काही कळत नाही'. पण जे कळत नाही त्यालासुद्धा कुणीतरी असलाच पाहिजे. म्हणून, देव नाही हे कोणालाही म्हणता येणार नाही. जिथे सध्या वस्ती नाही तिथेही मंदिरे बांधलेली आपण पाहितो; आणि ती कुणी बांधली याचा तपास करू लागलो असताना बांधणारा कोण हे जरी समजले नाही तरी, ज्याअर्थी ती आहेत, त्या अर्थी त्यांना कुणीतरी बांधणारा आहेच. म्हणून काय की, जगाचा कुणी तरी कर्ता हा असलाच पाहिजे. तो कोण हे आपल्याला समजत नाही इतकेच. आपण संसारात वागतो त्याप्रमाणे मुले खेळात खेळ थाटतात, खेळात लग्न लावतात, त्यांचा सर्व सोहळा करतात; बाहुलीचे सर्व संस्कार ती करतात. त्यांच्या खेळात बाळंतपण होते, मुले होतात, सर्व काही करतात; पण त्यांना कुणी घरात हाक मारली म्हणजे खेळ टाकून तशीच धावत जातात. त्या वेळेस मूल तिथे रडेल वगैरेची काळजी त्यांना राहात नाही. असेच आपण संसारात वागावे. जर सर्वच देवाने केले आहे तर त्याचे पालनही तोच करतो आणि संहारही करणारा तोच असतो; तर मग आपल्याला तरी त्याने दिलेल्या संसारात काही बरे-वाईट झाले म्हणून सुखदुःख मानण्याचा काय अधिकार आहे ? समजा, आपण एक घर भाड्याने घेतले आहे. त्याचे आपण बरीच वर्षे भाडे भरतो आहोत. पुढे जर आपण ते घर माझेच आहे असे म्हणू लागलो, तर तो मालक ऐकेल का ? तो काहीही उपायाने आपल्याला घरातून काढून लावील की नाही ? तसेच आपले प्रपंचात झाले आहे. जो प्रपंच आपल्याला त्याने भाड्याने दिला आहे, तो आपण आपलाच म्हणून धरून बसलो. परंतु त्याला वाटेल तेव्हा आपल्याला काढून लावता येणे शक्य असताना आपण तो आपला म्हणून कसे म्हणावे ? तर तो त्याचा आहे असे समजून वागावे आणि जेव्हा तो आपल्याला न्यायला येईल तेव्हा जाण्याची आपली तयारी ठेवावी, म्हणजे संसारात सुखदुःखे बाधत नाहीत.



आपण भजनाला लागलो तर प्रपंच कसा चालेल याची काळजी करू नये. भजनाला लागल्यावर तुकाराम महाराजांसारखे झालो तर वाईट काय ? बरे, तसे न झाले तर प्रपंच चालूच आहे ! प्रपंचात नुसते रडत बसण्यापेक्षा, आनंदाने रामनामात राहू या. सर्व हवाला रामावर ठेवून थोडे दिवस तरी राहून पहा, मन खास चिंतारहित होईल, पूर्ण निष्ठा उत्पन्न होईल.

हे सर्व विश्व व अखिल प्रपंच ईश्वराचा आहे . प्रपंच ज्याचा आहे त्यास तो देऊन टाकून आपण मोकळे व्हावे. अडखळण्याची भितीच नाही.

# तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

बळियाच्या आम्ही जालों बळिवंता । करूं सर्व सत्ता सर्वांवरी ॥२॥
तुका म्हणे आम्ही जिवाच्या उदारा । जालों प्रीतिकरा गोविंदासी ॥३॥
क्षणभरी आम्ही सोसिलें वाईट । साधिलें अवीट निजसुख ॥१॥
सांडी मांडी मागें केल्या भरोवरी । अधिक चि परी दुःखाचिया ॥२॥
तुका म्हणे येणें जाणें नाहीं आतां । राहिलों अनंताचिये पायीं ॥३॥
आम्हां आम्ही आतां वडील धाकुटीं । नाहीं पाठीं पोटीं कोणी दुजें ॥१॥
फावला एकांत एकविध भाव । हरि आम्हांसवें सर्व भोगी ॥२॥
तुका म्हणे अंगसंग एके ठायीं । असों जेथें नाहीं दुजें कोणी ॥३॥

# ते आपल्या राजकीय पोळ्या भाजत आहेत

## नसीम खान : राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना पुण्यतिथीनिमित्त आदरांजली

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** केंद्रातील सत्ताधाऱ्यांनी देशात द्वेष पसरवून सामाजिक ध्रुवीकरण घडवून आणले आहे व त्यावर ते आपल्या राजकीय पोळ्या भाजत आहेत. द्वेषाच्या या वातावरणामुळे देशाचे प्रचंड नुकसान झाले आहे. भाजपाने आपल्या राजकीय फयद्यासाठी द्वेषाच्या माध्यमातून लोकांना विभाजीत करण्याचे काम केले. त्याविरोधात 'नफरत छोडो, भारत जोडो' असा नारा देत राहुलजी गांधी यांनी भारत जोडो यात्रेच्या माध्यमातून देशाला पुन्हा एकदा प्रेमाने जोडले आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष माजी मंत्री नसीम खान म्हणाले. महागाई, बेरोजगारी तसेच जीएसटीमुळे देशात निर्माण झालेली आर्थिक विषमता, सामाजिक ध्रुवीकरण, केंद्रीय संस्थांचा गैरवापर या मुद्द्यांवर राहुलजी गांधी यांच्या नेतृत्वाखाली कन्याकुमारीहून निघालेली भारत जोडो यात्र ४ हजार किलोमीटरचा प्रवास करून काश्मीरच्या श्रीनगरमध्ये पोहोचली आहे. आज श्रीनगर येथे ध्वजारोहण करून या यात्रेचा समारोप झाला. या यात्रेच्या समर्थनार्थ प्रदेश काँग्रेसचे मुख्यालय टिळक भवन येथे नसीम खान यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी संपूर्ण विश्वाला सत्य, अहिंसा, शांतीच्या मार्ग दाखवला. त्यांनी दाखवलेल्या या मार्गावर चालूनच भारताने प्रगती केली आहे. हाच विकासाचा शाश्वत मार्ग असून गांधीजींच्या भारतात द्वेषाला जागा नाही. केंद्रातील नरेंद्र मोदी यांचे सरकार व भारतीय जनता पक्षाने आपल्या राजकीय फायद्यासाठी या देशात जाती धर्माच्या आधारावर ध्रुवीकरण करून देशाला विभाजीत करण्याचे काम केले आहे. राहुलजींच्या नेतृत्वाखालील भारत जोडो यात्रेने केंद्रातील सत्ताधा-यांनी देशात पसरवलेल्या द्वेषाला प्रेमाने उत्तर दिले आहे. या ऐतिहासीक यात्रेने संपूर्ण देशाला प्रेमाच्या धाग्याने जोडले आहे.




## तुकोबारायांची बदनामी करणाऱ्या धीरेंद्र शास्त्रीने माफी मागावी : पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** दिव्यशक्ती आणि चमत्काराचा दावा करणा-या बागेश्वर धामचा भोंदू धीरेंद्र शास्त्री याने जगद्‌गुरु संत तुकाराम महाराज यांच्याबद्दल आक्षेपार्ह विधान करून त्यांची बदनामी केली आहे. तुकाराम महाराजांबद्दल अपशब्द हा संपूर्ण वारकरी संप्रदायाचा आणि महाराष्ट्राचा अवमान असून काँग्रेस पक्ष या भोंदू बाबाचा तीव्र निषेध करत आहे, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

या संदर्भात बोलताना नाना पटोले म्हणाले की, जगद्‌गुरु संत तुकाराम महाराज हे महाराष्ट्राच्या वारकरी संत परंपरेमधील महान संत आहेत. सतराव्या शतकात त्यांनी अभंग आणि किर्तनाच्या माध्यमातून भक्ती आणि समाजप्रबोधनाचे महत्त्वपूर्ण कार्य





केले. छत्रपती शिवाजी महाराज त्यांना गुरुस्थानी मानत होते. संपूर्ण वारकरी संप्रदायासाठी आणि महाराष्ट्रासाठी संत तुकाराम महाराज वंदनीय आहेत. त्या संत तुकाराम महाराजांना त्यांची बायको रोज मारायची, त्यामुळे ते देव देव करायला लागले, असे बेताल वक्तव्य करून भंपक भोंदू बाबा धीरेंद्र शास्त्री याने समस्त वारकरी संप्रदायाचा आणि पर्यायाने महाराष्ट्राचा अवमान केला आहे. त्यामुळे या भोंदू बाबाविरोधात संपूर्ण महाराष्ट्रामध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

काही दिवसांपूर्वी नागपूर येथे येऊन या भोंदू बाबाने दिव्य दरबाराच्या नावाखाली अंधश्रद्धेला प्रोत्साहन देण्याचा उद्योग केला होता. त्याला अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे शाम मानव यांनी आव्हान दिले असता या भोंदू बाबाने नागपूरातून पळ काढला होता. या पळपुट्या भोंदू बाबाचा काँग्रेस पक्ष तीव्र निषेध करत असून त्याने संत तुकाराम महाराजांचा अपमान केल्याबद्दल तात्काळ माफी मागितली पाहिजे असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

## बाबासाहेब म्हणाले होते, 'पंखाशिवाय जसा पक्षी... त्याप्रमाणे समाजाला विचारप्रवृत्त करण्यासाठी वृत्तपत्राची गरज'

### आज मूकनायक दिन : जेष्ठ पत्रकार केवल जीवनतारे यांचा आधुनिक केसरीशी खास संवाद

आधुनिक केसरी

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ओळख घटनेचे शिल्पकार, कायदेपंडित, अर्थतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ज्ञ अशा अनेक अंगांनी जगाला परिचित आहे, परंतु, पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणून या देशातील वृत्तपत्रसृष्टीने बाबासाहेबांची म्हणावी तेवढी दखल घेतली नाही. वास्तविक पाहता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता ही काही पोटभरू किंवा प्रचारकी पत्रकारिता नव्हती, तर तिला समाजोद्धाराचे पर्यायाने राष्ट्रोद्धाराचे अधिष्ठान लाभलेले होते अशी ठोस भूमिका जेष्ठ पत्रकार केवल जीवनतारे यांनी आधुनिक केसरीस संवाद साधत व्यक्त केली.**




बाबासाहेबांनी आंदोलनातील एक भूमिका सांगणारे सुर्यास्त्र म्हणून त्याचा वापर केला. यामुळेच प्रतिगामी मानसिकतेचे धनी असलेल्यांनी बाबासाहेबांच्या पत्रकारितेकडे कानाडोळा केला. डॉ. आंबेडकर यांनी ३१ जानेवारी १९२० रोजी 'मूकनायक' वृत्तपत्र सुरू केले. या ऐतिहासिक घटनेस १०३ वर्षे पूर्ण झाली आहेत. या निमित्ताने बाबासाहेबांच्या प्रेरक पत्रकारितेचा आजच्या काळातील प्रत्येक पत्रकाराने अभ्यास करण्याची गरज आज निर्माण झाली आहे.




डॉ. आंबेडकर यांनी पेपर काढायचा म्हणून साप्ताहिक सुरू केले नाही. तर त्यामागे निश्चित भूमिका होती. यामुळे ते पत्रकारितेकडे वळले होते. १९१७ साली विविध जाती जमातींच्या मतदानाच्या अधिकारांच्या संदर्भात काही कर्त्या व्यक्तींच्या साक्षी काढण्यासाठी शासनाने साऊथबरो कमिशन नेमले होते. या कमिशनच्या निमित्ताने अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांसाठी झगडण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. त्यांना अस्पृश्यांचे म्हणणे जगाच्या वेशीवर मांडण्यासाठी आपल्याजवळ नेहमीसाठी एखादे साधन असावे असे वाटले आणि त्यावेळी बाबासाहेब म्हणाले होते, 'पंखाशिवाय जसा पक्षी...त्याप्रमाणे समाजात विचार प्रवृत्त करण्यासाठी वृत्तपत्राची गरज असते. त्यावेळी असलेली वृत्तपत्रे विशिष्ट जातींचीच चाकरी करणारी, अस्पृश्यांवर अन्यायच बहुतांशी करणारी होती. याचा अर्थ वृत्तपत्राविना अस्पृश्य समाज अनाथ होता. मुक्या समाजाचा आवाज म्हणून, मूक समाजाच्या वेदना व विद्रोह प्रकट करण्याच्या गरजेतून डॉ.बाबासाहेब आंबेडकर पत्रकारितेकडे वळले आणि मूकनायक प्रकाशित केले.

'मुकनायक' या पाक्षिकाचा ३१ जानेवारी १९२० रोजी पहिला अंक प्रकाशित झाला. मूक अशा अस्पृश्यांचे नायकपण-नेतेपण जणू बाबासाहेबांनी स्वीकारले. मूकनायकाला राजर्षी शाहू महाराज यांचे आर्थिक सहकार्य लाभले होते. त्यामुळे पहिल्या अंकाच्या संपादकीयामध्ये बाबासाहेबांनी जन्मप्रतिज्ञा अशी व्यक्त केली. 'आमच्या या बहिष्कृत लोकांत होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचविण्यास तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरुपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रासारखी अन्य भूमीच नाही. परंतु मुंबई इलाख्यात निघत असलेल्या वृत्तपत्राकडे पाहिले असता असे दिसून येईल की, त्यातील बरीचशी पत्रे विशिष्ट अशा जातीचे हितसंबंध पाहणारी आहेत. इतर जातीच्या हिताची पर्वा त्यांना नसते. इतकेच नव्हे तर, केव्हा केव्हा त्यांना अहितकारक असेही त्यातून प्रलाप निघतात. अशा वृत्तपत्रकारांना आमचा इशारा एवढाच की, कोणतीही एखादी जात अवगत झाली तर तिच्या अवनतीचा चट्टा इतर जातीत बसल्याशिवाय राहणार नाही. बाबासाहेबांनी हा इशारा त्यावेळी दिला होता. परंतु आज वृत्तपत्र हे भांडवलशाहीच्या हातातील कळसुत्री बाहुली बनली आहे. यामुळे भारतीय समाजातील बेकारी असो की, त्यांच्या जगण्याचे प्रश्न मांडण्याची अपेक्षा भांडवलशाहीने गिळंकृत केलेल्या माध्यमांकडून होणार नाही. ही भांडवलशाही माध्यमांच्या सहकार्यातून देशात नव्या पद्धतीची गुलामगिरी लागू करणार आहेत. कंत्राटीवर काम करणारे गुलाम कामगार तयार करणारे आहेत. लोकशाहीचा बुरखा फाडून भांडवलशाही वरचढ होत या देशाच्या सर्वोच्च पदावरील राजालाही गुलाम करतील. हा गुलाम राजा देखील त्यांच्या भांडवलशाहीच्या हातातील बाहुलं म्हणून वागणार हे निश्चित. यामुळे काळाची पावले ओळखून मूकनायकाप्रमाणे पुन्हा एकदा पत्रकारितेतून आंदोलनाचे सूर्यास्त्र जन्माला येवो अशी ठोस भूमिका जेष्ठ पत्रकार केवल जीवनतारे यांनी शेवटी मांडली.

## 'व्हॉइस ऑफ मीडिया'चे लाखोंचे पुरस्कार!

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सकारात्मक पत्रकारिता केली तर पत्रकारितेकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलेल, ही मराठी पत्रकारितेची विचारधारा आहे. सकारात्मक पत्रकारिता हा विचार रुजवण्यासाठीच 'व्हाईस ऑफ मीडिया' या पत्रकारांच्या संघटनेची निर्मिती झाली आहे. जी संघटना सध्या देशात तेवीस राज्यांत कार्यरत आहे. 'पॉझिटिव्ह जर्नालिझम' अजून रुजावे, या उद्देशाने या वर्षीपासून 'व्हाईस ऑफ मीडिया' पॉझिटिव्ह जर्नालिझम अवॉर्ड सुरू केला आहे. या स्पर्धेत रोख अडीच लाख रुपयांचे चार पुरस्कार, विशेष पाच पुरस्कार, सर्व सहभागी स्पर्धक पत्रकारांना प्रमाणपत्रही देण्यात येणार आहे. 'व्हाईस ऑफ मीडिया'चे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, राष्ट्रीय सरचिटणीस चंद्रमोहन पुपाला, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजा माने, शेट ब्रिजमोहन लड्ढा सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष आशीष ब्रिजमोहन लड्ढा, यांनी 'व्हाईस ऑफ मीडिया' पॉझिटिव्ह जर्नालिझम अवॉर्ड २०२३ ची घोषणा केली आहे. 'व्हाईस ऑफ मीडिया' पॉझिटिव्ह जर्नालिझम अवॉर्ड २०२३ प्रथम क्रमांक १ लाख रुपये रोख, स्मृतिचिन्ह, ग्रंथ, मानपत्र, सन्मान. द्वितीय क्रमांक ६१ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, ग्रंथ, मानपत्र, सन्मान. महिला पत्रकार ५१ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, ग्रंथ,मानपत्र, सन्मान. तृतीय क्रमांक ४१ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, ग्रंथ, मानपत्र, सन्मान. सहभागींना उत्तेजनार्थ पाच विशेष पुरस्कार. स्पर्धेत भाग घेणाऱ्या सर्वांना सहभागी प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. सहभागी होणारे पत्रकार त्या दैनिक, साप्ताहिकाचे प्रतिनिधी आवश्यक आहेत. प्रस्ताव देताना संपादकांचे पत्र जोडणे आवश्यक आहे. १ फेब्रुवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीमध्ये किमान ४२ किंवा त्यापेक्षा अधिक थेट परिणामकारक असणाऱ्या बातम्या, लेख यास्पर्धेसाठी ग्राह्य धरल्या जातील. जानेवारी २०२४ मध्ये राज्यपाल, मुख्यमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मुंबईत विजेत्यांना दिमाखदार सोहळ्यात पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

ही स्पर्धा महाराष्ट्र, मराठी भाषेपुरतीच आहे. 'व्हाईस ऑफ मीडिया'चे वरिष्ठ व मुख्य पदाधिकारी मंदार फणसे,संजय आवटे, धर्मेंद्र जोरे, अनिल मस्के, विलास बडे, सुधीर चेके पाटील, बालाजी मारगुडे हे निवड प्रक्रियेचे प्रमुख म्हणून काम पाहणार आहेत. 'व्हाईस ऑफ मीडिया' कोकण विभागीय कार्यालय एल.३०-१२०१-स्वप्नपूर्ती , सेक्टर ३६ खारघर, नवी मुंबई ४१०२१० या पत्त्यावर प्रस्ताव पाठवायचे आहेत. 'व्हाईस ऑफ मीडिया'चे सर्व ठिकाणीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष, सचिव या प्रमुख चार जणांना स्पर्धेमध्ये सहभागी होता येणार नाही. शेट ब्रिजमोहन लड्ढा सेवा प्रतिष्ठान चिखलीचे अध्यक्ष आशीष ब्रिजमोहन लड्ढा यांच्या सहकार्याने हा पुरस्कार उपक्रम पार पडतोय. आशीष ब्रिजमोहन लड्ढा म्हणाले, या सामाजिक उपक्रमात मला सहभागी होता आले, हे मी माझे भाग्य समजतोय, हा उपक्रम नक्कीच समाजासाठी प्रेरक ठरेल. या स्पर्धेत राज्यातल्या सर्व पत्रकारांनी सहभागी व्हावे , असे आवहान 'व्हाईस ऑफ मीडिया'च्या वतीने करण्यात आले आहे.

## वांगचुक यांचे उपोषण

आधुनिक केसरी

सामाजिक कार्यकर्ते, इंजिनिअर आणि इनोव्हेटर सोनम वांगचुक यांच्या लडाखमधील आंदोलनाचा आज पाचवा आणि शेवटचा दिवस आहे. बॉलिवूडच्या चित्रपट 'थ्री इडियट्स'मधील रँचो पात्र वांगचुक यांच्यापासूनच प्रेरित आहे. वांगचुक लडाख वाचवण्यासाठी आंदोलन करत आहेत. लडाखमध्ये बर्फवृष्टी सुरू असून तेथील वातावरण अत्यंत थंड आहे. गोठवणाऱ्या थंडीतही लडाखच्या विविध प्रश्नांसाठी सोनम वांगचुक यांचे उपोषण सुरू आहे. लडाखचा सहाव्या अनुसूचीमध्ये समावेश करण्याची मागणी त्यांनी केली आहे. तसेच लडाखच्या संरक्षणासंदर्भात अनेक मुद्द्यांसाठी वांगचुक यांचे उपोषण सुरू आहे. सोनम वांगचुक यांनी आज उपोषणाच्या शेवटच्या दिवशी संपूर्ण देशातील पर्यावरण प्रेमींना एका दिवसाचं उपोषण करण्याचे आवाहन केले आहे. तुम्ही तुमच्या शहरातून देशाच्या कोणत्याही भागातून एका दिवसासाठी उपोषण करुन पर्यावरण वाचवण्यासाठीच्या या मोहिमेमध्ये सामील होऊ शकता, असे वांगचुक यांनी सांगितले आहे. तसेच, सोशल मीडियाद्वारे तुमच्या उपोषणाची माहिती सर्व लोकांपर्यंत पोहोचवा असे आवाहनही त्यांनी जनतेला केले आहे. सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाची धग देशभरात पोहोचली आहे. वांगचुक यांनी त्यांच्या व्हिडीओमध्ये 30 जानेवारी रोजी सर्व लोकांना त्यांच्या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी ट्विटरवर व्हिडीओ शेअर करत हे आवाहन केले आहे. यानंतर त्यांच्या समर्थनार्थ हिमाचलचे सामाजिक कार्यकर्ते 30 जानेवारीला शिमलामध्ये एक दिवसीय उपोषण करत आहेत. हाडे गोठवणाऱ्या थंडीत सोनम वांगचुक उपोषण करत आहे. लडाखमधील दोन तृतीयांश हिमनद्या नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. पर्यावरण संवर्धनाच्या मुद्यावरुन गेल्या चार दिवसांपासून सोनम वांगचुक उपोषणाला बसले आहेत. लडाखच्या थंड हवामानात सोनम वांगचुक यांचे उपोषण सुरू आहे. बर्फवृष्टी सुरू असतानाही वांगचुक यांनी आपले उपोषण सुरुच ठेवले आहे.



रवींद्र मुळे
संपर्क क्र : ९४२२२२१५७०

## तिरस्कार , चमत्कार आणि पुरस्कार !

आधुनिक केसरी

**२६ जानेवारी ला सालाबादप्रमाणे पद्म पुरस्कार जाहीर झाले . २०१४ सालापासून या पुरस्काराचे स्वरूपच बदलले ! साधारण पणे हस्तिदंती मनोऱ्यात राहणारे , चकचकीत गाडीत फिरणारे आणि झगमगीत कपडे घालणारे असेच बहुतांश पुरस्कार प्राप्त लोक या पुर्वी असायचे . जणू तो नियमच होता आणि अपवाद फक्त नियम सिद्ध करण्यासाठी असायचा ! पण अलीकडे सामान्यातल्या असामान्यत्व असणाऱ्या अनेकांना पुरस्कार प्राप्त होऊ लागले. ग्रामीण भागात, वनवासी क्षेत्रात अनामिक पणे काम करणारे अनेक जणांचे कार्य यामुळे प्रकाशात येऊ लागले.**


अर्थात असे पुरस्कार मिळवण्याच्या उद्देशाने कार्य करणारे किंबहुना त्या प्रेरणेतून काम करणारे हे कुणीच नव्हते / नाहीत. संघ किंवा संघविचारातून प्रेरणा घेऊन काम करणाऱ्यांना स्वातंत्र्योत्तर काळात कुठलेच पुरस्कार कधी मिळाले नव्हते किंवा ते मिळवण्यासाठी कुठले प्रयत्न कधी या विचारात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी केले नाहीत . वृत्तपत्रात नाव येणे, हार, गुच्छ, व्यासपीठ याची अभिलाषा या पलीकडे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची फळी स्वातंत्र्या नंतर संघाने घडवली. त्यामुळे सरकारी पातळीवर तर घोर तिरस्कार ही संघ कार्यकर्त्यांची सवयीची बाब होती. १९७७ च्या समग्र क्रांतीच्या लढ्यानंतर संघाला श्रेयाचा अनुभव थोडा थोडा येऊ लागला पण तरी संघ आणि संघ कार्यकर्ते पुरस्कार आणि ते ही सरकारी पुरस्कारापासून शेकडो योजने दूर होते. पुरस्कार मिळणे सोडून द्या, पण पुरस्कार प्राप्त लोकांच्यात संघाला मान्यता ही सुद्धा दुर्मिळ गोष्टच होती. एका अर्थाने सरकारी आणि समाज मान्यता पेक्षा तिरस्कार हेच संघाचे प्रारब्ध असल्यासारखे झाले होते.

अलीकडील काळात मराठवाड्यात लातूरला पाहिले सुसज्ज रुग्णालय उभे करणारे आणि भूकंपग्रस्त भागात सर्वप्रथम धावून जाणारे माननीय अशोकराव कुकडे काका याना आणि भटके, विमुक्त समाजात अविरत काम करणारे गिरीष प्रभुणे यांना पुरस्कार मिळाले आणि स्वयंसेवकाना त्याचा मनस्वी आनंद पण झाला. आज जाहीर झालेल्या पुरस्कारात दादा इदाते , रमेश पतंगे आणि प्रभाकरजी मांडे याना पद्मश्री पुरस्कार मिळाल्याचे कळले आणि सर्वांचा आनंद द्विगुणित झाला. हिंदुत्वाच्या विचारधाराची पताका घेऊन समरसतेचे मूल्य जपणारे हे तिघेही सन्मानित होणे याने पुरस्काराचीच उंची वाढली म्हणावी लागेल. रमेशजी मुंबईचे ! संघ कामात लहानपणापासून जबाबदारी घेतलेले ! दापोलीच्या दादा इदाते यांची गोष्ट वेगळी नाही ! ते तर प्रांत कार्यवाह राहिलेले ! प्रभाकरजी मांडे याना तर प्रत्यक्ष पूजनीय बाबासाहेब यांनी प्रेरणा दिलेली ! ( संघाच्या स्वयंसेवकाला डॉ बाबासाहेब आंबेडकर आशीर्वाद देतात, दिशा देतात आणि तो स्वयंसेवक त्या वाटेवर आयुष्यभर प्रवास करत राहतो हे स्वतःला पुरोगामी म्हणवणारे स्वीकारणार नाहीत पण तरी सत्य हे सत्यच असते ! ) या सर्वांना पुरस्कार मिळण्यापूर्वी असलेले त्यांच्या कार्याचे मूल्य पुरस्काराने वाढले का ? तर बिलकुल नाही. त्या कार्याच्या अंगीभूत मोठेपणा मुळे त्या कार्याचे मूल्य अमूल्य आहे. असे कार्य करणारी माणसे पुरस्काराने मोठी होत नसतात तर तो पुरस्कार मोठा होत असतो ! हा पुरस्कार त्यांनी अंगिकारलेल्या कार्याचा , तत्वाचा गौरव असतो आणि बाकी आम्हा सगळ्यांना प्रेरणेचा मंत्र असतो. प्रभाकरजी मांडे सध्या नगर येथे राहतात ! त्यांना काल कार्यकर्त्यांच्या समवेत भेटण्याचा योग आला ! स्थितप्रज्ञता काय असते ? याची अनुभूती आम्हा सर्वांना झाली. एकेकाळी समरसता साहित्य परिषदेचे अध्यक्ष पद भूषवले म्हणून पात्र असूनही अनेक पुरस्कार त्यांच्या पासून लांबच राहिले. त्यांचे किंवा श्री रमेश जी यांचे साहित्य हे समरस समाज निर्मितीचे आधार असताना त्याकडे महाराष्ट्रातील समीक्षकांनी, साहित्य क्षेत्रातील मंडळींनी ते दुर्लक्षितच केले. या मागे सोयीस्कर राजकीय अपरिहार्यता होती.





दादा इदाते यांनी भटक्या समाजासाठी सुरुवातीला संघ प्रेरणेने उभ्या असलेल्या संस्थांच्या माध्यमातून आणि संधी मिळाल्यावर सरकारी पदाच्या माध्यमातून जे कार्य केले ते इंग्रजांनी निर्माण केलेल्या आणि पुढे तसेच स्वातंत्र्याचा काळात चालू राहिलेल्या अन्याय धोरणातून भटक्या समाजाच्या मुक्तीचे कार्य होते / आहे . हा पुरस्कार त्या कार्याचा गौरव आहे. पूजनीय बाळासाहेब देवरस यांनी पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत केलेले भाषण , त्या आधी उडपी येथे पूजनीय गुरुजी यांच्या प्रयत्नातून 'न हिंदू पतितो भवेत् '!हा झालेला ठराव यातून पुढे मानानीय दत्तोपंत आणि माननीय दामुआण्णा यांच्या चिंतनातून संघ शाखेवरील स्वाभाविक व्यवहाराला शब्दातून दिलेले वैचारिक अधिष्ठान या सर्वांतून निर्माण झालेले साहित्य आणि प्रत्यक्ष कृतीशीलतेला मिळालेला हा सन्मान आहे. 'आज ठरलो वेडे परी , गातील उद्या आमचेच पोवाडे ! या गीतांचे आठवण या निमित्ताने होते ! कुचेष्टा आणि तिरस्कार यात अनेक वर्षे गेल्यावर समाज आणि सरकार सर्वांनी दिलेला हा या त्रिमूर्तींना पुरस्काराने कार्यकर्ते आंनदी होणे आणि तो व्यक्त होणे ही स्वाभाविक मानवी मनाची कृती आहे. पण या निमित्ताने आम्हा कार्यकर्त्यांना माननीय दत्तोपंत ठेंगडी यांनी एक गोष्ट सांगितली होती ती या ठिकाणी आठवते .



मोक्षा कडे वाटचाल करणाऱ्या योगी पुरुषांच्या प्रवासात एक टप्पा असा येतो की त्याच्या तप सामर्थ्याने अनेक चमत्कार घडू लागतात खरा योगी हे भान ठेवून त्या चमत्कारा मुळे घडणाऱ्या नमस्कारात अडकून राहत नाही आणि तो मोक्ष प्राप्तिकडे निरंतर वाटचाल करतो आणि मोक्ष प्राप्त करतो. जो चमत्कार, नमस्कार यात अडकतो तो मोक्षप्राप्ती पासून वंचित राहतो. भारतमातेच्या पुनरुत्थानाची धुरा अंगावर घेऊन प्रतिबद्ध झालेल्या संघाच्या ९७ वर्षातील वाटचालीत आता चमत्कार घडण्याचे दिवस सुरू झाले आहेत पण भारताचे पुनर्वैभव अजून खूप दूर आहे . त्यासाठी पुरस्कार आणि चमत्कारात न अडकता पुढे जाण्याची गरज आहे हे पदंश्री प्रभाकरजी मांडे यांच्याशी बोलताना त्यांनी आम्हाला एक प्रकारे जाणवून दिले ! आणि प्रभाकरजी यांचे ऋषितुल्य व्यक्तिमत्व आम्हा सर्वांना एक वेगळीच प्रेरणा देऊन गेले. त्यामुळे या तिघांच्या पद्म पुरस्काराचा आनंद साजरा करताना हुरळून न जाता त्यांचे कार्य पुढे नेण्याचा , त्यांच्या साहित्यिक प्रेरणा जिवन्त ठेवण्यासाठी कटिबद्ध होण्याची आणि एकात्मिक हिंदू समाज निर्मितीचे डॉ. हेडगेवार यांचे स्वप्न पूर्ण करण्याची खरी गरज आहे. या पुरस्काराने त्याची आठवण अधोरेखित झाली. माननीय दादा , माननीय रमेशजी आणि माननीय प्रभाकरजी मांडे याना त्रिवार अभिवादन !


## अहिंसेचे प्रतीक- गांधीजी

आधुनिक केसरी

**महात्मा गांधी अर्थात मोहनदास करमचंद गांधी हे नाव भारतापुरते मर्यादित न राहता जगाच्या कानाकोप-यात पोहचले. ते दया ,क्षमा ,शांती, सेवा, अहिंसा आणि परोपकार या सर्वोच्च मानवी मूल्यांची शिकवण देणारे जागतिक कीर्तीचे एक महान विचारवंत म्हणून. ३० जानेवारी हा त्यांचा स्मृतीदिन.या निमित्ताने बापूंच्या विचारांना आणि स्मृतीना उजाळा देऊयात. अखिल मानव जातीच्या कल्याणासाठी बापूंनी आपले आयुष्य समर्पित केले.भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक प्रभावी व्यक्तिमत्त्व म्हणून इतिहासाने बापूंची नोंद घेतली आहे.ब्रिटिशांच्या अन्याय अत्याचाराविरुद्ध त्यांनी अहिंसा आणि सत्याग्रह या मार्गाचा अवलंब केला. भारतीय जनमत संघटित करुन सामान्य माणसांचा लढा उभारला.**

बापूंच्या आयुष्यात अशा अनेक घटना आणि प्रसंग घडले ज्यांनी बापूंच्या मनावर खोलवर परिणाम झाला.अशाच एका प्रसंगातून बापूंचा प्रामाणिकपणा आपणांस पहावयास मिळतो. लहानपणी एका भावाला कर्जातून सोडविण्यासाठी दुसऱ्या भावाच्या कड्यातून सोन्याच्या तुकड्याची चोरी छोट्या मोहनदासने केली अवश्य.पण नंतर त्याला आपली चूक समजली.मोहनदासला चैन पडेना.काय करावे ते समजेना.बराच वेळ विचार केल्यावर मोहनदासने आपल्या वडीलांना एक पत्र लिहिले.त्यात त्यांनी चोरी केल्याचे कबूल केले. आणि पुन्हा चोरी करणार नाही असे वचन दिले.आणि पुढे असेही लिहिले की वडीलांनी कितीही कडक शिक्षा दिली तरी वाईट वाटून घेणार नाही व ती शिक्षा आनंदाने सहन करेल.
मोहनदास अर्थात गांधीजी यांचे वडील आजारी असल्याने अंथरुणात झोपून असत.गांधीजी आपल्या वडीलांकडे पत्र घेऊन गेले.त्यांच्या हातात पत्र ठेवले. आणि त्यांच्या जवळच पलंगावर गुपचूप बसले. गांधीजींचे वडील उठून बसले आणि त्यांनी ते पत्र वाचले.पत्र वाचताना त्यांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. त्या अश्रूंचा असा परिणाम झाला की त्यांचे जीवन बदलले. मोहनदास पूर्वीपेक्षा कितीतरी चांगला मुलगा झाला. आपल्या मुलाचे धैर्य आणि खरेपणा पाहून गांधीजींच्या वडीलांचे हदय भरुन आले. त्यांनी गांधीजींनी न मारताच स्वतः दुःखी होऊन मोहनदासवर जो परिणाम घडवून आणला तो मारुन घडला नसता. मारापेक्षा प्रेमाचा मोहनदासवर खोल परिणाम झाला. प्रसंग साधा आणि छोटा परंतु गांधीजींच्या जीवनाला कलाटणी आणि वळण देणारा ठरला. गांधीजींच्या जीवनातील हा अहिंसेचा पहिला धडा होता. मोठे झाल्यावर याच अहिसेंच्या जोरावर त्यांनी इंग्रजांशी न लढताच त्यांना आपल्या देशातून जायला भाग पाडले. गांधीजींचे काम, त्यांचा खरेपणा, प्रामाणिकपणा आणि त्याग पाहून रवींद्रनाथ टागोरांनी त्यांना 'महात्मा ' म्हणायली सुरूवात केली. नंतर सगळा देश त्यांना ' महात्मा ' या नावानेच ओळखू लागला. स्वच्छता ,स्वावलंबन आणि सेवा ही मूल्ये स्वतःच्या जीवनात आचरणात आणून बापूंनी लोकांना सदवर्तनाचा धडा दिला. माणूस गरीब असो वा श्रीमंत त्याचा माणूस म्हणून सन्मान झाला पाहिजे यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले.
देशसेवा करत असताना गोरगरीब जनतेच्या हिताला प्राधान्य दिले. त्यांनी भारतीयांच्या मनात द्वेषाऐवजी प्रेमाची ज्योत पेटवली म्हणूनच शांती आणि अहिंसेचे प्रतीक असणारे गांधीजी सगळ्या जगाला हवेहवेसे वाटतात.....

**लक्ष्मण जगताप**



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# मुक्यांचा मूकनायक



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**बहुजन समाजाला बोलके करून बहुजन समाजाला न्याय हक्क प्रदान करण्यासाठी ३१ जानेवारी १९२० रोजी मुकनायक ची सुरुवात करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुक्या लोकांना बोलके केले. शिक्षणांची संधी नसेलेल्या, अक्षर ओळख नसलेल्या लोकांसाठी एक पाक्षिक सुरु करणे म्हणजे आंधळ्याच्या हाती दिवा देणे असेच होते. परंतू बाबासाहेब आंबेडकर यांना जाणीव होती हाच मुकनायक या समाजाचा दिशादर्शक होणार आहे. मुकनायक सुरु करण्यामागची खुप मोठी पार्श्वभूमी आहे.**

तत्कालीन प्रस्थापित वृत्तपत्र एकाच जातीच्या बाजुने काम करायचे. आजही फारसे चित्र बदलले असे मुळीच नाही, इलेक्ट्रॉनिक्स मिडिया ने तर सर्व मर्यादा ओलांडून आपली सरकार विषयी निष्ठा दाखवुन दिली आहे. भारतामध्ये विषमतावादी जाती व्यवस्था एक जात दुसऱ्या जातीपेक्षा श्रेष्ठ, अश्या विषमता वादी व्यवस्थेमध्ये समता प्रस्थापित करून धर्मामधील अंधविश्वास दुर करून विज्ञानवादी समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी मुकनायक उदयास आले. ब्रिटीशांचे राज्य भारतावर असताना ब्रिटिश भारतामध्ये अनिष्ट रूढी परंपरा बंद करून, शिक्षणाला प्राधान्य देऊन लोकांना सुशिक्षित करण्याचा प्रयत्न करत होते. लोकांना शिक्षण देणे व अनिष्ठ रुढीं बंद करणे म्हणजे वैदिक अर्थात ब्राह्मण धर्माच्या विरोधात काम करणे होय. ब्रिटिश धर्मामध्ये हस्तक्षेप करत आहेत म्हणून तत्कालीन उच्च वर्णिय लोकांना स्वातंत्र्याची मागणी लाऊन धरली. ब्रिटीशांनी भारताला स्वातंत्र्य देऊन भारतात स्वराज्य निर्माण व्हावे अशी काही लोकांची अपेक्षा होती. १९१६ ला लखनौ करार झाला. या करारामध्ये अस्पृश्य समाजाला राजकीय अधिकार नाकारल्या गेले.

अस्पृश्यांना कोणताच अधिकार देण्यात आला नाही. वर्ण व्यवस्थेने, जातीव्यवस्थेने यांना प्रगतीपासुन दुर ठेवलेच होते. परंतु ब्रिटिश सरकारकडून संधी सुद्धा या जातीय मानसिकतेच्या लोकांनी निर्माण होऊ दिली नाही. अस्पृश्यता निवारण करण्यासाठी विठ्ठल रामजी शिंदे यांनी डिप्रेस क्लास मिशन ची सुरवात केली परंतु या मिशनने अस्पृश्य समाजाचे राजकीय अधिकार नाकारले होते. राजकीय अधिकार नाकारणे म्हणजे प्रगती पासून दुर ठेवणे याची जाणीव बाबासाहेब आंबेडकर यांना होती. जातीय व्यवस्थेमुळे प्रगतीची दारे तर बंद होतीच परंतु अस्पृश्य लोकांवर अन्याय सुद्धा खुप होत असत. म्हणून बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडणे, जातीभेद नष्ट करून समता प्रस्थापित करणे व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना व भविष्यात उन्नती चे मार्ग याची खऱ्या अर्थाने चर्चा कुठे होत असेल तर ती वर्तमान पत्रात होते. म्हणून या लोकांना न्याय मिळावा म्हणून ३१ जानेवारी १९२० ला मुकनायकने छत्रपती शाहु महाराजांच्या मदतीने लोकांना बोलायला शिकवले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कडे पुरेसे आर्थिक पाठबळ नसताना छत्रपती शाहु महाराज यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे मुकनायक आर्थिक मदत करून सुरू ठेवले. मुकनायक च्या एकशे दोन वर्धापन दिनानिमित्त आंबेडकरवादी चळवळ व आंबेडकरवादी पत्रकारिता यांचे चिंतन केले तर मनाला खुप दुःख होईल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

ज्या मुकनायकने लोकांना अक्षर ओळख नसताना परिवर्तनाची मशाल पेटवली, उर्जा निर्माण करून स्वाभिमान जागृत केला त्याच समाजातील सुशिक्षित लोकांची आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातील पत्रकारीतेची काय स्थिती आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीला राज्य व राष्ट्रीय स्तरावर एकही वर्तमानपत्र आज पर्यंत मिळु शकले नाही अथवा सुशिक्षित लोक निर्माण करू शकले नाही. आज शिकलेले सवरलेले लोक समता प्रस्थापित करू शकले नाही. राजकीय अधिकार मिळून समाजाला त्याचा फायदा मिळु शकला नाही. अंधविश्वास निर्मुलन होण्यासाठी नाही तर अंधविश्वास पसरविण्यासाठी अनेक माध्यमे काम करत आहेत. ज्या समाजासाठी मुकनायक सुरु करून परिवर्तनाची चळवळ उभी केली त्या समाजाचा चळवळ चालवणारा व राज्य राष्ट्रीय पातळीवर प्रकाशित होणाऱ्या वर्तमानपत्राचा मुख्य संपादक सुद्धा होऊ शकला नाही ही खंत आहे. जातीवादी लोकांनी होऊ दिले नाही असे काहिंचे उत्तर येऊ शकते परंतु पैसा, हुन्नर, गुणवत्ता असताना आपण का नाही तसे वर्तमान पत्र निर्माण करू शकलो यांचा विचार मात्र कोणी करायला तयार नाही.




अडाणी लोकांना बाबासाहेब आंबेडकर यांनी वृत्तपत्र वाचायला शिकवून परिवर्तन करायला लावले. आज शिकलेले लोक पत्रकारिताला कमी लेखतात एवढे काही महाभाग विद्वान आहेत. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेवर चालणारे, मुकनायक ला आदर्श मानुन आपली पत्रकारिता करणारे व घराघरात वर्तमानपत्र असणारे असे एकही वृत्तपत्र नाही. काही लोकांनी चळवळ चालवण्यासाठी वर्तमानपत्र सुरु केले, मेहनत घेतली परंतु वर्तमानपत्र चालवण्यासाठी शाहु महाराज भेटले नाही. आणि आणि ज्याला वाचता येते त्याने चळवळीचे वृत्तपत्र घरात आणले नाही म्हणून काही वर्तमानपत्र पाहिजे तसे यशस्वी झाले नाही. काही लोकांनी वर्तमानपत्राला चळवळीचे वाचक व सहकार्य मिळत नाही म्हणून मिळेल तेथून जाहिरात व सहकार्य घेतले त्यामुळे त्यांना चळवळ करता आली नाही. चळवळीचे वर्तमानपत्र नाही असे लोकांची ओरड निर्माण झाली व वर्तमानपत्राला चळवळ सहकार्य करत नाही असे वर्तमानपत्राचे म्हणणे आहे. म्हणून नेमका दोष द्यायचा तरी कोणाला? हे सगळं झाले फक्त बाबासाहेब आंबेडकर यांना समजून न घेता स्वतः लाच बाबासाहेब समजायला लागल्यामुळे. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने स्वतः चे विचार दोन चार लोकांना सांगुन अनेक दुकाने थाटल्या गेले पण चळवळ व वर्तमान पत्र मात्र मागेच राहले. चळवळ मोठी करण्यासाठी व हक्क अधिकार अबाधित ठेवून आपली बाजु मांडण्यासाठी वर्तमानपत्र महत्वाची भुमिका घेते. पण आज चळवळ व वृत्तपत्र यामध्ये समन्वय नसल्याने चळवळीला पाहिजे तसे कव्हरेज मिळत नाही कारण वर्तमानपत्रावर काही बंधने असतात. थोडक्यात मला काम असले की मला कोणीच मदत करत नाही अशी ओरड असते, परंतु मी कोणाकोणाला मदत केली याचा लेखा जोखा कोणाकडेच नसतो. मुकनायक ने एकीची व समतेची हाक देऊन समाज संघटीत केला. आजची परिस्थिती बघितली तर हसु येते. मुकनायक ने निरक्षर लोकांना दिशा दाखवली परंतु साक्षर लोकांना दिशादर्शक असे वृत्तपत्र अस्तित्वात नाही हिच खुप मोठी खंत आहे. मुकनायकने मानवी स्वातंत्र्याचा आग्रह धरून आपली बाजू वारंवार मांडली आज बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले मानवी स्वातंत्र्य धोक्यात असताना सरकार दबाव निर्माण होईल किंवा आपले मानवी अधिकार सुरक्षित करेल असे वृत्तपत्र नसल्याने चळवळीचे तुकडे तुकडे झाले. लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या प्रसारमाध्यमांवर तत्कालीन अस्पृश्य व आजच्या अनुसुचित जातीच्या लोकांचा ताबा नाही म्हणून हि परिस्थिती आहे. आपले शेकडो तुकडे असल्याने उमेदवार निवडून आणून आपण आपली बाजु मांडू शकत नाही. कायदा क्षेत्रात पाहिजे तसे लोक नसल्याने न्याय मिळत नाही. प्रशासनात लोक नसल्याने कायद्याची अंमलबजावणी पाहिजे तशी होत नाही. राहिला एकच स्तंभ तो प्रसार माध्यम. याद्वारे सर्व नियंत्रीत करता येते परंतु शेकडो अडचणी असलेल्याने आणि वर्तमानपत्राचे महत्त्व न कळाल्याने लोकशाही चे गोडवे गाणाऱ्या व लोकशाही व बाबासाहेब आंबेडकर यांना डोक्यावर घेणाऱ्या लोकांकडे लोकशाहीचा एकही स्तंभ नसताना लोकशाहिच्या गप्पा मारणे म्हणजे केवळ आपल्या समाधानासाठी आपलीच पाठ थोपटून घेणे होय. मुकनायक ला शंभर वर्ष पुर्ण होऊनही आजपर्यंत राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर व्यवस्थेवर आसुड ओडणारे, लोकांचा आवाज उठवणारे वृत्तपत्र निर्माण होऊ शकले नाही म्हणून आंबेडकरवादी चळवळ विखुरली गेली. चळवळला वृत्तपत्र नसल्याने एक शिस्त राहली नाही म्हणून आंबेडकरवादी चळवळीच्या नावाखाली अनेक पक्ष संघटना कार्यरत असताना मात्र एवढ्यांना मिळून एक वृत्तपत्र वा एक वाहीनी निर्माण करता आली नाही हीच मोठी शोकांतिका आहे. आजही आंबेडकरवादी सामाजिक व राजकीय नेत्यांनी एकत्र येऊन चळवळीसाठी वृत्तपत्र व वाहीनी उभी केली तर सामाजिक विकास व सामाजिक अन्याय अत्याचार यावर भाष्य करेल आणि सध्या ची परिस्थिती बघितली तर इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांना लोकांचा आवाज सरकार दरबारी उचलावा लागतो याचा विसरच पडला. म्हणून एक निरपेक्ष, विषमतेविरोधात आपली भुमिका मांडणाऱ्या वृत्तपत्राची आवश्यकता आजही आहे. या अनुषंगाने काही चांगले निर्णय घेऊन आज गरज असलेले मुकनायक पुन्हा उदयास आणण्यासाठी बुद्धीजीवी वर्गाने तरूण वर्गाला मदत करून शाहु महाराजांची भुमिका पार पाडावी म्हणजे चळवळीलि गती निर्माण होऊन एक केंद्रीय वर्तमान पत्र निर्माण होऊन आपली बाजु हक्काने मांडली जाईल. तेव्हा लोकांकडे पैसा नव्हता तरही चळवळीला वृत्तपत्र होते. आज समाजातील लोकांकडे पैसा आहे परंतु चळवळीसाठी वृत्तपत्र नाही यातून चळवळ मोठी झाली की आपण चळवळ खुंटीत करत आहोत याचा विचार आज मुकनायक वर्धापन दिनानिमित्त केले तरी सकारात्मक उर्जा समाजात निर्माण होईल.

# परीक्षा पे चर्चा



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

आधुनिक केसरी

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांशी व पालकांशी परीक्षेच्या निमित्ताने संवाद साधला.यात ते म्हणाले की विद्यार्थ्यांनी चांगले प्रदर्शन केले तर त्यांनी अधिक चांगले प्रदर्शन करावे यासाठी त्यांच्यावर दबाव असतो.बरेचसे विद्यार्थी या दबावाला बळी पडतात. ते घाबरतात व ओझ्याखाली दबून जातात. परंतु विद्यार्थ्यांनी दबावाला बळी पडू नये. दबावाला सकारात्मक पद्धतीने घ्यावे व आपले उत्तम प्रदर्शन करावे. पालकांना उद्देशून ते म्हणाले की लोकांच्या अपेक्षापूर्तीसाठी विद्यार्थ्यांवर दबाव बनविणे चूक आहे.**

आपल्या पाल्याची क्षमता काय आहे हे ओळखून त्याच्यापासून अपेक्षा ठेवल्या पाहिजे. विद्यार्थ्यांना उद्देशून ते म्हणाले की वेळेचे नियोजन करा ते अतिशय आवश्यक आहे. यासाठी त्यांनी आईचे उदाहरणही दिले. आई सर्व काम वेळेत पूर्ण करून दाखवीते. व हे काम ती रोज करते या उदाहरणावरून विद्यार्थ्यांनी वेळेचे नियोजन शिकले पाहिजे असे ते म्हणाले.

तुकाराम महाराजांनी म्हटले आहे की "रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग" म्हणजे जीवनामध्ये आम्हाला प्रत्येक क्षणी युद्धाचे प्रसंग येत असतात आणि युद्धामध्ये विजयी होणे हे खूप आवश्यक असते. हे युद्धाचे प्रसंग म्हणजे परीक्षेचे प्रसंग आहे.प्रत्येक व्यक्ती परीक्षा म्हटले की घाबरून जातो. ज्या क्षणी आपला कस लागेल अशी परिस्थिती तयार होते त्या क्षणी प्रत्येक व्यक्ती घाबरून जातो.व एक घाबरलेला व्यक्ती त्याच्या अंगी असलेल्या क्षमतेनुसार प्रदर्शन करू शकत नाही. म्हणून परिणाम जो यायचा तो येईल परंतु विद्यार्थ्यांनी घाबरून कोणतेही कार्य करू नये. जे विद्यार्थ्यांना लागू आहे ते सर्वसामान्य लोकांना सुद्धा लागू आहे. दबाव म्हणजे प्रेशर ज्या वेळेला एखाद्या खेळाडूकडे चाळीस हजार लोक पाहत असतात की तो काय खेळतो आहे, कसा खेळतो आहे, त्यावेळी निश्चितच त्याच्यावर दबाव तयार झालेला असतो. परंतु दबावाचा जीवनामध्ये एक रोल आहे. प्रेशर कुकर मध्ये प्रेशर आहे म्हणून भात शिजतो प्रेशर नसेल तर तो शिजणार नाही. परीक्षेचे सुद्धा असेच प्रेशर आपल्यावर असते. जो अभ्यास आपण वर्षभर करू शकत नाही तो अभ्यास परीक्षेच्या आधी परीक्षेच्या दबावामुळे बरोबर आपल्या हातून केला जातो. या दबावाला सकारात्मक पद्धतीने घेतले पाहिजे. हिमालय कितीही उंच असला तरीही तो चढण्यासाठी टाकावे लागणारे पाऊल 75 सेंटीमीटर चे राहणार आहे. त्यामुळे आज मी किती पावलं टाकायची व किती मार्गक्रमण करायचे हे ठरविणे आवश्यक आहे. कशासाठी अभ्यास करायचा? कशासाठी परीक्षेत चांगले गुण मिळवायचे? हे ध्येय जर विद्यार्थ्यांसमोर नसेल तर तो ध्येयविहीन होतो व ध्येय विहीन विद्यार्थी पूर्ण परिश्रमानी अभ्यास करू शकत नाही. व त्यामुळे त्याला अपेक्षेप्रमाणे गुणही मिळू शकत नाही. म्हणून आपल्या डोळ्यासमोर उद्दिष्ट ठेवणे आवश्यक आहे. उद्दिष्ट असले म्हणजे काळ काम वेगाचे गणित तयार होते. ते उद्दिष्ट किती मोठे आहे, ते साध्य करण्यासाठी किती वेळ आपल्याजवळ उपलब्ध आहे व त्या उपलब्ध वेळात किती परिश्रम करण्याची आवश्यकता आहे याचे गणित मांडणे खूप आवश्यक आहे. बरेचदा विद्यार्थी प्रवाहामध्ये वाहत जात असतात. शाळा सुरू होते. एकामागून एक परीक्षा होत जातात व असं करता करता शेवटची मुख्य परीक्षा येऊन जाते. परंतु मुख्य परीक्षा ही होणारच आहे हे तर आपल्याला माहीतच आहे. त्यामुळे आधीपासूनच जर मुख्य परीक्षेवर लक्ष ठेवल्या गेले तर त्यासाठी लागणारा अभ्यास हा किती दिवसांमध्ये विभागून करता येईल हे ठरविणे सोपे होईल. त्यासाठी मला आज किती अभ्यास करायचे आहे हे सुद्धा निश्चित करता येईल. आज मला किती अभ्यास करायचा आहे हे निश्चित असले तर उरलेल्या वेळामध्ये खेळणे, टीव्ही बघणे, मित्रांसोबत बोलणे या कामांना वेळ देता येईल.

काही लोक खर्च करून नंतर मग पैशाची बचत करतात. परंतु असे म्हटले आहे की बचत प्रथम करा व नंतर खर्च करा. त्यामुळे अभ्यासासाठी लागणारा वेळ आधी काढून ठेवायला पाहिजे व त्यानंतर उरलेल्या वेळामध्ये मित्र, खेळणे, टीव्ही इत्यादी कार्यक्रम करायला पाहिजे. यालाच वेळेचे नियोजन असे म्हणतात. एका मुलाला विचारले की तुला चांगले गुण का मिळत नाही? तो म्हणाला मला अभ्यास करायला वेळ पुरत नाही. अभ्यास करायला वेळ तर तुला इतर सर्व विद्यार्थ्यां एवढाच दिलेला आहे. मग तो पुरत कसा नाही? तर तो म्हणाला की मी



सकाळी उठतो. उठल्यानंतर माझ्या घरी एक मांजर आहे. ती मला खूप आवडते. मी त्या मांजरीच्या डोक्यावरून शेपटीपर्यंत हात फिरवित राहतो. मग त्याला विचारले की तू असं किती वेळ करतो तर तो म्हणाला कमीत कमी अर्धा तास तरी करतो. मी असा हात फिरवल्याशिवाय मांजरीला बरेच वाटत नाही. म्हणजे पाण्याच्या हौदाला ठिकठिकाणी बारीक बारीक छिद्र असले तर त्या हौदातलं पाणी थेंब थेंब का होईना पण वाया जात राहील व हौद कधीही पूर्ण भरणार नाही. त्यामुळे तुमचा वेळ जर अशा पद्धतीच्या कामांमध्ये वाया जात राहिला, त्याची गळती होत राहिली तर तुमचा उद्दिष्टांचा हौद कधीही भरणार नाही. म्हणून अशी गळती थांबवली पाहिजे. माझा वेळ खाणारे लोक कोण आहेत? कोणामध्ये मी अधिकाधिक वेळ देतो हे लिहून काढले पाहिजे. म्हणजे लक्षात येईल की माझा वेळ कुठे जात असतो. महात्मा गांधी ना लॉर्ड माऊंटबॅटन भेटायला आले असता भेटीदरम्यान ते एकदम उठले व त्यांना म्हणाले माझ्या प्रार्थनेची वेळ झाली मी प्रार्थना करून येतो मग आपण पुन्हा बोलू. यावरून आपल्याला शिकण्यासारखे बरेच आहे. खेळत असताना, मित्रांसोबत बोलत असताना, टीव्ही बघत असताना जर आपल्या अभ्यासाची वेळ झालेली असेल तर आपल्याला लगेच लक्षात आले पाहिजे व आपण ताडकन उठून अभ्यासाला गेलो पाहिजे हे आवश्यक आहे. खेळण्याच्या, टीव्ही बघण्याच्या वेळा सुद्धा तुम्ही अशाच पळू शकता. परंतु विद्यार्थ्यांनी विद्यार्जना करता कटिबद्ध राहिले पाहिजे. विद्या ही कष्ट साध्य आहे. त्यामुळे तिच्या करता कष्ट करणे हे आवश्यक आहे.

काही लोकांना लहानपणापासून काहीतरी व्हायचे असते. जसे कोणाला डॉक्टर, कोणाला इंजिनियर, कोणाला पोलीस अधिकारी, कोणाला सैन्य अधिकारी, कोणाला शिक्षक परंतु हे सर्व बनण्यासाठी दहावी व बारावी पास करणे, उत्तीर्ण होणे आवश्यकच आहे. त्यामुळे आम्ही आज केलेला अभ्यास आज केलेले प्रयत्न हे आमचे उद्याचे ध्येय साध्य करण्यासाठी आहे हे जर विद्यार्थ्यांनी लक्षात घेतले तर त्यांना अभ्यासाचा कंटाळा येणार नाही. विद्यार्थ्याला तो करीत असलेले परिश्रम कशासाठी आहे हे माहिती पाहिजे म्हणजे तो सातत्याने अभ्यास करू शकेल.

असे म्हटले आहे की त्याने कधीही अपयशी होण्यासाठी योजना बनविली नाही तर तो योजना बनविण्यात अपयशी ठरला. अभ्यासाची सुद्धा योजना म्हणजे प्लॅन असला पाहिजे. जशी योजना असेल त्याप्रमाणे मला काय काय करायचे आहे हे कुठेतरी लिहिलेले असले पाहिजे. जे लिहिले आहे ते कोणत्या वेळेत करायचे त्याची वेळ सुद्धा तिथे नमूद असली पाहिजे. मग मला केलेल्या योजनेनुसार एक एक गोष्ट पूर्ण करायची आहे हे ठरविले पाहिजे. मोदीजी म्हणतात आवडत नसलेल्या विषयासाठी सुद्धा वेळ राखून ठेवला पाहिजे कोणाला. अभ्यास करणे आवडत नसेल म्हणून तो अभ्यास सोडून देऊ शकत नाही. उद्या आपल्याला नोकरीमध्ये करावयाचे काम आवडले नाही म्हणून आपण नोकरी सोडून देणार काय? त्यामुळे आपल्या आवडीचेच विषय आपल्याला शिकायला मिळेल असे नाही तर आवड नसलेले विषय सुद्धा शिकायला मिळू शकतात. त्यामुळे ज्यांची परीक्षा द्यायची आहे त्या विषयांमध्ये आवड निर्माण करणे हे आवश्यक आहे. आजचे विद्यार्थी हे उद्याचे नागरिक आहेत यांच्यातूनच भावी डॉक्टर, इंजिनियर, वकील, कायदे तज्ञ, संरक्षण तज्ञ, वैज्ञानिक निर्माण होणार आहे. या विद्यार्थ्यांच्या समोर आज अनेकानेक प्रकारचे प्रलोभन आहेत. या सर्व प्रलोभनांना बाजूला सारत माझे ध्येय मी प्राप्त करील अशा पद्धतीचा ध्येयवादी विद्यार्थी बनणे आवश्यक आहे. पालकांनी सुद्धा विद्यार्थ्याला असे ध्येयवादी बनविण्यासाठी मदत करणे अपेक्षित आहे. देशाचे पंतप्रधान या गोष्टीचे महत्त्व ओळखून विद्यार्थ्यांशी संवाद साधतात ही गोष्ट अतिशय महत्त्वाची आहे. त्याबद्दल पंतप्रधानांचे अभिनंदनच करायला पाहिजे.

# गुजरात दंगल का उकरून काढली जात आहे ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**गुजरातमध्ये २००२साली झालेल्या दंगली च्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री आणि विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना क्लीन चिट दिल्यानंतर परत एकदा मोंदी विरोधात वातावरण तयार करण्यात देश व विदेशी शक्ती षडयंत्र आखत असल्याचे दिसून येत आहे.**

आंतरराष्ट्रीय वृत्तवाहिनी 'बीबीसी'ने अलीकडेच भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गुजरात दंगलीबाबत एक माहितीपट प्रदर्शित केला आहे. बीबीसीने 'इंडियाः द मोदी क्वेशन' नावाच्या माहितीपटातून गुजरात दंगलींमध्ये तत्कालीन गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. यामध्ये गोधरा हत्याकांड आणि त्यानंतर उसळलेल्या दंगली या घटनांशी संबंधित राजकीय नेते, पत्रकार आणि पीडित लोकांच्या प्रतिक्रिया दाखवल्या आहेत.
नरेंद्र मोदी यांच्यामुळेच गुजरात दंगलीमध्ये अनेक निष्पाप लोकांचे प्राण गेले, अशाप्रकारचं चित्रण या माहितीपटातून करण्यात आलं आहे.
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरील माहितीपटाची वेळ स्पष्टपणे दर्शवते की तो का प्रदर्शित झाला आहे.
येत्या काळात देशातील ९ राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत, तर त्यानंतर लगेचच २०२४ मध्ये लोकसभेच्या निवडणुका होणार आहेत.
आपल्याकडे देशाबाहेर तसेच आत भारतविरोधी लोक आहेत, जे वेळोवेळी असे करतात आणि पंतप्रधानांची प्रतिमा खराब करण्यासाठी काहीही करू शकतात.
नरेंद्र मोदींची लोकप्रियता कमी होऊ शकते, असा अंदाज पूर्वी होता, पण आता आलेले सर्वेक्षण आणि गुजरात निवडणुकीच्या निकालांवरून नरेंद्र मोदींची लोकप्रियता कमी होत नसून वाढत असल्याचे दिसून आले आहे. भारत हा एक चमकता तारा आहे, असे विदेशी मंचांवरही बोलले जात आहे. भारताला नुकतेच जी २० चे अध्यक्षपद मिळाले आहे. हे पाहून भाजप-आरएसएस विरोधक अडचणीत आले आहेत.

**तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न**

बीबीसीच्या माहितीपटात एक थीम देण्यात आली आहे, जेणेकरून पीएम मोदींची प्रतिमा डागाळली जाईल. पीएम मोदींवर पुन्हा प्रश्न उपस्थित करण्याचा प्रयत्न केला जात आहे. गुजरात दंगली विसरलेल्या भारतातील लोकांना त्याची आठवण करून दिली जात आहे, त्यामुळे तणाव निर्माण झाला आहे.
गुजरात दंगलीवर एवढा मोठा डॉक्युमेंट्री दोन भागांत कोणत्याही माध्यम संस्थेने आणली तर त्यामागे कोणताही चांगला हेतू असू शकत नाही.
बीबीसीने गोध्रा घटनेची अगदी सुरुवातीलाच चर्चा केली आहे, ज्यामध्ये असे लिहिले आहे की ट्रेन जाळल्यामुळे हा परिसर अजूनही वादग्रस्त आहे पुढे असे म्हटले आहे की याचा आरोप मुस्लिमांवर करण्यात आला होता. गोध्रा ट्रेन जळीतकांडाची संपूर्ण चौकशी झाली असताना, हायकोर्टाने फाशीची शिक्षा दिली आहे... आणि या सगळ्यानंतरही तुम्ही याला वादग्रस्त म्हणत आहात. हे एक चांगले कारण कसे असू शकते ?

**सुप्रीम कोर्टाकडून क्लीन चिट**



गुजरात दंगली प्रकरणी सुप्रीम कोर्टाने ४०० पेक्षा जास्त पानांचा निर्णय दिला आहे. ज्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, कोणत्याही दृष्टिकोनातून पाहिल्यानंतर गुजरातमधील हिंसाचारात नरेंद्र मोदी किंवा तत्कालीन सरकारची भूमिका नव्हती. एसआयटीचा तपास योग्य असून त्यात बदल करण्याची गरज नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले. यासोबतच हे प्रकरण वारंवार कोर्टासमोर आणणाऱ्यांची चौकशी झाली पाहिजे, असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. त्यात काही अधिकारी आणि काही स्वयंसेवी संस्थांचाही समावेश आहे. एकीकडे सर्वोच्च न्यायालय हे सांगत आहे आणि दुसरीकडे बीबीसीची ही माहितीपट आहे.
बीबीसीने सांगितले की, २०१२ मध्ये आलेला तपास अहवाल आमच्या हाती लागला, १० वर्षांनंतर अचानक हा अहवाल बीबीसीच्या हाती कसा लागला. अहवाल प्राप्त झाल्यास, तो प्रथम अहवाल किंवा ब्रेकिंग म्हणून चालविला जातो. त्याची डॉक्युमेंटरी बनलेली नाही. असे का केले गेले हा प्रश्न आहे.
भारतात तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न आहे का, मुस्लिम देशांशी असलेले आपले चांगले संबंध बिघडवण्याचा प्रयत्न आहे का ? निवडणुकीपूर्वी देशात अराजकता दाखविण्याचा प्रयत्न आहे का ? २००२ च्या दंगलीपासून आणि त्याआधीही बीबीसीची भूमिका अशीच आहे.

**कठोर कारवाईची गरज**

आपण बीबीसीला दोष देऊ शकतो पण आपल्या देशातच असे लोक मोठ्या संख्येने आहेत ज्यांना विचारसरणी म्हणून कोणत्याही नेत्याशी किंवा पक्षाशी काही अडचण नाही... पण इथे हा निषेध द्वेषावर आधारित आहे. ही संघटना मुस्लिमविरोधी असल्याचा अपप्रचार या लोकांनी केला आहे, जो कधीच सिद्ध झालेला नाही. गुजरात दंगलीच्या नावाखाली अनेकांनी कोट्यवधी रुपये कमावले. मोदी सरकार आल्यानंतर जगभरातील सर्व एनजीओ आणि संघटनांना धोका निर्माण झाला होता, त्यामुळेच अशा बातम्या समोर येत आहेत. हैदराबाद आणि जेएनयूमध्ये जे काही घडत आहे, त्यात आपल्या देशातील ते लोक सामील आहेत, ज्यांना आपल्या देशाची एकता आणि अखंडता तोडायची आहे.  स्क्रिनिंग करणाऱ्यांवर कठोर होण्याची गरज आहे, त्यांचा निषेध व्हायला हवा आणि कायदेशीर कारवाईही व्हायला हवी. कारण देश सुरक्षित असेल तरच आपण सर्व सुरक्षित राहू. नरेंद्र मोदी आज आहेत, उद्या नाहीत, असे वातावरण निर्माण करणे चुकीचे आहे.  डॉक्युमेंट्रीमुळे विरोधकांचे नुकसान होणार आहे, विरोधकांकडे कोणताही मुद्दा नाही, येत्या निवडणुकीत या प्रकरणाचा वापर करणार आहे. धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली मुस्लिमांना एकत्र करून भाजपविरोधात मतदान करण्याचा प्रयत्न केला जाईल. मोदींविरोधात भाषणबाजी झाली पाहिजे, असे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाईल.
निवडणुकीत हा मुद्दा समोर येईल, पण त्याचा परिणाम भाजप आणि नरेंद्र मोदी यांच्या बाजूने होईल, असा विश्वास लोकांमध्ये आहे. भाजप आणि मोदीजींना फायदा होणारे मुद्दे ते मांडतात हे विरोधकांना समजत नाही. ही डॉक्युमेंट्री चालवली तर त्याचा फायदा भाजपलाच होईल.

# EPS - 95 स्कीम काय आहे ?

आधुनिक केसरी

**आपणास माहीतच आहे की, औद्योगिक क्षेत्रातील कामगार/ कर्मचाऱ्यांच्या EPS-95 योजने संदर्भात निवृत्ती वेतन (Pension) वाढी संबधीत 2015 पासून कामगार स्थापित NAC ( National Agitation Committe) चे राष्ट्रीय अध्यक्ष कॅप्टन अशोकजी राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली सरकारशी बोलणी चालू आहेत. यात औद्योगिक क्षेत्राबरोबर, एम.एस.ई.बी, एस. टी महामंडळ, सहकारी सूत गिरणी, जिल्हा सहकारी बॅका, भूविकास बॅक, फेडरेशन यां संस्थेमधील कामगार/कर्मचाऱ्यांचा पण समावेश आहे. ही एक पेन्शन स्कीम आहे.**

ही 15 नोव्हेंबर 1995 मध्ये EMPLOYMENT PROVIDENT FUND OFFICE ( भविष्य निर्वाह निधी ) ने कामगारांसाठी अंमलात आणली. या आधीच्या काळात म्हणजे ही स्कीम सुरू होण्यापूर्वी कंपनी कामगाराच्या पगारातून दर महिना त्याच्या मूळ वेतनाच्या 12% रक्कम ( EMPLOYEE CONTRUBUTION ) कापून त्यात कंपनी तितकीच रक्कम 12% ( COMPANY CONTRUBUTION ) टाकून ती दर महिन्यात पी. एफ ऑफिसला कामगाराच्या खात्यात जमा व्हायची. ही रक्कम व्याजासकट किती झाली याची सविस्तर पावती दरवर्षी कामगारास PF ऑफिस मधून मिळत असे. प्रत्येक कामगारास निवृत्तीनंतर ही पूर्ण रक्कम (OWN AND COMPANY CONTRIBUTION) व्याजासकट एक रकमी मिळत असल्यामुळे मुला / मुलीच्या ऊच्च शिक्षणासाठी, लग्नासाठी, व्यवसायासाठी काही रक्कम वापरून उर्वरीत रक्कम आपल्या (नवरा/ बायकोच्या ) ऊदर्निर्वाहासाठी बॅकेत मुदत ठेव ( FIX DEPOSIT ) योजने मध्ये गुंतवून दर महिना व्याजावर घर खर्चासाठी पैसे काढता येत होते. आता 15 नोव्हेंबर 1995 ला ही नवीन स्कीम अमलात आल्यामुळे कंपनी हिस्स्याच्या 12% (COMPANY CONTRIBUTION) पैकी 8.33% रक्कम (RS.541/-) प्रत्येक कामगारांची दर महिन्यात पेन्शन स्कीम कडे जमा करण्यात येत होती आणि हीच रक्कम निवृत्तीनंतर पेन्शन म्हणून दर महिना प्रत्येक कामगारास जिवंत असेपर्यत RS. 500/- ते RS.2000 ( BASED ON FIX FORMULA ) पर्यंत मिळत आहे. उर्वरित 1.67 % रक्कम ही PF खात्यातून कामगाराच्या निवृत्तीनंतर OWN CONTRUBUTION बरोबर दिली जात असे. ही पेन्शन नक्की कुठल्या आधारावर निश्चित केली याबद्दल बरेच कामगार आजही संभ्रमात असल्याने, काही जण वैयक्तिक रित्या कोर्टात गेले आहे तर काही NAC कामगार संघटनेमार्फत 2015 पासून लढा देत न्याय मागत आहे.  निवृत्तीनंतर मिळत असलेली दर महिना रक्कम अतिशय कमी असल्याने ती वाढवून कमीत कमी RS. 7500 + DA अशी देण्यात यावी आणि कुटूंबास (नवरा / बायको) याना मोफत औषधोपचाराची सवलत द्यावी ही 67 लाख कामगारांची मुख्य मागणी आहे.
कामगार संघटनेचा संघर्ष  आपल्या पेन्शनर्स असोसिएशनचे (राष्ट्रीय संघर्ष समिती NAC) अध्यक्ष कमांडर श्री. अशोकजी राऊत आणि संघटनेचे राष्ट्रीय पदाधिकारी आणि ईतर कामगार संघटना सतत परिश्रम करत याविषयी जिल्हा, राज्य आणि देश पातळीवर शांततेत मोर्चे, धरणे, साखळी उपोषण करत आहे . देशातील सर्व कर्मचाऱ्यांचा EPS -95 स्कीमच्या राष्ट्रीय संघटनेला (NAC) संपूर्ण पाठिंबा आहे आणि म्हणूनच देशभरातून लाखोंच्या संख्येने कार्यकर्ते या संघटनेशी जोडले जाऊन त्यांचा या कार्यात प्रत्यक्ष सहभाग आहे. सरकारमधील विधानसभा आणि लोकसभेतील आमदार, खासदार, कामगार मंत्री, प्रशासकीय अधिकारी यांच्या समवेत वेळोवेळी चर्चा होऊन आदरणीय पंतप्रधान श्री. नरेन्द्र मोदी यांचीही दोन वेळेस भेट घेऊन त्यांनी या मागण्यांबाबत सकारात्मक धोरण देत यावर नक्कीच विचार होईल अशी आशा व्यक्त केली आहे. पण अजूनही हा विषय प्रलंबित आहे. सदुसष्ट लाख कामगार आणि कर्मचारी आपल्या आयुष्यातील 30-35 वर्ष खाजगी संस्थेत मेहनतीने आणि प्रामाणिकपणे नोकरी करून आपल्या कुटुंबाचे पालन पोषण केले आणि विशेष म्हणजे कंपनीच्या म्हणजेच पर्यायाने देशाच्या अर्थिक प्रगतीमध्ये, विकासामध्ये आपला अमूल्य वाटा दिला असे म्हणणे वावगे ठरणार नाही. सदुसष्ट  लाख कर्मचाऱ्यांच्या अखंड सेवेतून उत्पादित मालाची विक्री या देशात आणि परदेशात प्रचंड प्रमाणात होत असल्याने देशाची अर्थिक उन्नती होण्यास या कामगारांची नक्कीच मदत झाली असेल यात तिळमात्र शंका नाही. परंतू आज दुर्दैवाने या कामगारास निवृत्तीनंतर RS. 500-2000 पर्यंत पेन्शन मिळत आहे.
निवृत्त कामगार/ कर्मचाऱ्यांची दयनीय अवस्था या तटपुंज्या पगारात आजकालच्या सतत वाढत्या महागाईच्या काळात निवृत्ती नंतर नवरा बायकोचा खर्च कसा भागणार हे मोठे संकट त्याच्यावर आले आहे. कुटूंबातील 90% जेष्ठ नागरिक हे बीपी, डायबिटीजचे पेशंट असल्याने महिना दोन ते तीन हजार रूपये महिना निव्वळ औषधचाच खर्च आहे. कित्येक जणांना ह्दय, किडनी, लिव्हर, प्रोस्टेट, डोळे, गुडघे संबधित आजारामुळे सर्जरी करावी लागत आहे. बरेचसे नागरीकाकडे ईन्सुरन्स नसल्याने खाजगी दवाखान्या ऐवजी सरकारी दवाखान्यात दाखल करावे लागले. पेशंटची अर्थिक परिस्थिती बिकट असल्याने शिवाय योग्य वेळेस औषधोपचार न झाल्याने काही जण मरण पावले आणि आजही काही याच मार्गावर वर आहे. काही कामगार लोकांना पाचशे रूपये निवृत्तीवेतन मिळते त्यात खाणार काय आणि औषध कुठून आणणार म्हणून काही जण छोटा व्यवसाय करीत आहे पण भांडवल कमी पडते आहे शिवाय शरीर साथ देत नाही म्हणून व्यवसाय बंद होऊन भिक मागायची वेळ आली आहे.
जेष्ठ नागरिकावर एक सशक्त, सुशिक्षित आणि सुसंस्कृत पिढी घडविण्याची जवाबदारी असते. पण ईतके वर्ष काम करून त्याच्या मूलभूत गरजाच ( अन्न, वस्त्र, निवारा) पूर्ण होत नसतील तर पुढील पिढीकडे कसे लक्ष देणार? आधीच आपण एकत्र कुटूंब पासून दुर गेल्याने घरात एकटाच नौकरी करणारा मुलगा, पत्नी, आई, वडील, नातवंडे ऐवढे माणस घरात असतील तर घरात अर्थिक किवा कौटुंबिक विषयावर सारखे खटके उडत असतात. या त्रासामुळे शहरातील अशी बरीच जेष्ठ नागरीक कंटाळून वेगळे घर करून राहतात किंवा वृद्धाश्रमात जाऊन राहण्याचा निर्णय घेत आहे.
आधीच्या सरकारने आमच्याच बाबतीत असे दुटप्पी धोरण का वापरले ? आम्हाला खोटी आशा दाखवून सरकारने 16 नोव्हेंबर 1995 ला कामगाराच्या ऊज्वल भविष्यासाठी ही EPS-95 पेन्शन स्कीम अमलात आणली खरी पण यामधील सविस्तर माहीती कामगारापर्यत नीट समजून सांगितली नाही. नौकरीत असतांना प्रत्येक कामगारांच्या पगारातून दर महिन्याला RS.541/- असे सतत निवृत्तीपर्यंत कापून तो पैसा सरकारने शेअर मार्केट मध्ये टाकून त्यावर भरपूर व्याज कमवत सरकारने मोठी रक्कम कमविली पण कर्मचाऱ्यांवर मात्र भिकेची पाळी आणली ती केवळ महिना रूपये 500 - 2000 निवृत्ती वेतन  देऊन ? शिवाय निवृत्तीनंतर मिळालेली ची थोडी रक्कम मुदत ठेव म्हणून बँकेत आहे त्यावर पूर्वी 10% व्याज मिळायचे ते आता पाच ते सहा टक्क्यावर आले आहे. बरीचशी कर्मचारी (ते ऑफिसर, मॅनेजर) नौकरीत असतांना पगार चांगला होता पण निवृत्तीनंतर त्यांच्या हातात 2000 ते 2500 पेन्शन मिळत आहे. आज आमचाच पैसा आम्हास मिळण्यासाठी सरकारकडे भिक मागावी लागत आहे. करोडो रूपये या स्कीम अंतर्गत सरकारच्या तिजोरीत नुसते पडुन आहे . मनात आले तर सरकार त्याच्या फक्त व्याजावर आमच्या मागण्याची आयुष्यभर पूर्तता करू शकते.
ईतर देशात जेष्ठ नागरिकास अतिशय सन्मानाने वागवले जाते . शासकीय किवा निमशासकीय लोकांना निवृत्तीनंतर जी पेन्शन मिळत असते त्यात ते आनंदाने जगतात. शिवाय मरेपर्यंत मोफत ऊपचार आणि औषधोपचार सरकार देते. आपल्या देशातही केन्द्र आणि राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना, स्वातंत्रविराना, सैनिकांना, शिवाय आमदार, खासदार (प्रशासकीय सेवेत नसताना ) भरपूर पेन्शन आहे. ईतराना काय मिळते याबद्दल आमचा वाद नाही, पण आमच्या क्षेत्रातील कामगारासच असे सावत्रपणाची वागणूक का मिळत आहे? आम्ही देशाच्या उन्नतीसाठी / प्रगतीसाठी काम केले नाही का ? कुठपर्यंत आम्ही वाट पाहत राहणार? किती लोकांचे शाप सरकार घेणार? आम्ही दुबळे आहोत, असंघटित आहोत म्हणून ही वागणुक ? अखेर सहनशिलतेला एक मर्यादा असते. आज देशभरातील सर्व कामगार कॅ. राऊत यांच्या प्रखर नेतृत्वाखाली येऊन सरकार पुढे न्याय मागत आहे. यासाठी संघटनेचे पदाधिकारी सतत सरकार बरोबर या गोष्टीचा पाठपुरावा करून आपल्या मागण्या शांतपणे मांडत आहेत. पण अजूनही या सरकारवर आमचा विश्वास आहे की आदरणीय पंतप्रधान या निवृत कामगांरास नक्कीच न्याय देतील. त्यांचे भले करतील. आपण नशीबवान आहोत की या सरकारमधील बरीच नेते मंडळी या प्रश्नावर सकारात्मकता दाखवत मदत करत आहेत त्यात आदरणीय खा. हेमामालिनी यांचा उल्लेख करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांना मनःपूर्वक धन्यवाद की त्यांनी वेळात वेळ काढून आमच्या संघटनेची मागणी संबधित मंत्री आणि आदरणीय पंतप्रधान यांच्यापर्यंत पोहचवली. आजही त्या सतत प्रयत्नशील आहेत. तसेच आदरणीय पंतप्रधानांना देखील मनःपूर्वक धन्यवाद की त्यांनी आपल्या व्यस्त कार्यक्रमातून आम्हाला वेळ देऊन आमचे म्हणणे ऐकून घेतले आणि सकारात्मकता दाखवली.
आपण नशीबवान आहोत की या देशाला आदरणीय श्री. नरेन्द्र  मोदी सारखे पंतप्रधान लाभले ज्यांचे ध्येयच मुळी सामान्य जनतेच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याचे आणि त्यासाठी कार्यतत्पर राहण्याचे.
आज आम्हाला सांगण्यात आनंद आहे की या देशातील नागरीकाला सशक्त, बलवान, आत्मनिर्भर, सुरक्षित, शिक्षित, सुसंस्कृत करण्यास आदरणीय पंतप्रधान यांचे सतत लक्ष देत आहे आणि दिवसरात्र ते कष्ट करत आहे. या देशाला परमवैभवला नेण्यासाठी त्यांनी सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, क्षेत्रात सकारात्मक बदल करत कृषी, उत्पादन, सहकार, शिक्षण, व्यवसाय, पर्यावरण संरक्षण आणि / सुरक्षितता यात तरूण वर्ग कसा पुढे येऊन आत्मनिर्भर बनेल याकडे त्यांचे बारकाईने लक्ष देत आहेत. तरूण स्त्री वर्गाला प्रत्येक क्षेत्रात संधी देऊन त्यांना स्वावलंबी, सक्षम करण्याचा प्रयत्न करत आहे. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आपला देश कसा स्वावलंबी आणि सुरक्षित राहील याकडे त्यांचे सतत बारकाईने लक्ष असते.
अश्या व्यस्त कामातून सुद्धा त्यांनी आमच्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली व संबधित शासकीय अधिकारी वर्गाला याबाबत सूचना दिल्या याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद.
सरकारने या विषयावर लवकरात लवकर निर्णय घेऊन आमच्या मागण्या मान्य कराव्यात. प्रत्येक कामगार / कर्मचाऱ्यास दर महिना कमीत कमी RS.7500 /- + DA ) निवृत्तीवेतन तसेच कुटूंबातील नवरा बायको यांना मोफत औषधोपचाराची सवलत मिळावी या मागण्या आहेत आम्हाला आशा आहे की, (आता जास्त विलंब न करता) या बजेट मध्ये आदरणीय पंतप्रधानांच्या हातून आम्हा कामगारांस लवकरच न्याय मिळेल आणि लाखो लोकांचे उर्वरीत आयुष्य सुखाचे आणि आरोग्याचे जाईल हीच परमेश्वरी प्रार्थना. येणाऱ्या 2024 च्या लोकसभेच्या निवडणुकीत आम्ही सर्व जेष्ठ नागरिक आपल्या सोबत आहोत आणि आपल्या पक्षाचा प्रचंड विजय होईल यात तिळमात्र शंकाच नाही. आपण परत या देशाचे पंतप्रधान राहणार ही नवीन वर्षाच्या सुरवातीला आम्हा 67 लाख कामगारा तर्फे मनापासून शुभेच्छां.
सर्व कामगार/कर्मचारी बंधूनी हा लेख वाचून आपल्या भावना व्यक्त कराव्या ही विनंती.

**मधुकर पोहनेरकर,**
**पुणे, 9765402119**

# मायरान : संजीवकुमार भोसले या तरुण कवीच्या बोलीभाषेतून व्यक्त झालेल्या निरागस कविता

## संयमाचा परीघ





चित्र : बाबूराव पाटील, भोकर

प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226

भाग : १३

आधुनिक केसरी

कवी संजीवकुमार म्हणजे इंद्रायणी आणि प्रभाकर भोसले हिंपरनेर, ता. चाकूर, जि. लातूर येथील कष्टकरी आई-बापाचा संवेदनशील मुलगा.एम ए हिंदी केलं आहे. लातूरला आणि लगेच नेट परीक्षाही पास झालेला आहे. गाव हिंपळनेर आणि आजोळ कोष्टगाव. सरकारी नौकरी नाही त्यामुळं घरच्या शेतीत आणि शिवारातल्या शेतीत अंगमेहनत हाच रोजी रोटीचा मार्ग. वडील शेतीतलीच पेरणी पासून ते काढणी आणि त्यानंतरची पेरणीपुर्व मशागतीची कामं करत राहिली आणि आई सावली सारखी बापासोबत खुरपणं, खुडणी, येचणी, खळेदळे करत कुटुंबाचा चरीतार्थ चालवत लेकरं शिकवत राहिली. अपार कष्टाचे डोंगर उचलत या कुटुंबियांनी पोट कापू कापू लेकरं शिकवली. महाविद्यालयीन वातावरणाचा शहरातली हवेचा कसलाच दुष्ट परीनाम न होवू देता शिकत रहाणं तसं सोपं नाही. तरुणाई व्यसनांनी आणि राजकारण, समाजकारणांनी मूळ शिक्षणया मसुदुयापासून दुरावलेले पहातो आपण परंतू तसा कसलाच परीनाम संजीवकुमारनं स्वतःवर न होवू देता निमूट आपल्या अध्ययन आणि सहशिक्षण उपक्रमांनी सहभागी होत विकसीत होत राहिला. कधी मधी कोष्टगाव या आमच्या आजोळी महादेवाच्या जत्रेच्या निमित्तानं गणगोताच्या गाटीभेटी पडतात आणि जिव्हाळ्याचं पुनरुज्जीवन होतं या भावनेपोटी हमखास जाणं येणं व्हायचं, तेंव्हा संजीवकुमार हमखास भेटून आपल्या शैक्षणिक प्रगतीचा अहवाल मला सांगायचा. मला त्साची विनयशील कमालीची प्रभावित करुन गेली. तो एम ए आणि सेट परीक्षा पास झाला तेंव्हा आता सुरळीत होईल सगळं वाटल. होतं त्यालाही आता सात आठ वर्षे होत आहेत आणि महाराष्ट्र शासनानं या ना त्या कारणांनी शिक्षण क्षेत्रातील भरती मोहीम राबवली नाही, ज्याचा फटका मागील दहा वर्षा पासून पदवी पदवीधर होवूनही पात्रता प्राप्त करुनही लेकरं रखडले आहेत. या आजवर विनाअनुदान आणि विनानोकरभरती शिक्षण प्रक्रीया राबवणाऱ्या सरकारांना तरुण पिढ्या अक्षरशः कुजवल्या आहेत, अधू अपंग करुन ठेवल्या आहेत. अगतीकतेनं तोंड दाबून बुक्क्यांचा मार खाणाऱ्या पिढीचा प्रतिनीधी म्हणून संजीवकुमार माझ्या समोर उभा आहे. फरक एवढा की त्याची आपुलकी, जिव्हाळा, विनयशिलता, विवेक आणि विद्वता अजून तशीच आहे जशी मला सात आठ वर्षांपुर्वी असल्याचे जाणवले होतं. या क्रुर काळाने प्रचंड छळूनही साहित्याच्या आभ्यासाने, परीस्थितीच्या चटक्यांनी आणि अंगभूत चांगुलपणांनी त्याचं धैर्य ढासळू दिलं नाही.मनावर आलेली प्रचंड दडपणं तो कल्पकतेनं कवितेतुन मांडत आला. ही कविता सोबत नसती तर कोलमंडून पडला असता. परवा किनगावला मल्हारराव होळकर माध्यमिक व उच्चमाध्यमिक विद्यालयात स्नेही शिक्षक कवी शिवाजी नामपल्ले यांच्या आधारवड; या कविता संग्रहाच्या प्रकाशन समारंभाला गेलो होतो. जोडूनच कविसंमेलनाच्या वेळी संजूची गाट पडली आणि आश्चर्य म्हणजे कविसंमेलनात त्याची कविता ऐकली. हा माझ्यासाठी आश्चर्याचा मोठा सुखद धक्का होता कारण यापूर्वी कधीच त्यानं कविता लिहितो असं चुकूनही सांगीतलं नव्हतं. तारुण्य सुलभ भावना आणि धडाकेबाज सादरीकरण त्यामुळं उपस्थितांच्या मनाची पक्कड त्यानं कधी घेतली आणि कधी आणि किती टाळ्यांचा पाऊस पडत राहिला त्याची गिणती नाही. कविता संपली तेंव्हा उत्सफुर्त एका आवाजात सगळ्याच तरुण लेकरांनी त्याला वन्स मोअर वन्स मोअरची साद घातली तेंव्हा तर माझ्या आनंदाला पारावार राहिली नाही. कविसंमेलनाचा अध्यक्ष मीच होतो आणि सूत्र संचालनासाठी महाराष्ट्राचे ख्यातकिर्त कवी आणि सूत्रसंवादक, माय मराठी चॅनलचे डायरेक्टरखुद्द राजेसाहेब कदम होते. मंचावर किनगावचं भूषण आणि दर्जेदार कविता लिहून धडाकेबाज सादरीकरणही करणारे मान्यवर कवी बालाजी मुंडेही होते. आम्हा सगळ्यांनाच ही संजूची ही नवी ओळख बोता. तमाम उपस्थितांच्या वन्स मोअरला अभिवादन करत त्याने अगदीच विनयशिलतेने कवितेचा मुखडा तेवढा गायला आणि आपली जागा घेतली. संजीवची ही विनयशील कृती आणि अगोदरचं सादरीकरण माझ्या अंतःकरणात खोलवर घर करुन राहिलं. नंतर कार्यक्रमाचे फोटो आणि बातम्यांच्या संदर्भानं कौतुकाचं बोलणंही झालं. त्यानं आठवनीनं मला वॉट्सअपवर कांही किरकोळ बोलत राहिलो आम्ही कवी नामवदे सराच्या आणि एकुणच कविता आणि कार्यक्रमाच्या संदर्भानं आणि अचानक या मायरान कविता संग्रहाला प्रस्तावना लिहिण्यासाठी सांगितलं. मला वाटलं असेल कोणी अहमदपूर, किनगाव परीसरातील कवी मित्र परंतू त्याने त्याचाच कवितासंग्रह टंकलिखीत स्वरुपात करुन ठेवल्याचं सांगून लगेच त्याची पीडीएफ कॉपी वॉट्सअपवर पाठवली आणि दुसरा मोठा धक्का दिला. सायंकाळी इव्हीनींग वॉक दरम्यान सुरुवातीच्या पाच पंचेवीस कविता सलग चाळल्या आणि मनोमन सुखावून गेलो. त्याच्या जगल्या-भोगल्याचा जसाचा तसा सगळा इतिहासच डोळ्यासमोर उभा राहिला माझ्या. ही असा आठवनी जाग्या करणाऱ्या कवितांची ही संहिता आहे. उद्या उरलेल्या कविता प्रिंट काढून सविस्तरनोंदी घेत घेत वाचू म्हणून जो ठेवला तो नंतर खूप दिवस महाविद्यालयाच्या कामांमुळं चाळता आला नाही. परवा मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्तानं अंबाजोगाईत छान कविसंमेलन झालं आणि संजीवकुमारची आवर्जून आठवन आली. दरम्यानच्या काळात परळीचा आणि अर्थातच महाराष्ट्राचा सुप्रसिद्ध कवी आणि मुख्याध्यापक अरुण पवार यांच्या दहावी-बारावीच्या लेकरांच्या निरोप समारंभाला अरुणनं बोलावूनही मला जाता आलं नाही.या अशा लगबगीत संजीवकुमारच्या कवितांचं बाड तसंच पडून राहिलं आणि त्याचे वारंवार फोन येत राहिले.मी म्हणालो त्याला, बाळ थांब थोडं, नाही तर रोज फोन करत जा, म्हणजे आठवन करुन दिल्यासारखं होईल.आज होईल, उद्या होईल म्हणत म्हणत आज शिवरात्रीच्या दुसऱ्या सकाळी संजीवचा फोन आला तेंव्ही मी त्याच्या कवितांच्या संदर्भानं कांही लिहीत असतानाच फोन आला आणि आज कुठल्याही हालतीत लिहून पाठवूच लेकराला म्हणून पुन्हा नेटानं कवितेच्या दस्तऐवजाला हात घातला. या दरम्यान संजीवला प्रकाशन संस्थेनं आणि माझ्या अडीअडचनींनी त्रस्त केलं, हे सगळं त्यानं सोसलं आणि हीच तर खऱ्या कवितेची ओळख असते. टोकाची सहनशीलता अजमावते कविता ती ही अशीच ! मी कांही ठरवून परीक्षा घेतली नाही संजीवची परंतू परिस्थिती बसवते परीक्षेला आणि त्यातही तो शंभरटक्के गुणांनी उत्तीर्ण झाला आहे, याचा मोठा आनंद आहे. आपण वाड्या-वस्त्यातून, पाड्यातुन, तांड्यावरुन आलेले लोक आहोत. आपल्या माय- बहिनी या अशा सगळ्यांच्या शेती-मातीच्या कामांनी सत्कारल्या गेलेल्या आहेत. आपल्या बापा-भावांसोबतच या माय-माऊल्यांच्या सृजनशील हातांनी ही काळी माती हिरवीगार झाली आहे. त्यामुळं शेतीत राबणाऱ्या बापाची कविता जशी लिहिली गेली तशी याच मातीत राबलेल्या मायीची कविता अभावानंच रेखाटली गेली आहेत. मायीची ही कष्टातुन फुलत गेलेली संजूची कविता मला याही अंगानं वेगळी आणि मौलिक वाटते. या कवितासंग्रहातल्या सगळ्या कवितांनी खेड्यातल्या जगण्याचा भूतकाळ आणि वर्तमान काळही जागवला आहे.

आईच्या कष्टाला समर्पक शब्दात मांडणारी ही संहिता म्हणजे अतिशय साधी, सोपी आणि अर्थातच- अर्थपूर्ण कविता आहे. अवघड्यात पडावं असं कांहीच नाही यात आणि हीच साधेपणाची, आपलेपणाची ताकत या कविता संग्रहाच्या पानोपानी सामावली आहे. साधेपणाची, आपलेपणाची एक स्वतंत्र सुंदरता असते आणि ती दिसण्यासाठी, मांडण्यासाठी अंगी औदार्य लागतं. हे छान आहे हे सुंदर आहे हे कळायला किमान कांही घटकांचा विकास आयुष्यात होणं गरजेची गोष्ट असते. मनाला मोहवून टाकणाऱ्या शेकडो गोष्टी अवती भवती घडत असतात परंतू त्यातलं चांगुलपण न्याहाळून बघायला आणि त्यावर भाष्य करायलाही माणुस धजावत नाही, ही मोठी उनीव जानवते सार्वजनीक जीवनात. अनेकदा जगाला काय वाटंल हे दडपण मन उलघडू देत नाही. आपल्याला जमंल का ? ही शंका निरसनापर्यंत जात नाही. आपणंच काय गुत्तं घेतलय का ? हा अजून एक अवघड प्रश्न आपल्याला गप्प बसवण्यास कारणीभूत ठरत असतो. त्यामुळं चार-चौघात मनमोकळं बोलणं होत नाही, ना कसली चर्चा होते. त्यामुळं धुमसत रहातं मन आणि मनाची धुसफुस अवघड करते. हातात धारदार शस्त्र, दगड गोटा,तलवार, अधुनिक आयुधं घेऊन उत्तरांच्या शोधात रक्तपात करत आहेत लोक आणि अशांतता निर्माणात कळत नकळत सहभागी होताहेत. हे सरळ सरळ मनाचं वाकड्यात घुसणं, कविता निर्धारानं थांबवते. मनातल्या चांगल्या वाईटावर बोलणं, लिहिणं यातून मनातला विचारही बाहेर येतो आणि कुठल्यातरी कलात्मकेचा पदर धरुन तो विचार आला तर मग संस्कृती निर्माणालाच तर आपला हातभार लावतो.

नवनव्या वाटा सुचवणारे लेखण प्रकार निर्माण होत जातात. कविता ही अशीच मनावरली दडपणं काढून मनमोकळा संवाद घडवून आणत असते. संजीवकुमारच्या कविता मला अशाच सगळ्या कारणांनी अवतरल्याच्या पाऊलखुणां या कवितासंग्रहात जानवल्या आहेत.



गावात गोरगरीबीतच चालला आहे जन्म त्याचा नौकरीच्या आशेवर.कष्टाची किनार असलेली ही हळव्या मनाची मायरान कविता संजीवला श्रीमंत करुन गेली आहे. त्याला सत्य बोलता लिहीता येतं ही किती मोठी कमायी त्यानं केली आहे हे त्याच्या भवतालाला, गणगेताला अजून माहीत नाही. या पुस्तकाच्या निमित्तानं ते माहीत होईल हा माझ्या लेखी भला मोठा आनंद आहे. कवितेतून संजीवचं सांगण्यातलं निर्मळपण आणि अगदीच निरागस नितळ निर्मळ मन आपणा कुण्याही संवेदनशील वाचकाला भावनारं आहे. हा कवितासंग्रह आहे पाच पन्नासच कवितांचा परंतू या मुळं संजीवची नवी ओखळ आणि नवा आदरभाव निर्माण होणार आहे, ही फार सुंदर घटना घडते आहे, याचाही मोठा आनंद आहेच. संजीवकुमारच्या कवितांनी अंगिकारलेली भाषा आणि भवताल दोन्ही गावाकडला आहे, ग्रामिण आहे. त्यामुळं गाव आणि गावातली माणसं, त्यांच्या धारणा, विचारसरणी, संस्कार, संस्कृती अशा सगळ्या अंगानं या कविता संग्रहाकडं बघताना ही संहिता मला आईच्या मायेला, अपार कष्टाला, तिच्या त्यागी समर्पीत आयुष्याला शब्दबद्ध करणारा मौलिक दस्तैवज वाटतो. शाळा महाविद्यालयाच्यी निबंध स्पर्धेतील माझी माय या अशा धोपट चालीनं जाणाऱ्या निबंधांसारखा हा विषय निश्चित नाही. या कविता संग्रहाचं शिर्षक मायरान आहे आणि त्यामुळं पुस्तकाचं अंतरंग कळतं,आत काय असावं. माळरान या शब्दाशी लईच्या अंगानं जवळीकता असलेला हा भावोत्कट शब्द. आपल्या भोळ्याभाबड्या कष्टाळू आईची वेगवेगळी रुपं या कवितांचा प्रदेश निश्चित करतो. या निरागस कविता संग्रहात सांगाव्या बोलाल्या दाखवाव्या अशा कांही महत्वाच्या कविता आणि त्या अनुशंगाने कराव्या अशा कांही नोंदी...

मायरानमधे पन्नास कवितांचा समावेश आहे. या सगळ्या कवितांचा आत्मा माय आहे. सगळे संवाद कथण, वर्णण, चर्चा,खुलासे, स्पष्टीकरण,चिकीत्सा कधी मुलगा तर कधी आई करते. काबाड कष्टानं जगणं पुढं लोटत नेणाऱ्या मायीची ही शब्दचित्रं आहेत. या कवितासंग्रहातून व्यक्त होणारा कवी मुळातच ग्रामिण असल्याने त्याच्या भवतालातील सगळी कष्टकरी माणसं या कवितांमधून येते, सोबत त्यांची तितकीच साधी, सोपी आणि कसल्याही अलंकार अभुषनांसह येणारी भाषा या कविता संग्रहाची मोठी ताकत आहे.ही गावातली, गावकुसातली खरीखुरी भाषा आपल्या ग्रामरुढी, परंपरा,ग्रामसंस्कार, मूल्यसंस्कार घेवून आली आहे. या काही कवितांचा संदर्भ याच कांही कारणांसाठी...

*“ पोरा येतं रं पोरा*
*तुझं अन् माझं साल*
*वह्या पुस्तका सोबत*
*खात बी रं महागलं. (पोरा, पृ.९)*

ही बापाची अगतीकता या कवितासंग्रहाची सुरुवात करतो. शिकून सवरुन पोरं गरीबी संपवतील ही आस मनी घट्ट बांधून ही माऊली दिवसं काढते आहे. आपल्या आईचीओळख करुन देणारी ही पहिलीच कविता.

**“काळी सावळी माय माझी**
**रोज राबते शिवारी**
**तिच्या नावावर नाही**
**अवघ्या विश्वात काकरी.**
**इळा, खुरपं, टिकावं**
**तिच्या जन्माचे**
**सोबती**
**माय बराशी**
**खणताना**
**उभी घामात**
**भिजती. (माझी माय, पृ.१० )३**

**“झोडपिली माय**
**माझी**
**आवकाळी**
**पावसात**
**घर गाटलं तिनं**
**मार गारांचा**
**खात खात.**
**माय पडली**
**बाजंत**
**अंगी हिवताप**
**घेऊन**
**जीव**
**कासाविस**
**माझा**
**तिची हालत**
**बघून.” ( आवकाळी पावसात, पृ. १३.)४**

ढेकणं या कवितेतून माय करत असलेली ढेकणं घालवण्याचा उपचार गावोगावी अंगीकारलेला आहे. गरीबी आणि दारिद्र्याचं हे अंगवळणी पडलेलं लक्षण. मायीच्या गरीबी आणि दारिद्र्य निर्मुलनाचा हा प्रयोग आपण खेड्यापाड्यातल्या जगण्यानं अनुभवला आहे, त्याची वस्तुनिष्ठ नोंद ही कविता घेते. भोपळ्याचा येल, मोठं धुणं, सुगी शेंगाची, रोजगार, बालपण, शाळंत जा बाळा, माय चालली जळणाला, माय लेक, मा म्हणाली, जोमानं शिक रं पोरा ! या सगळ्या कवितांनी एक तर आईचं कष्ट आणि आईचं तत्वज्ञान आहे. तिला तिच्या जगण्यातून ते उमगलं आहे आणि आहे तसं मांडलं आहे कवीनं. नेसू फाटकं तुटकं परी तुला रं सजवू जन्म आडानीच गेला, पर तुला मात्र शिकवू हाल सोसतो आम्ही त्याच्या झळा नको तुला तू जोमानं शिक रं पोरा, घाम गाळून पुरवू तुला. **(जोमानं शिक रं पोरा !, पृ. ५९)**

ही आहे माय, मायीचा निर्धार, मायीचं लेकराच्या जिवासाठीचं वाहून घेणं. लेकराला बळ देवून पुढं चालत रहायला प्रेरीत करणारी ही रचना आहे. संजीवकुमार या अशा खेड्यापाड्यातुन शिकलेल्या गोरगरीब, शेतमजूर, श्रमिक संस्कृतीचा प्रतिनीधी आहे. त्यामुळं या सगळ्या कवितांमधून साकारलेली आईसुद्धा एकाच वेळी वैयक्तिक आणि प्रातिनिधीक पातळीवरच येते. गातातल्या तमाम माय-माऊल्या या अशाच आहेत जशी आमुच्या संजूची माय आहे. विचार करायला लावणारी गोष्ट ही ही आहे की हा कविता संग्रह मायरान या शिर्षकानं प्रकाशीत होतो आहे आणि या कविता संग्रहाची पहिली कविता बाप मुलाला आपल्या शेती आणि शाळेसंदर्भातील अडी- अडीअडचणी समजावून सांगत आहे आणि याच कविता संग्रहातली शेवटची रचना जी प्रातिनीधीक स्वरुपात आहे आणि आयुष्यातल्या सगळ्या तानतनावांना वैतागून असहाय्य होवून, ज्याला जबाबदार शेकडो कारणं आहेतच, व्यवस्थेनं निर्माण करुन ठेवलेले, बाप, गळफास घेतो आणि अर्थातच ही मायीच्या वनवासाचीच वाटणी तिच्या पदरी टाकून निघून जातो. अगतीकतेनंच मग माय हा संसाराचा गाडा ओढंत रहाते, दिरा- भाव्यांच्या आधारानं. या अगतीकतेचं वर्णण कवी करतो...

**बाप गेला रानात**
**झाडाला गळफास घेऊन.**
**माय राबते शेतात**
**आता रंडकी होऊन....**
**नाही गोड जेवन केलं**
**उपाशी राबल्या बापाचं**
**गाव जेवू घालून कशाला**
**पारडं वाढवू रिनाचं.**
**(संसार, पृ. ६३.)**

रिनाचं पारडं वाढू नये म्हणून नव-याचं गोड जेवन न घालणारी आई आणि हा तिच्या अगतीकतेनं घेतलेला निर्णय तिव्र स्वरुपाच्या भावनांनाही कशी बगल द्यावी हे शिकवणारा आहे.खरं तर मृत्यू नंतरचे सगळे सोपस्कार उर्ववितांचं मनोबल वाढवण्यासाठी आणि गेलेल्या माणसाच्याबद्दलच्या चांगुलपणाच्या स्मृती जतन करण्यासंदर्भातील असतात.इथं बाप आहेच रिनाच्या स्वरुपात आणि ते अजून कशाला वाढवायचं हा निर्धारही मौलिक वाटतो. अर्थात या अशा परंपरा आणि रिती रुढींनीच गावं मोठे पोखरुन टाकलेत. आरंभी आधाराचा शब्द उच्चारनारा बाप नंतर स्वतःला संपवून जातो या प्रवासा दरम्यानच्या बापाच्या अनुशंगानं येणाऱ्या व्यथा- वेदनांना जबाबदार कोण ? निसर्ग ? रिती-रुढी-परंपरा ? की सरकारं ? संजूचे वडील आहेत आणि अजूनही कष्ट करुन जगणं तळहातावर जपलं आहे महोदयांनी. परंतू भवतालात घडत जाणा-या घटनांची नोंद कवी कसा घेतो आणि या वाचकांना या संवेदनशील प्रश्नाकडं कसा नेतो हे कसब वाखानन्याजोगं आहे. या कविता संग्रहाची खरं तर हीच ताकत आहे. आपण विचार करायला लागतो आणि हीच तर संवेदना जागृती करुन वाचकाला कृतीप्रवण करायचं असतं अक्षरधारांनी. संजीवकुमारच्या निरागस बोलीभाषेतून व्यक्त झालेल्या या सगळ्या कवितांनी काळजात जपावं असे शब्द, अशा भावना, अशी लोकभाषा आणि सच्चा विचार मांडला आहे जो कधी प्रमाण भाषिकांनी अंतःकरणपूर्वक स्विकारला नव्हता. संजीवकुमारच्या कवितांबद्दल आणि दस्तुरखुद्द संसूबद्दलही खूप कांही लिहीता येईल, एकेक छंदा-मुक्तछंदातील कवितांबद्दल सविस्तर रसग्रहणं लिहिती येवू शकतील इतक्या आपुलकी आणि जिव्हाळा जपाव्या अशा या कविता आहेत. तिही लिहीता येईल त्याचं कारण हे गाव नावाच्या दबल्या-पिचल्या, गोर-गरीब अशा एका मोठ्या समुहाच्या प्रातिनिधीक जगण्या मरण्याचं दुःख आहे. संजीवकुमार भोसले या तरुण मनात कविता वस्ती करुन आहे आणि ती या निरागस वळणावरुन जाताना अधीक प्रगल्भ होत जाणार आहे ही शास्वती असल्यानं मला संजीवच्या या मायरान कविता संग्रहाला शुभेच्छा देताना मनस्वी आनंद होतो आहे. त्याचे आई-वडील, बहिन-भाऊ आणि अवघं गणगोत हा कवितासंग्रह वाचून आनंदीत होणार आहे याची मला खात्री आहे. आपल्या जगण्याचा इतिहास हा असाही लिहीता येतो. हे सुंदर उदाहरण संजयकुमार भोसले यांनी आपल्या समोर ठेवलं आहे. संजीवकुमारच्या भावी काव्यात्मक जीवन प्रवासाला ही कवितेची सुंदर किनार कोरड पडू देणार नाही. हा आशावाद जिवंत ठेवणारा आहे. ही बोली भाषा लोकजीवनाचा इतिहास सांगणारी कविता आहे. लोकसाहित्याच्या अंगाने ही कलाकृती महत्त्वाची आहे.

**संदर्भ :**

**१. भोसले संजयकुमार, मायरान, गुरुमाऊली प्रकाशन, उदगीर, जि. लातूर, २०२२.**
**२. कित्ता, पृ.९**
**३. कित्ता, पृ.माझी माय, पृ.१०**
**४. कित्ता, पृ.आवकाळी पावसात, पृ. १३.**
**५. कित्ता, पृ.जोमानं शिक रं पोरा !, पृ. ५९**
**६. कित्ता, पृ. संसार, ६३**

# नवीन शैक्षणिक धोरण - आव्हाने आणि क्षमता



प्रज्ञा पंडित, ठाणे
संपर्क क्र. 9320441116

आधुनिक केसरी

**भारताला जागतिक पातळीवर नेतृत्व करायचे असेल तर सर्वांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे महत्वाचे आहे. पुढच्या दशकात जगातील सर्वात मोठी युवकांनी लोकसंख्या भारतामध्ये असेल आणि त्या सर्वांना चांगल्या गुणवत्तेच्या शिक्षणाच्या मंधी पुरवण्याच्या क्षमतेवर आपल्या देशाचे भवितव्य ठरेल. भारताने 2015 मध्ये स्वीकारलेल्या शाश्वत विकासाच्या 2030 च्या कृती कार्यक्रमाच्या उद्दिष्ट 4 (SDG4) मध्ये 'जागतिक शिक्षण विकास कृती कार्यक्रम' समाविष्ट असून हे उद्दिष्ट 2030 पर्यंत सर्वांसाठी समावेशक आणि समान गुणवत्तेचे शिक्षण सुनिश्चित करणे आणि सर्वांसाठी निरंतर अध्ययनाच्या शिक्षणाच्या संधींना प्रोत्साहन देने यासाठी प्रयत्न करण्याविषयी आहे.**

या उत्तुंग उद्दिष्टाकरता अध्ययनाला पाठिंबा देण्यासाठी आणि चालना देण्यासाठी संपूर्ण शिक्षण प्रणालीची नव्याने रचना करणे आवश्यक आहे म्हणजे शाश्वत विकास कृती कार्यक्रम 2030 ची सर्व महत्त्वाची लक्ष्ये आणि उद्दिष्टे साध्य करता येतील. ज्ञानाच्या बाबतीत जगामध्ये वेगाने बदल होत आहेत. बिग डेटा, मशीन लर्निंग, कृत्रिम बुद्धिमत्ता यासारख्या विज्ञानाच्या आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रांमधील वेगाने होत असलेल्या विकासामुळे जगभरातील अकुशल कामे आता माणसांऐवजी यंत्रे करू शकतील. त्याच वेळी, विशेषतः गणित, संगणक विज्ञान, आणि डेटा विज्ञान यातील कुशल कर्मचाऱ्यांना तसेच विज्ञान, समाजशास्त्र आणि मानव्यशास्त्रे यांच्यातील बहुशाबीय क्षमता असलेल्या कुशल कर्मचाऱ्यांना वाढती मागणी असेल. रोजगाराची परिस्थिती आणि वैश्विक परिसंस्था वेगाने बदलत असताना केवळ शिकणे आता महत्त्वाचे नसून कसे शिकायचे हे ही महत्त्वाचे ठरणार आहे. शिक्षण आत्मक सर्वसमावेशक एकात्मिक जिज्ञासू संशोधन केंद्रित लवचिक आणि अर्थातच आनंददायक होण्यासाठी अध्यापन शास्त्र उत्क्रांत होण्याची गरज आहे शिकणाऱ्यांचे सर्वपल्ली आणि क्षमता विकसित होण्यासाठी आणि शिक्षण सर्व दिशांनी विकसित होण्यासाठी उपयुक्त आणि शिकणाऱ्यांसाठी अधिक समाधानकारक होण्यासाठी अभ्यासक्रमात विज्ञान आणि गणिताच्या बरोबरीनेच मूलभूत कला हस्तकला मानवशास्त्र खेळ क्रीडा आणि स्वास्थ्य भाषा साहित्य संस्कृती आणि मूल्य यांचा समावेश करणे आवश्यक आहे.

शालेय शिक्षणाच्या सध्याच्या १०+२ संरचनेत बदल करून ३ ते १८ वयोगटाला समाविष्ट करणारी ५+३+३+४ अशी नवीन अध्यापनशास्त्राची आणि अभ्यासक्रमाची पूर्ण रचना करणे हा या धोरणाचा उद्देश आहे. सध्याच्या शाळेला व्यवस्थेतील मूल्यमापन हे सारांश पद्धतीचे आहे जे मुख्यत्वे घोकंपट्टी करून लक्षात ठेवण्याच्या कौशल्याची पारख करते. या मूल्यमापनाच्या उद्दिष्टात बदल करून ते अधिकाधिक नियमित आणि रचनात्मक केले जाईल. इयत्ता दहावी आणि बारावी साठी असणाऱ्या बोर्ड परीक्षा तशात चालू राहणार असल्या तरी, विद्यमान बोर्ड आणि प्रवेश परीक्षांच्या व्यवस्थेत अशा प्रकारे बदल करण्यात येईल की कोचिंग क्लासला जाण्याची गरज भासणार नाही. विद्यमान मूल्यमापन प्रणालीमुळे झालेले हे हानिकारक परिणाम उलट करण्यासाठी बोर्ड परीक्षांची पुनर्रचना केली जाईल, जेणेकरून सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन मिळेल. आपल्या वैयक्तिक आवडीनुसार विद्यार्थ्यांना ज्या विषयांसाठी बोर्डाची परीक्षा द्यायची असेल त्यातील बरेचसे विषय त्यांना निवडता येतील बोर्ड परीक्षा अधिक सोप्या केल्या जातील म्हणजेच अनेक महिने चाललेले केलेले कोचिंग आणि घोकंपट्टीच्या ऐवजी प्रामुख्याने मुख्य क्षमता आणि योग्यतेची पारख केली जाईल. बोर्ड परीक्षेची संबंधित उच्च जोखीम पैलू दूर करण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना त्यांची इच्छा असल्यास कोणत्याही एका शालेय वर्षांमध्ये दोनदा बोर्ड परीक्षेला बसता येईल ज्यात एक मुख्य परीक्षा आणि एक सुधारणा करण्यासाठी परीक्षा असेल.

भारतातील उच्च शिक्षण प्रणाली सध्या ज्या प्रमुख समस्यांचा सामना करीत आहे त्यात खालील समस्यांचा समावेश आहेः

अतिशय विखुरलेली उच्च शैक्षणिक परिसंस्था,

आकलन कौशल्याचा विकास आणि, अध्ययनाच्या निष्पत्तीवर कमी भर, शैक्षणिक शाखांची साचेबंद पद्धतीने विभागणी यामध्ये विद्यार्थ्यांना खूप लवकर एका विशिष्ट विषयाची शाखेची निवड करावी लागते आणि अध्ययनाच्या संकुचित क्षेत्राकडे वळवले जाते. मर्यादित उपलब्धता विशेषता सामाजिक आर्थिक दृष्ट्या वंचित क्षेत्रांमध्ये जिथे स्थानिक भाषेत शिकवणारे अतिशय कमी उच्च शैक्षणिक संस्था उपलब्ध आहेत.

मर्यादित शिक्षक आणि संस्थात्मक स्वायत्तता,

गुणवत्तेवर आधारित करिअर व्यवस्थापन आणि शिक्षक व संस्थेच्या प्रमुखांची प्रगती यासाठी अपुरी यंत्रणा बहुतांश विद्यापीठ आणि महाविद्यालयांमध्ये संशोधनांवर कमी भर आणि शाखांमध्ये स्पर्धात्मक सहाध्यायी परीक्षण संशोधन निधीचा अभाव, उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये शासन आणि नेतृत्वाचा अभाव, अपूर्णांकात नियमक व्यवस्था, अनेक संलग्न विद्यापीठे अस्तित्वात असल्यामुळे पदवीपूर्व शिक्षणाचा खालावलेला दर्जा, या आव्हानांवर मात करण्यासाठी उच्च शिक्षण व्यवस्थेचे नूतनीकरण करून तिला नवीन ऊर्जा प्रदान करणे आणि त्याद्वारे समता आणि समावेशक असे उच्च गुणवत्तेचे उच्च शिक्षण प्रदान करणे या धोरणात संकल्पित आहे. धोरणाच्या दुरुस्तीमध्ये सध्याच्या व्यवस्थेमध्ये **खालील मुख्यमंत्र्यांचा समावेश आहे**ः अशा उच्च शैक्षणिक व्यवस्थेच्या दिशेने वाटचाल करणे ज्या प्रत्येक जिल्ह्यात किंवा जवळपास किमान एक मोठे बहुशाखीय विद्यापीठ आणि महाविद्यालयाचा समावेश असेल आणि संपूर्ण भारतभरात अनेक उच्च शैक्षणिक संस्था असतील ज्यांचे शिकवण्याचे आणि कार्यक्रमांचे किंवा कार्यक्रमांचे माध्यम स्थानिक/भारतीय भाषा असेल.

अधिक बहुशाखीय पदवी पूर्व शिक्षणाच्या दिशेने वाटचाल करणे, अध्यापकीय आणि संस्थात्मक साहित्याच्या दिशेने वाटचाल करणे, विद्यार्थ्यांच्या विद्यार्थ्यांना अधिक चांगला अनुभव मिळण्यासाठी अभ्यासक्रम अध्यापन शास्त्र मूल्यांकन आणि विद्यार्थी सहाय्य यांच्यामध्ये सुधारणा करणे, अध्यापन संशोधन आणि सेवा यांच्यावर आधारित नेमणूक आणि करिअर प्रगती द्वारे शिक्षकांच्या आणि संस्थात्मक नेतृत्वाच्या सचोटीची पुष्टी करणे, सहअध्यायींनी पूर्ण नावलोकन केलेल्या संशोधनाला अर्थसहाय्य करण्यासाठी आणि विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये सक्रियपणे संशोधन रुजवण्यासाठी राष्ट्रीय संशोधन संस्थेची (नॅशनल रिसर्च फाउंडेशन) स्थापना करणे. शैक्षणिक आणि प्रशासकीय स्वायत्तता असलेल्या उच्च पात्रधारक स्वतंत्र मंडळ मार्फत उच्च शैक्षणिक संस्थांचे शासन. उच्च शिक्षणासाठी एकाच नियमाद्वारे 'सुलभ पण परिणामकारक' नियमन, उत्कृष्ट सार्वजनिक शिक्षणाच्या मोठ्या संदीप सारख्या अनेक उपायांद्वारे अधिक उपलब्धता समानता आणि सर्वसमावेशकता उपस्थित वंचितांसाठी खाजगी धर्मदाय विद्यापीठांद्वारे शिष्यवृत्या ऑनलाईन शिक्षण व मुक्त दुरस्थ शिक्षण आणि सर्व पायाभूत सुविधा व शिक्षण साहित्य दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सहज वापरता येण्याजोगे आणि उपलब्ध करणे. उच्च शिक्षणासंदर्भात या धोरणाचा मुख्य भर उच्च शिक्षणाचे तुकडे होणे समाप्त करून उच्च शिक्षण संस्थांचे प्रत्येकामध्ये 3000 किंवा जास्त विद्यार्थी असलेल्या मोठ्या बहुशाखीय विद्यापीठांमध्ये महाविद्यालयांमध्ये आणि क्लस्टर नॉलेज ऑफ मध्ये रूपांतर करणे हे लक्ष असेल. सरकारी आणि खाजगी अशा दोन्ही संस्थांमध्ये वाढ होईल. सोबतच मोठ्या संख्येने उत्कृष्ट



संस्कार सरकारी संस्था विकसित करण्यावर देखील भर दिला जाईल. सरकारी उच्च शैक्षणिक संस्था ना सरकारी अर्थसहाय्य पुरवण्याचे प्रमाण वाढवण्यासाठी एक निष्पक्ष आणि पारदर्शक प्रणाली असेल. ही प्रणाली सर्व सहकारी संस्थांना वाढीची आणि विकसित होण्याची समान संधी देईल आणि ती मान्यता प्रणालीच्या मान्यता मानकांमधील पारदर्शक पूर्व घोषित निर्धारावर निकषांवर आधारित असेल.

मोठी बहुशाखीय विद्यापीठे आणि महाविद्यालय उभारताना, त्यातला शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी शिक्षकांच्या शिक्षणावरही विशेष लक्ष देण्यात येणार आहे. शिक्षकांच्या शिक्षणाची मानके समान राखण्यासाठी पूर्व सेवा शिक्षक तयारी कार्यक्रमासाठी दिला जाणारा प्रवेश, राष्ट्रीय चाचणी एजन्सी / नॅशनल टेस्टिंग एजन्सी द्वारे घेतल्या जाणाऱ्या योग्य विषयांच्या आणि योग्यता चाचण्यांच्या माध्यमातून दिला जाईल आणि देशाची भाषिक आणि सांस्कृतिक विविधता लक्षात घेता ही प्रवेश प्रक्रिया प्रमाणिकृत केली जाईल. युवकांना उच्च दर्जाचे शिक्षण देण्याच्या उद्देशाने हे धोरण शिक्षणातील गुंतवणूक वाढवण्यासाठी बांधील आहे. दुर्दैवाने भारतात शिक्षणावरील सरकारी खर्च जीडीपीचे ६% टक्के या शिफारस केलेल्या पातळीच्या जवळ आलेला नाही. भारतात शिक्षणावरील सध्याचा सरकारी खर्च जीडीपीच्या सुमारे 4.43% इतका आहे जो बहुतांश विकसित आणि विकसनशील देशांपेक्षा खूपच कमी आहे. शिक्षण क्षेत्रातील सार्वजनिक गुंतवणूक वाढवून लवकरात लवकर जीडीपीच्या सहा टक्के पर्यंत पोहोचण्यासाठी केंद्र आणि राज्य एकत्र काम करतील भारताच्या भविष्यातील आर्थिक सामाजिक सांस्कृतिक बौद्धिक आणि तांत्रिक प्रगतीसाठी आणि विकासासाठी खरोखर आवश्यक असलेल्या उच्च गुणवत्तेच्या आणि न्याय सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेसाठी असे करणे अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जात आहे. कोणत्याही धोरणाचा प्रभावीपणा हा त्याच्या अंमलबजावणीवर अवलंबून असतो अशा अंबलबजावणीसाठी अनेक उपक्रम आणि कृती आवश्यक असतात ज्या अनेक संस्थांनी लयबद्धपणे आणि पद्धतशीरपणे राबवल्या पाहिजेत. म्हणूनच या योजनेच्या अंमलबजावणीच्या प्रगतीचे एकत्रितपणे वार्षिक परीक्षण केले जाईल आणि परीक्षणाची माहिती प्रसिद्ध केली जाईल. 2030-40 च्या दशकामध्ये संपूर्ण धोरण कार्यान्वित झालेले असेल आणि त्यानंतर अजून एक व्यापक परीक्षण केले जाईल. एकूणच नवीन शैक्षणिक धोरण अखतांना विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, अनुभवात्मक शिक्षण, तार्किक विचारशक्ती वाढवण्यासाठी प्रयत्न, अभ्यासक्रम निवडीमध्ये लवचिकता, बहुभाषावाद यावर विशेष भर दिला आहे. त्याचबरोबर शिक्षकांचा विकास आणि शिक्षण संस्थांची गुणवत्ता वाढवण्यासाठीही तरतुदी करण्यात आल्या आहेत. हे साध्य करण्यासाठी आवश्यक असणारे आर्थिक धोरण आणि या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचे परीक्षण अश्या सर्व बाबींचा विचार केला गेला आहे. येत्या दशकामध्ये हे धोरण संपूर्णपणे कार्यान्वित झालेले असून त्या त्याचे वारंवार परीक्षण करून त्यात आवश्यक ते बदलही येणाऱ्या काळात केले जातील. त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरणाचे भावी पिढी घडवण्यात मोठे योगदान असेल हे निश्चित.

# नया रिश्ता प्रकाशवाट दाखवेल का ?



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

आधुनिक केसरी

**वंचित आणि शिवसेना हे पक्ष एकत्र कसे काय येतील? दोन्ही पक्षाची विचारधारा ही वेगवेगळी असताना ह्या दोन्ही विचारधारेतील दोन्ही पक्षाचे एकत्र येणे शक्य आहे का? उद्धव ठाकरेंनी हिंदुत्व सोडले की काय? प्रकाश आंबेडकर हिंदुत्ववादी पक्षासोबत कसे काय? यासारख्या अनेक प्रश्नांना अखेर पूर्णविराम मिळालेला असून ज्या वंचित बहुजन आघाडीचे शिवसेनेवर लाईन मारणे सुरू होते. त्यास आता प्रतिसाद मिळालेला आहे.**

दोन्ही पक्ष आता एकमेकांच्या प्रेमात पडून संसार थाटण्यासाठी दोन्ही पक्षांकडून युतीची घोषणा करण्यात आलेली आहे. हे दोन्ही परस्पर विरोधी विचारांचे पक्ष एकत्र आले असले तरी ही युती किती काळ टिकेल हा सवाल सुद्धा उपस्थित आहेच परंतू या युतीचे समर्थन केले जात आहे.भारतीय जनता पार्टी आणि शिंदे गट व त्यांच्या मित्र पक्षांकडून ह्या युती मुळे आम्हाला काहीच फरक पडणार नसल्याचे म्हटलेले आहे. शिवाय त्यांच्या कडून या युतीवर टीका सुद्धा केली जात आहे. ही युती दोघां मध्ये असली तरी महाविकास आघाडीबाबत मात्र संभ्रमावस्था दिसून येत आहे.काँग्रेस आणि राष्ट्रवादी मध्ये या युती बाबत कोणतीही चर्चा न झाल्याने ही युती फक्त वंचित आणि शिवसेनेची असल्याचे म्हटले जात आहे.त्यामुळे ज्या शिवसेनेसोबत काँग्रेस राष्ट्रवादी आहे.त्याच शिवसेनेसोबत वंचित बहुजन आघाडी निवडणूकीचे मैदान लढणार तरी कसे? प्रकाश आंबेडकरांच्या वक्तव्याने तर महाविकास आघाडीतील नेते सुद्धा आता बोलू लागलेले आहेत.आरोप प्रत्यारोप होऊ लागलेले आहेत.वंचित शिवसेना युती आणि ही युती महाविकास आघाडीचा घटक बनेल की नाही अशी परिस्थिती उभी राहिलेली आहे. राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांच्यावर करण्यात आलेली टीका यावरून वादाची ठिणगी तर पडलीच आहे.शिवाय प्रकाश आंबेडकरांनी केलेल्या वक्तव्याने एका नव्या वादाला तोंड फुटले आहे.परंतु यातून नक्की या युतीचे आणि महाविकास आघाडीचे भवितव्य असणार तरी काय? हा सुद्धा सवाल उपस्थित राहिलेला आहे.प्रबोधनकार ठाकरे आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नातू म्हणून उद्धव ठाकरे आणि प्रकाश आंबेडकर यांच्या कडे पाहिले तर सामाजिक परिवर्तनासाठी संघर्ष करणारे हे दोन्ही घराणे आहेत.प्रबोधनकार ठाकरे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे सामाजिक लढयात लढणारे समकालीन होते. सामाजिक कार्यात दोघे एकत्र होते.ते दोघे जर सामाजिक लढ्यासाठी एकत्र येऊन लढले असतील तर महाराष्ट्राच्या राजकारणात हे दोन्ही घराणे एकत्रित येणे लोकांच्या पसंतीस पडणे साहजिकच आहे.महाराष्ट्राच्या राजकारणात एकत्र आल्याने एक वेगळेच राजकीय समीकरण पुढे उदयास येईल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.नया रास्ता नया रिश्ता असे म्हणत ही युती लोकशाही वाचविण्यासाठी एकत्र आली असल्याचे म्हटले जात असताना आज ज्या पध्दतीने वादाच्या ठिणग्या पडू लागलेल्या आहेत.त्या पाहता युतीचा पुढचा प्रवास कसा असेल? ही युती महाविकास आघाडीचा घटक बनेल की नाही याचीच मोठी साशंकता वाटू लागली आहे.वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उद्धव ठाकरे यांची एकमेकासोबत गेली अनेक दिवसांपासून युती बाबत बोलनी सुरु होती. अखेर ही युती घडवून आणण्यात दोन्ही नेत्यांना यश आलेले असले तरी या युती वरून आणि प्रकाश आंबेडकर करत असलेल्या वक्तव्यांवरून चांगलेच रान पेटू लागलेले आहे.महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही युती खूप महत्वाची मानली जात आहे.महाराष्ट्राच्या राजकारणात प्रकाश आंबेडकर आणि उद्धव ठाकरे हे दोघे एकत्र आल्याने राजकारणात नव्या बदलाची नवी नांदी येईल असेही राजकीय विश्लेषण करताना म्हटले जात आहे.परंतु




ज्या पद्धतीने प्रकाश आंबेडकर वक्तव्यांचा भडिमार करत आहेत.हे महाविकास आघाडीतील नेत्यांना अजिबात न पटणारे दिसत आहे.

भाजपकडून इडी सीबीआय ला हाताशी घेऊन हुकुमशाही प्रस्थापित केली जात आहे.पक्षातील नेतृत्व संपविण्याचे कट कारथान केले जात आहे.लोकशाही धोक्यात आणली जात आहे. असे भाजपचे विरोधक वारंवार म्हणत आहे.

भाजपच्या विरोधात सर्व पक्षाने एकत्रित येण्याची अपेक्षा बाळगली जात आहे.प्रकाश आंबेडकरांचे भाजपच्या विरोधातील हे पाऊल पडलेले आहे.परंतु फक्त शिवसेने सोबतच्या युतीपुरते मर्यादित राहण्याचा प्रकाश आंबेडकर यांचा विचार आणि महाविकास आघाडीशी काही ही देणं घेणं नसल्याचे म्हणणे हे भाजपच्या विरोधात भक्कमपणे फळी न तयार होण्याचीच लक्षणे दिसत आहेत.त्यात आरएसएस आणि भाजप सोबत सुद्धा आम्ही जाऊ शकतो हा सूर सुद्धा प्रकाश आंबेडकरांनी बाहेर काढलेला आहे.

यापूर्वी भाजपची बी टीम म्हणून वंचित वर वारंवार आरोप झालेले आहेत. अजित पवारांची फौज सुद्धा बीजेपी सोबत जाऊब पहाटेचा शपथ विधी घडवून आणला होता.त्यामुळे हे नेते कधी कोणी कोणा सोबत जाईल आणि येईल हेच तर महाराष्ट्राच्या राजकारणात एक वेगळे चमत्कार घडून येत असतात.त्यामुळे प्रकाश आंबेडकरांच्या वक्तव्यात किती खरे पण आहे.हे महाराष्ट्राच्या जनतेने ह्या पहाटेच्या शपथ विधी कडे पाहिले तर काही गोष्टी लक्षात येऊन जातील.ही खेळी मोठ्या पवारांनीच घडवुन आणली होती.अशी चर्चा सुद्धा त्या काळातच होती.त्यामुळे प्रकाश आंबेडकरांनी केलेले हे सुद्धा वक्तव्य महत्वाचे असू शकते.जी वंचित लोकसभा आणि विधानसभा निवडणूकी दरम्यान काँग्रेस राष्ट्रवादी सोबतच्या जागा वाटपाच्या फॉर्म्युलावर चर्चेत वारंवार येत होती.तिथे सुद्धा वंचित कडून बाय बायच करण्यात आला होता.

शरद पवार आणि प्रकाश आंबेडकर हे कधीच न जुळणारे राजकीय गणित आहे.आता ही तशीच परिस्थिती आहे.हे राजकीय समीकरण न जुळल्यास वंचित आणि शिवसेनेच्या युतीला सुद्धा ब्रेक लागण्यास वेळ लागणार नाही.युती आणि महाविकास आघाडी हे राजकीय समीकरण कसे जुळून येईल हा येणारा काळच ठरवेल.आरोप प्रत्यारोप ,वाद विवाद हे सर्व काही युती आणि महाविकास आघाडीत घडत आहे.त्यामुळे वंचित शिवसेनेचा नया रास्ता आणि नया रिश्ता यास प्रकाश वाट दाखवेल का? हेच पाहावे लागणार आहे.

# पुस्तके बोलतात तेंव्हा

आधुनिक केसरी

**( पोदार शाळेतील वर्ग नववीच्या विद्यार्थ्यांनी शाळेतील ग्रंथालयास सदिच्छा भेट देऊन ग्रंथालयाबद्दल माहिती जाणून घेतली आणि मला काही प्रश्न विचारले होते त्यावर लेहलेला एक लेख... पुस्तके बोलतात तेंव्हा' 'पुस्तकांनी बळ दिलं, घाव आघात सोसण्याचं, आयुष्यातल्या अंधाराला, उंबरठ्याच रोखण्याचं ' असे रेखा भांडारे बोलतांना म्हणतात की, पुस्तक माणसाला जगण्याचं बळ देतात. संकटातही पुस्तक जहाज बनून आपल्याला किनाऱ्यावर आणून सोडतात.**

**सांगा कसं जगायचं रडत.. रडत**
**की गाणं म्हणत तुमचं तुम्ही ठरवा ?**

तुम्हांला कसे जगायचं हे तुम्हीच ठरवू शकता. पण तुमच्या जगण्याला नवसंजीवनी आणि सकारात्मक आकार देण्याचं अनमोल कार्य ग्रंथ करतात. त्यासाठी तुम्हाला ग्रंथांचे प्राणपणाने वाचन केले पाहिजे.

**'माणसाने शहाण्यासारखं वागावं**
**आणि मग या जगात आनंदाने जगावं ' आनंदाने जगण्याचे तत्व आपल्याला ग्रंथच देतात. वाट इथली बिकट असते**
**हे काय मला ठाऊक नाही ?**
**पावलोपावली कटकट असते**
**हे काय मला ठाऊक नाही ?**

आजच्या अत्यंत धावपळीच्या कठीण अश्या जीवघेण्या जगात जगण्यासाठी माणसाला अनंत यातना सहन कराव्या लागतात. कष्ट घ्यावे लागतात. चंगळवादी जगात माणसाला आपली नैतिकता जपावी लागते. माणसात नैतिकता रुजवण्याचे कार्य ग्रंथचं करू शकतात.

**इतकं दिलंत इतकं दिलंत तुम्ही मला**
**खरं सांगतो माणूस केलंत तुम्ही मला!**

खरं सांगतो ग्रंथ माणसाला माणूस म्हणून जगण्याचे तत्वज्ञान देतात. ग्रंथ वाचनाने माणसातील माणुसकी वाढीस लागते. माणसाला सत्य - असत्य, न्याय - अन्याय, चांगले - वाईट यासारख्या अनेक गोष्टीचे दर्शन होते. कसे वागावे यांचे ज्ञान होते. 'वाचन आहे प्रवास सुंदर नव्या ज्ञानाचा इतिहासाचा, साहित्याचा आणिक विज्ञानाचा नव्या जगाचे, नव्या युगाचे प्रकाशगाणे गाती ' मंगेश पाडगावकर असे म्हणतात.

माझे ग्रंथालय म्हणजे माझा प्राण, पुस्तकांच्या सहवासात शांत आयुष्य वेचण्यासारखा दुसरा आनंद नाही. पुस्तक मला नवी वाट दाखवतात. ती मला खूप आनंद देतात.' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. डॉ. आंबेडकर यांना लहानपणापासूनच ग्रंथ वाचनाचा छन्द लागला होता. ग्रंथ त्याचे जीव की प्राण झाले होते. रात्रदिवस ग्रंथ वाचण्यातच ते व्यस्त असत.

पुस्तके वाचता यावीसाठी मॅकझीम गार्गी लहानपणी पुस्तकांच्या दुकानात काम करत असत. काम करत वाचन करत. वाचन करत करत ते कथा, कविता आणि लेख लिहत असत. पुस्तकांच्या ज्ञानसागरातुन ते घडले.

**'जिथे ग्रंथ नाही, तिथे ज्ञान नाही**
**जिथे ज्ञान नाही, तिथे सौख्य नाही '**

असे कवी न. शं. पोहनेकर म्हणतात. जीवनात सौख्य आणि



शांतीपूर्ण जीवन जगण्यासाठी ग्रंथाचे वाचन केलेचं पाहिजे. ' वाचाल तर वाचाल ' असे सांगणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर लहानपणापासूनच ग्रंथ वाचन करण्यात मग्न असत. अगदी तल्लीन होऊन ते ग्रंथ वाचत असत. त्याचे बाबा त्यांना जे पुस्तक हवे असे ते पुस्तक आणून देत असत. पुस्तक आणण्यासाठी प्रसंगी कर्ज आणि एखांदा सोन्याचा गहना गाहाण ठेवून पुस्तक आणत असत. भीमराव आपल्या आवडीचे पुस्तक मोठ्या हौसने वाचत असत. आजचे नवयुवक पुस्तके वाचत नाहीत असे म्हटले जाते. पण आजचे युवकही मोठ्या प्रमाणात पुस्तक वाचतांना दिसत आहेत. शालेय स्तरापासून विद्यार्थी पुस्तक वाचनाकडे वळत आहेत. ज्या शाळेत ग्रंथालय आहेत त्या शाळेतील मुले मोठ्या प्रमाणात पुस्तक वाचन करतात. पोदार शाळेतील विद्यार्थ्यां मोठ्या प्रमाणात ग्रंथाचे वाचन करतात तसेच वाचलेल्या ग्रंथाची माहिती सांगतात. आजच्या मुलांना वाचनाची गोडी लावणे आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षकांसह विद्यार्थीच्या पालकांनी देखील पुस्तक वाचन करण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. माझ्या मते विद्यार्थ्यांनी मनाला सकारात्मक ऊर्जा देण्याऱ्या आणि जीवनाला अधिक अधिक सुंदर करणाऱ्या पुस्तकांचे वाचन केले पाहिजे. विद्यार्थी विचारात की सर तुम्ही कोणकोणते पुस्तके वाचले आहेत. तेंव्हा विद्यार्थ्यांना सांगावेसे वाटते की मला माझ्या शालेय जीवनापासूनच पुस्तक वाचण्याची सवय लागली आहे. आमचे गणिताचे कांबळे सर नेहमी म्हणायचे,' पुस्तके वाचल्याने तुम्हाला मान -सन्मान मिळतो. ज्ञान मिळते, जगण्याचे तत्वज्ञान मिळते. कसे जगावे याचे विचार मिळतात. एकंदरीत सारे जीवन सुखमय आणि आनंदात जगण्याचे सार मिळते.' सरांचे हे शब्द मी ऐकल्यापासून ग्रंथालयात जाऊन पुस्तके वाचन करत असे. तेंव्हापासून मी अनेक पुस्तके वाचली पण मला काही खूप आवडलेली पुस्तके खालीलप्रमाणे आहेत.

एक होता कार्व्हर, वॉल्ट डिझनी, जगा.. पण सन्माने, ग्रंथप्रेमी -आंबेडकर, सगळं सगळं उलथवून टाकलं पाहिजे, बोलगाणी, यशाचा पासवर्ड, मराठी गझल, माझे विद्यापीठ, ग्रंथपालाची रोजनिशी, अग्नीपंख, हेलन केलर, फकिरा आणि मन में है विश्वास यासारखे अनेक पुस्तकांचे मी वाचन केले आहे. 'जगाच्या कुठल्याही कानाकोपऱ्यात मला टाका. फक्त माझ्यासोबत पुस्तक द्या. कारण पुस्तकचं मला पंख देतात. त्यांच्या आधारे कोठडीत बसूनही मी सार जग फिरून येऊ शकतो. पुस्तकांच्या पानातून सार जग अनुभवू शकतो.' असे डग्लस म्हणतो. अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजाबरोबरच वाचन ही देखील मूलभूत गरज बनली पाहिजे. अन्नाने शरीराचे पोषण होते तर मनाच्या पोषणासाठी ग्रंथ वाचन केले पाहिजे. वाचन हा श्वास व्हायला हवा. एक बादशहा म्हणतो की,' मी खूप मोठा बादशाह झालो. संपत्ती मिळवली, राज्यविस्तार केला पण 50 वर्षात अवघे 15 दिवस सुख मिळाले. हे पंधरा दिवस म्हणजे ज्या ज्या दिवशी मी पवित्र ग्रंथाचे वाचन केले. बाकी सारे आयुष्य दुःखात गेले. म्हणून माझी तुम्हाला विनंती आहे की, नित्य पवित्र ग्रंथाचे वाचन करा, मनन, चिंतन करा म्हणजे स्वर्गसुखाचा आनंद मिळेल.'

'पुस्तकाच्या पानांमध्ये आनंदाचा झरा असतो.
ज्ञानाची हिरवळ जगाकडे सुंदरतेने बघण्याची नजर असते.'

पुस्तके बोलतात तेंव्हा जगणं सुंदर होत. पुस्तक वाचावं वाटतं. हरवलेले सारे स्वप्न गवसते. शेवटी असे म्हणावे वाटते की,' मनःशांतीसाठी सदा ग्रंथ वाचा I सदा जीवनी धैर्य आधार त्याचा.

**चंद्रकांत गौतम नांगरे**
**ग्रंथपाल पोदार इंटरनॅशनल स्कूल, हिंगोली**
**MOB : 8421632803**

# भावविश्व आमुचे हो पोरके जाहले - ती. भीमाशंकर पाठक

आधुनिक केसरी

**सकाळी मोबाईल सुरु केला आणि whatsapp वरील हैद्राबाद बँकेच्या तीन ही पेन्शनर ग्रुपमधील मेसेज - गर्दी पाहूनच मनात शंकेची पाल चुकचुकली. मेसेज पाहिला .."जेष्ठ -लोकप्रिय -सहकारी ती.भीमाशंकर पाठक "यांचे निधन ..! मित्र हो, हा मेसेज वाचून "भावपूर्णश्रद्धांजली " हे शब्द टाईप करण्यास काही सेकंदच वेळ लागला असेल पण आमच्या सहवासाचा आलेख मांडतांना मनाला जाणवतो आहे तो आमचा पारिवारिक सहवास . गेली सहा -दशके " घडलेला हा भावूक आणि हळवा प्रवास आहे ".**

आठवणींचा हा प्रवास थेट नाते सांगतो तो "गंगाखेड क्षेत्रीच्या गोदावरीच्या पावन आणि पवित्र निर्मल अखंड प्रवाहाशी.गंगाखेड रहिवासी असलेले ती.भीमाशंकर पाठक यांच्या सहवासात बँकेतील सगळ्यांनी "या गोदा-मायेच्यापवित्र -आणि निर्मळ गंगाजलासारखा मायेचा -ओलावा, प्रचंड जिव्हाळा "मनोसक्त अनुभवला आहे. मग ते गाव. .बीड. जिल्ह्यातील आष्टी, लातूर जिल्ह्यातील उदगीर असो, जालना शाखा असो वा, परभणीतील एडीबी, आणि कृषी विद्यापीठ शाखा असो ", या ठिकाणी पाठकांच्या सोबत काम केलेल्या हर-एक व्यक्तीला त्या आठवणीनी आज पुरती भाव-विव्हल आणि व्याकूळ करून टाकले असणार "हे मी सांगू शकतो.. ती. भीमाशंकर पाठक आणि त्यांचा परिवार ..ती. वाहिनी ..यांची आणि आमची पहिली भेट झाली ती ..१९६७ सालीआष्टी या गावी. माझे वडील -ती.बाप्पा "-व्ही.एच. देशपांडे हे आष्टी शाखेचे पहिले मॅनेजर , आणि (माझ्या आठवणी प्रमाणे )- पहिले हेड -कॅशियर - ती. भीमाशंकर पाठक. हे दोघे ही .."परभणी जिल्ह्यातले ", हा धागा दोघातील नाते दृढ करणारा होता , आणि पुढे दोघांनीही "हे बंधुत्व -नाते जीवापाड जपले " ती पाठकसाहेब - मोठ्या परिवारातले सर्वात मोठे व्यक्तिमत्व . साहजिकच सारेजण त्यांना "दादा "असे म्हणत . आपोआपच परिचित , मित्र-परिवार त्यांना "अहो -दादा असे म्हणू लागले. विशेष म्हणजे त्यांनी त्यांची "दादासाहेब "अशी उग्र आणि आदर-युक्त भीती "वाटेल ,अशी प्रतिमा कधीच होऊ दिली नाही ". त्यांच्या आयुष्यभर ते घरा-दारासाठी कायम "आमचे दादा - आपले दादा होऊनच वावरले. पुढे १९८६ मध्ये मी परभणीला आलो - नव्या मोंढ्यातील -एडीबी (कृषी विकास शाखा -) शाखेत हेड-क्लार्क म्हणून रुजू झालो.



वसमत रोडवरील हैदरबादबँक कॉलनीतआमचे घर होते . त्यातील तीन रुमच्या ब्लॉकमध्ये मी माझ्या फॅमिलीसह राहू लागलो , बाजूच्याचार रुमच्या ब्लॉक मध्ये दस्तुरखुद्द " पाठक -दादा आणि वाहिनी "ही वडीलधारी घरची मंडळी रहात होती . दादांचे थोरले चिरंजीव -संतुकसर्व्हिसला लागलेला होता. व्हेटरनरी कोलेजातला - चंदू ( आताचा बिझनेसमन), शाळेत जाणारा (आताचा विख्यात आयुर्वेद तज्ञ )-सोहन , आणि सुनीता आणि अनिता "या विद्यार्थिनी भगिनी ,अशा सदा गजबजलेल्यापरिवारा सोबतचे आमचे दिवस "सोनेरी आणि जादुई होते ". सोमवार आणि प्रदोष "या दोन उपवासाच्या दिवशीबँकेत -इंटर्वल मध्ये दादा आठवणीने मला "शेंगदाण्याचा लाडू देत .या दिवशी घरी संध्याकाळचे भोजन व्हायचे ते दादांच्या पंक्तीला आम्ही असायचो, त्यांनी नियमच करून टाकला, मग नो अपील ", उपवास सोडायला ती.वहिनींच्या हातचे बनलेले वरण-भात ,पोळी-भाजी आणि गरम कढी." असे साध -गोड-सात्विक जेवण असायचे. आम्ही राहायचो त्या घराला आतून जोडणारा एक कॉमन दरवाजा होता.. हा दरवाजा आपण सोबत आहोत "तोपर्यंत कधी लावयचा नाही रे , ए सुर्या ऐकलस ना, माझ्या "अरुण "नावाचा दादांनी असा शॉर्टफोर्म केला होता. दादांनी भरलेला असा प्रेमळ दम आम्ही सदैव पाळला. संध्याकाळी बाहेरच्या ओट्यावर पांढऱ्या-चाफ्याच्या झाडाच्या साक्षीने, आमची गप्पांची रंगतदार मैफिल रंगायची ..एम.के. देशपांडे, श्यामसुंदर वैद्य, सरदेशमुख, हे हमखास येणारे असायचे. एडीबीमधल्या आमच्या सोबतच्या -कार्यकाळात आम्ही मनाने अधिक जवळचे झालो. आमचे दोघांचे टेबल आजूबाजूला असायचे. दुपारच्या वेळी खूप बोलणे होत असे. संध्याकाळी जवळच असलेल्या जिल्हा परिषद मध्ये असलेले दादांचे धाकटे बंधू - नियमित येत. कधी गंगाखेदहुन ,तर कधी परतूर येथूनदादांना भेटायला येणारे माझ्या समोर मोकळेपणाने बोलायचे " हीच आमच्यातील आपलेपणाचीमोठी ओळख सगळ्यांना होती. दादांनी सर्वांना विशेष ओळखीचीनावे दिलेली असत - त्याच नावाने ते बोलायचे ,बोलवयचे ..काही नाव सांगायला हवीत म्हणजे त्यातीलगम्मत कळते .. गजानन - देशमुख - कंट्रीमाऊथ " , श्याम-सुंदर वैद्य-इविनिंग ब्युटी " "हेड -कंट्री-माऊथ - सरदेशमुख ", त्याच प्रमाणे - दुपारच्या डब्यात पोळी-सोबत आणलेल्याभाज्यांची नावे - चुका -पालेभाजी ..मिस्टेक -भाजी , "घोळाची -भाजी -कन्फ्युजन भाजी ", आणि प्रासंगिक -शाब्दिक कोटयाकरून सगळे वातवरणमिस्कील आणि खुमासदार करणारे पाठक -दादा म्हणजे हुनरबाज -आदमी " होते हेच खरे. ती. दादांनी माझ्या वडिलांच्या सोबत काम केले, मी त्यांच्या सोबत काम केले, त्यांच्या कन्येने -सुनीताने, माझ्या सोबत काम केले. अशा या रेशीमगाठी आहेत दादांच्या आठवणींच्या. ज्योतीनगर औरंगाबादला असताना आमच्या समोरच्या सोसायटीत "पाठक दादा राहायचे " संध्याकाळी त्यांची हमखास चक्कर असे. आता पुण्यात, डॉ.चंदू रहातो डीएसके विश्व धायरीला, अंतर आणि ट्राफिक लक्षात घेता "अवघड झाल्या भेटी " अशी परिस्थिती . तरीही दोन-चार वेळादादांची -वहिनींची ,पाठकांच्या नव्या पिढीची भेट झाली. आम्ही ज्या काळात बँकेत नोकरीला होतो. त्या काळात प्रत्येकाशी पारिवारिक नात्याने वागण्याचे संस्कार "पाठक -दादासारख्या अनेक "सच्छील -सद-गृहस्थांनी आमच्यावर केले. हीच ती आम्हासाठीचीभावनिक -शिदोरी आहे.

दादांची पिढीच खूप मायाळू जसे गोड गुणकारी जर्दाळू ..! ती. भीमाशंकर पाठक - माझे साहेब -माझे दादा .. यांच्या स्मृतीस हीच आदरांजली ..!

# जैन कलार युथ फाउंडेशन तर्फे क्रिकेट टुर्नामेंट

आधुनिक केसरी



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

जैन कलार युथ फाउंडेशन तर्फे 2019 पासून जैन कलार प्रीमियर लीगची सुर्वात झाली आणि दरवर्षी मोठ्या प्रमाणात क्रिकेट टुर्नामेंटचे आयोजन करण्यात येते.यात संपूर्ण महाराष्ट्रातील जैन कलार समाजाचे युवा वर्ग मोठ्या उत्साहाने भाग घेतात.यामुळेच समाजाची जडणघडण दिसून येते.टुर्नामेंटचा मुख्य उद्देश म्हणजे समाजातील युवकांना एकत्र करणे,संघटित करणे व खेळाच्या माध्यमातून आरोग्य सुदृढ ठेवणे हाच मुख्य उद्देश असतो.2023 चे टुर्नामेंट ईश्वर देशमुख शारिरीक शिक्षण महाविद्यालय, नागपूर येथे आयोजित केलेले आहे.हे टुर्नामेंट दिनांक 13 फेब्रुवारी ते 19 फेब्रुवारी पर्यंत चालेल.या टुर्नामेंटमध्ये वेगवेगळे बक्षीस सुध्दा ठेवण्यात आलेले आहे.हे बक्षीस समाजातील नामवंत व्यक्तींच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. यात प्रथम पुरस्कार 51 हजार रुपये, व्दितीय पुरस्कार 21 हजार रुपये,मॅन ऑफ द सिरिज 5 हजार रूपये आणि मॅन ऑफ द मॅच अशाप्रकारे वेगवेगळे आकर्षक बक्षीस ठेवण्यात आले आहे. या टुर्नामेंटला सफल बनविण्यासाठी दरवर्षी प्रमाणे याही वर्षी हजारोंच्या संख्येने समाज बांधव या टुर्नामेंटचा अवश्य लाभ घेतील अशी अपेक्षा आहे. या टुर्नामेंटला सफल बनविण्यासाठी कपिल समर्थ, विरेष दूरुगकर, वैभव सोनवणे, राहुल शेंडे, निखिल हरडे, अक्षय तिडके, सूरज बन्सोड,अक्षय खानोरकर, महेश तिडके, राकेश मासुरकर, सचिन दहिकर, कुणाल घोसेकर,भावेश होरे, पारस मोरघरे, मिलिंद खानोरकर,गौरव हरडे, संकेत पलांदुरकर, अनुप हरडे, राकेश शिरपुरकर, संदीप शिरपपुरकर, प्रलोक मोरघरे, सौरभ समर्थ हे सर्व युथ फाउंडेशनचे पदाधिकारी अहोरात्र प्रयत्न करीत आहे व यांना साथ मिळत आहे जैन कलार जेष्ठ नागरिक मंडळाची. त्यामुळे जैन कलार समाजाच्या युवकांना आव्हान करण्यात येते की क्रिकेट टुर्नामेंटमध्ये सहभाग घेऊन संघटीत व्हावे.



# महात्मा..!



श्रावण भवर
संपर्क क्र. ९४२१९३२७०४


आधुनिक केसरी

**महात्मा गांधी हे भारताच्या ऐतिहासिक,सांस्कृतिक,शिक्षण,ग्रामविकास राज,अर्थ,समाज,आदि कारणांना स्पर्श करणारे आणि भौगोलिक दृष्ट्या जागतिक कक्षा वृन्धिगत असलेले वैश्विक व्यक्तिमत्व. भारतातच नाही तर जगाच्या पटलावर सदासर्वदा चर्चेत असणारे शास्वत व्यक्तिमत्व. कारण, महात्मा गांधी हे फक्त भारताच्या भूमीतील एक व्यक्तिमत्व नसून अखिल मानव जातीच्या उत्कर्षाचा,उत्थानाचा,उत्कंठतेचा आणि उर्जेचा जाज्वल्य स्रोत आहे. माणूस देहाने मरत असला तरी, विचार-आचर कृती आणि कर्तुत्वाने अजरामर राहतो.याचे ज्वलंत,जिवंत आणि जातिवंत उदाहरण म्हणजे महात्मा गांधी. महात्मा गांधी हे या भूतलावरील कायम चर्चेत आणि चिंतनात असलेले व्यक्तिमत्व आहे.मग चर्चा त्यांच्या व्यक्तिमत्वाची असो की चिंतन त्यांच्या विचारांचे असो ते कायम लोकांच्या मेंदूत आणि मनात घर करून आहे..**

आज आपण आपल्या भारताच्या स्वातंत्र्याचा आणि मराठवाडा मुक्ती संग्रामाचा अमृत महोत्सव साजरा करत आहोत. हा क्षण आपण सणासारखा साजरा करत असतांना स्वातंत्र्याच्या या धगधगत्या यज्ञ कुंडात माँ भरतीच्या अनेक सापुतांची आपल्या जीवनाची समिधा हसत हसत स्वाहा केली. आजचा स्वातंत्र्याचा सूर्योदय अनेक भयाण आणि भयावह कालरात्री चिरून उगवला आहे.या स्वातंत्र्याच्या संग्रामात अनेकांनी आपले घर संसार-परिवार उध्वस्त होताना याची देही याची डोळा पहिले आहे. स्वातंत्र्याच्या धगधगत्या रणांगणाच्या इतिहासाचे पहिले पान म्हणजे महात्मा गांधी अर्थात मोहनदास करमचंद गांधी. २ ऑक्टोबर १८६९ला गुजरातमधील पोरबंदर येथे पुतलीबाई यांच्या पोटी महात्मा गांधीजीचा जन्म झाला.यांनी राजकोट हायस्कूलमध्ये शिक्षण घेतले. वय वर्ष १३ असतांना कस्तुरबा यांच्या सोबत त्यांचा विवाह संपन्न झाला. त्यांना हरीलाल,मणिलाल,रामदास आणि देवदास हे चार पुत्र होते. १८८८ साली महात्मा गांधी इंग्लंड येथे कायद्याचे शिक्षण घेण्यासाठी गेले. १८९१ मध्ये वकिलीचे शिक्षण पूर्ण करून ते भारतात आले आणि त्यांनी मुंबई –राजकोट येथे वकिली करण्यास सुरुवात केली. याच दरम्यान त्यांच्या मातोश्री पुतळीबाई यांचे निधन झाले.

१८९३ साली महात्मा गांधी एका केस साठी दक्षिण आफ्रिकेतील नटालं प्रांतात गेले असता त्यांना तिथे वर्ण भेदाचा सामना करावा लागला. ७ जून १८९३ साली त्यांनी सर्वप्रथम सविनय कायदेभंग या शास्त्राचा अवलंब केला. १८९४ साली नेटाल येथे इंडियन कॉंग्रेसची स्थापना केली. काहीकाळ भारतात येऊन महात्मा गांधीजीनी कलकत्ता येथील कॉंग्रेसच्या अधिवेशनात सहभाग घेतला आणि मुंबई येथे वकिलीचा व्यवसाय सुरु केला होता.१९०२ ला दक्षिण आफ्रिकेत पुनः जाऊन जोहान्बर्ग येथे कार्यालय थाटून वकिलीचा व्यवसाय सुरु केला.१९०४ ला इंडियन ओपिनियन हे साप्ताहिक सुरु केले त्यात तेथील समाजाच्या व्यथा,वेदना अन्याय अत्याचार आणि वर्णद्वेषाच्या समस्यांना वाचा फोडण्याचे कार्य केले. .१९०७साली भारतीय आणि अन्य आशियायी लोकांवर अन्याय अत्याचार करणाऱ्या ब्लाक ऑक्ट विरोधात सत्याग्रह केला. दक्षिण आफ्रिकेत महात्मा गांधीजींचे कार्य,कर्तुत्व आणि महत्व दिवसेंदिवस वाढत चालेले होते. १९१३ साली वर्णभेद आणि अत्याचारांच्या विरोधात न्युरेलास ते नेटाल पदयात्रा काढून भारतीय खान कामगार यांच्या मोर्चाचे नेतृत्व केले महात्मा गांधी यांच्या प्रबळ,प्रभावी आणि परिणामकारक नेतृत्वामुळे समाजातील अन्याय अत्याचाराला वाचा आणि वाटा मिळत गेल्या आणि समाज मन महात्मा गांधीजींच्या पाठीमागे निष्ठेने,नेटाने आणि दृढनिश्चयतेने उभा राहत गेला आणि स्थानिक शासन-प्रशासन सत्याग्रहाच्या शस्त्रासमोर झुकले परनामी महात्मा गांधी आणि सयटस यांच्यात करार होऊन खान कामगारांचा प्रश्न मार्गी लागला.

९ जानेवारी १९१५ हा दिवस भारतीय इतिहासाला,वर्तमानाला आणि भविष्याला दिशा आणि दैदिप्यमान करणारा दिवस.हाच दिवस आपण २००३ पासून प्रवासी भारतीय दिवस म्हणून साजरा करतो याचे कारण म्हणजे या दिवशी महात्मा गांधी आफ्रिकेतून भारतात आले होते आणि भारताचे राष्ट्रपिता होण्याच्या महान कार्याला सुरुवात झाली. त्यांनी त्यांचे राजकीय गुरु नामदार थोर समाजसुधारक गोपाल कृष्ण गोखले यांच्या सल्ल्याने २ वर्ष भारत भ्रमण केले. या प्रवासात महात्मा गांधीजीनी संपूर्ण भारत याची देही याची डोळा पहिला लोकजीवन अगदी जवळून आणि स्वतःशी जुळवून पाहिलं.अठरापगड जातीचा अन मातृ हृदयी मातीचा भारत डोळे भरून पहिला,लोकांचे जीवनमान समस्या, जाणून घेतल्या आणि आपल्या राष्ट्र निर्माणात नव चेतना निर्माण करण्याच्या आणि राष्ट्र उत्थानाच्या महान कार्याला सुरुवात केली. १९१७ला बिहार मधील चंपारण्य येथे पहिला सत्याग्रह केला तदनंतर १९१८ ला खेडा येथील मिलमजुरांसाठी सत्याग्रह,१९१९-२२ खिलाफत चळवळ केली. इंग्रजांच्या तावडीतून भारत माता मुक्त करण्यासाठी आणि रौलेक्ट कायद्याला विरोध करण्यसाठी महात्मा गांधीजीनी पहिल्या मोठा आंदोलनाला सुरुवात केली ते आंदोलन म्हणजे असहका आंदोलन. असहकार चळवळ ही शांत,संयम आणि अहिंसेच्या मार्गाने १९२०-२२ दरम्यान सुरु होती परंतु ४ फेब्रूवारी १९२२ रोजी उत्तर प्रदेश मधील गोरखपूर जवळील चौरी-चौरा येथे शांत,संयम आणि अहिंसेच्या मार्गाने आंदोलन करत असलेल्या आंदोलन कार्त्यावर इंग्रजांनी अमानुषपणे लाठीहल्ला केला तेव्हा चिडलेल्या जमावाच्या संयमाचा बांध फुटला आणि जमावाने पोलीस चौकीला आग लावली यात २२ पोलीस जिवंत जाळल्यामुळे महात्मा गांधीजींच्या अहिंसा या तत्वाला गालबोट लागल्याने असहकार आंदोलन मागे घेण्यात आले. त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला चालवून न्यायाधीश ब्रहमफिल्ड यांनी महात्मा गांधीजींना ६ वर्षाच्या कारावासाची शिक्षा आणि दंड ठोटावला. या कारावासात त्यांनी दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह यावर लिखाण केले आणि माझे सत्याचे प्रयोग या आत्मचरित्राचा काही भाग लिहिला. फार जोशात आलेले आंदोलन एकाकेकी



मागे घेतल्यामुळे तत्कालीन तरुण मोतीलाल नेहरू, देशबंधू चित्तरंजन दास आणि बद्रुद्दीन तय्यबजी हे महात्मा गांधी च्या विचारातून फारकत घेऊन १९२३ साली या त्रिमुर्तिनी स्वराज्य पक्षाची स्थापना केली. परंतु देश्बंधु चित्तरंजन दास यांचे अकाली निधन झाल्यामुळे स्वराज्य पक्ष पुन्हा कॉंग्रेस पक्षात विलीन करण्यात आला.

महात्मा गांधीजी १९२५ या वर्षी राजकीय मौन पाळले. कलकत्ता मधील १९२८च्या राष्ट्रीय कॉंग्रेसच्या अधिवेशनात सहभागी होऊन पहिल्यांदा संपूर्ण स्वराज्याची हाक दिली तसेच १९२९ च्या लाहोर मधील कॉंग्रेसच्या अधिवेशनात महात्मा गांधीजीनी “सैतान ब्रिटीश शासनाच्या समोर समपर्ण हे ईश्वर आणि मानवतेच्या विरुद्ध अपराध आहे” अशी घोषणा करून २६ जानेवारी १९३० रोजी संपूर्ण भारतात स्वातंत्र्य दिन साजरा करण्याची घोषणा केली.महात्मा गांधीजीनी १२ मार्च १९३० ला ७८ अनुयायी सोबत घेऊन साबरमती ते दांडी असा ३८५-३९० कि.मी.प्रवास करत ५ मार्च ला दांडी येथे पोहचून ६ मार्च १९३० ला दांडी येथे मीठ हातात घेऊन मिठाचा कायदा मोडला. २४ दिवसाच्या या दांडी यात्रेची तुलना नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी नेपोलियनच्या पेरीस मार्च आणि मुसोलिनीच्या रोम मार्च सोबत केली होती.

महात्मा गांधीजीनी जुलमी इंग्रज सरकारला ११ सूत्री मागणी पत्र दिले होते यंग इंडिया वृत्तपत्रातील लेखात त्याचा लेखा –जोखा स्पष्ठ केला होता परंतु ४१ दिवस उलटूनही इंग्रज सरकार आपल्या मागणीला दाद आणि प्रतिसाद देत नसल्याचे ओळखून ६ एप्रिल १९३० ब्रिटीश साम्राज्यावादाविरूढ भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस आणि महात्मा गांधीजीनी सविनय कायदे भंगाच्या आंदोलनाला सुरुवात केली. कालांतराने महात्मा गांधी आणि इंग्रज गवर्नर जनरल लॉर्ड इर्विन यांच्यात १९३१ मध्ये गोलमेज परिषद बाबत करार झाला. झालेल्या ३ गोलमेज परिषदेत भारतरत्न डॉ.बाबासेह्ब आंबेडकर सहभागी होते आणि दिन दलित अस्पृश्य समाजच्या व्यथा,वेदना आणि दलितांसाठी वेगळ्या मतदार संघाची मागणी प्रकर्षाने आणि प्रभावीपणे मांडत होते. दलितांच्या अस्पृश्यांच्या वेगळ्या मतदार संघच्या विरोधात येरवडा येथे १९३२ साली उपोषण केले. यादरम्यान डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्यात पुणे करार झाला. १९३३ला हरिजन नावाचे साप्ताहिक तर १९३४ला अखिल भारतीय ग्रामोद्योग संघाची स्थापना केली.१९३७ साली दक्षिण भारतात अस्पृश्यता निवारण अभियान राबविले.१९४० साली वैयक्तिक सत्याग्रहाची संकल्पना मांडून आचार्य विनोबा भावे यांना पहिले सत्याग्रही म्हणून निवडले. ९ ऑगस्ट १९४२ला देशाचा संसार करणाऱ्या कफल्लक भारत मातेच्या पुजाऱ्याने छोडो भारत ची हाक दिली आणि गल्ली ते दिल्ली सारा समाज हातातील कामधंदा सोडून भारत माता इंग्रजांच्या पाशवी साखळ दंडातून मुक्त करण्यासाठी सारा भारत एकवटला.’करा या मरा -DO OR DIE” चा जाज्वल्य नारा दिला. २२ फेब्रूवारी १९४४ ला कस्तुरबाचे वयाच्या ७४ व्या वर्षी निधन झाले.कस्तुरबाच्या जाण्याने महात्मा गांधी वैयक्तिक जीवनात एकाकी पडले परंतु त्यांची स्वप्ने,ध्येय,निष्ठा आणि भारतमाता मुक्तीच्या स्वांतंत्र्याची आस आणि आशा कायम मनात तेवत राहिली. १५ ऑगस्ट १९४७ ला भारत माता इंग्रजांच्या पाशवी जोखंडातून मुक्त झाली. भारत स्वतंत्र झाला. दिल्लीच्या लाल किल्यावर स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंनी तिरंगा फडकाविला.इंग्रजांनी अनेक आहुत्या घेऊन स्वातंत्र्य दिले पण ते रक्त रंजित दिले.अखंड भारतातून कायम डोकेदुखी ठरलेलं पाकिस्तान निर्माण झाला. अखिल भारतात साम्प्रादायिक दंगे सुरु होते. रक्तपात सुरु होता भारत मातेच्या एका डोळ्यात स्वतान्त्र्याचा उगवता सूर्य प्रकाशमान होत होता तर दुसऱ्या डोळ्यातून आपल्याच पुत्राकडून आपल्या सापुतांची होणारी चिरफाड पाहून अश्रुंचे पाट वाहत होते .उगवणारा सूर्य लख्ख प्रकाश आणि गडद काळ्या आठवणींचा काळा इतिहास घेऊन उगवत अन मावळत होता. एकाच वेळी देशात स्वतान्त्र्याचा महोत्सव आणि माणस मारण्याचा उत्सव सुरु होता आणि हा महात्मा भारतमातेच्या आणि भारतीयांच्या भलभलत्या जखमेवर यथाशक्ती उपचार करत होता..राष्ट्र पित्याची ही अवस्था पाहून भारतमाता ही व्याकूळ आणि उद्विग्न होत होती. ३० जानेवारी १९४८ला दिल्लीच्या बिर्ला भवनात प्रार्थना झाल्यावर बागेत फिरताना नत्थुराम गोडसे नावाच्या माथेफिरूने घात केला महात्मा गांधीची ७८ व्या वर्षी गोळ्या घालून हत्या केली. भारत मातेच्या सेवेसाठी अविरत अथक आणि अविश्रांत कार्य करणारा जागतिक अहिंसेच तत्व जाणणारा आणि जगणारा एक महान तपस्वी दिल्लीत यमुना नदीच्या काठावर राजघाटावर समाधीस्त आहे.

महात्मा गांधी हे सदा सर्वदा सर्वंकष सर्वांगसुंदर व्यक्तिमत्व आहे. जे गांधी विचारांचा वसा आणि वारसा चालवितात त्यांना मार्गदर्शक आहे आणि जे गांधी विचारांच्या प्रवाहाच्या विरोधात प्रवाहित आहेत त्यांना मदतगार आहे. गांधी विचारांच्या समर्थकांच सामर्थ्य त्यांच्या सत्वात तर विरोधकांचे अस्तित्व ही महात्मा गांधीजींच्या तत्वातच आहे. कारण गांधी वादी असो वा प्रतिवादी,समर्थक असो की विरोधक महात्मा गांधी आणि गांधी तत्व मानल्याशिवाय आणि जाणल्याशिवाय पर्याय नाही.कारण महात्मा गांधीजीचे सत्य, अहिंसा,अस्तेय,आत्मक्लेश आदि आकार तत्व आजही समस्त विश्वाला विश्वासाहार्य प्रेरक,पूरक आणि प्रमाणबद्ध आहे..आज ३० जानेवारी महात्मा गांधीजीची ७४वी पुण्यतिथी. महात्मा गांधीजींच्या पावन स्मृतींना विनम्र अभिवादन.

# क्षुद्रातिक्षुद्रांच्या वेदना-विद्रोह प्रकटक: मूकनायक !



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**मूकनायक या पाक्षिकाचा मुख्य उद्देश दलित, गरीब व शोषित लोकांच्या व्यथा- त्यांचा आवाज सरकारपर्यंत आणि इतर जनतेपर्यंत पोहचवणे हा होता. त्यासाठी महामानव विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लेखांमधून बहिष्कृत अस्पृश्य समाजावर होत असलेल्या अन्यायावर प्रकाश टाकला. त्यातून त्या समाजाच्या उन्नतीसाठी तत्कालिन ब्रिटिश सरकारला काही उपाययोजना सुचवल्या. अस्पृश्यांचा उद्धार किंवा विकास होण्यासाठी त्यांनी राजकिय सत्ता व शैक्षणिक ज्ञान मिळवणे गरजेचे आहे, असे त्यांना नेहमी वाटत असे.**

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेले मराठी भाषेतील मूकनायक हे एक पाक्षिक आहे. इथूनच त्यांच्या न्याय्य पत्रकारितेस खरीखुरी सुरूवात झाली. ते पाक्षिक त्यांनी समाजाच्या वेदना व विद्रोह प्रकट करण्यासाठी सुरू केले होते. दि.३१ जानेवारी १९२० रोजी या पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित करण्यात आला. हे पाक्षिक मुंबईहून निघत असे. पांडुरंग नंदराम भटकर नावाच्या महार जातीच्या शिक्षित तरुणाने या पाक्षिकाचे संपादक केले. कारण डॉ.आंबेडकर हे त्यावेळी सिडनेहॅम कॉलेजमध्ये प्रोफेसर म्हणून काम करीत होते. त्यामुळे त्यांना उघडपणे संपादक पदावर कार्य करणे शक्य नव्हते. म्हणून त्यांनी मूकनायकाच्या व्यवस्थापकपदी ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप यांची नेमणूक केली होती. पहिल्या अंकातील मनोगत नावाचा अग्रलेख आंबेडकरांनी स्वतः लिहिला होता. पुढील तेरा अंकातही त्यांनी लेख लिहिले. मूकनायकासाठी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी २ हजार ५ शे रुपयांची आर्थिक मदत दिली होती. आंबेडकरांनी मूकनायक मराठी भाषेमध्ये प्रकाशित केले, कारण मराठीच त्याकाळी सामान्य जनतेची भाषा किंवा लोकभाषा होती आणि बाबासाहेबांचे कार्यक्षेत्र- कर्मभूमी महाराष्ट्र होते. तसेच तेव्हा महाराष्ट्रातील दलित जनता जास्त शिकलेली नव्हती, ती केवळ मराठीच समजू शकत होती. मूकनायकच्या पहिल्या अंकात हा मजकूर होता, "हिंदू समाज हा एक मनोरा आहे व एक एक जात म्हणजे त्याचा एक एक मजला होय. पण लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही की, या मनोऱ्याला शिडी नाही आणि म्हणून एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्याचा मार्ग नाही. ज्या मजल्यात ज्यांनी जन्मावे त्याच मजल्यात त्यांनी मरावे. खालच्या मजल्यातला माणूस कितीही लायक असो, त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही व वरच्या मजल्यातला माणूस मग तो कितीही नालायक असो, त्याला खालच्या मजल्यात लोटून देण्याची प्रज्ञा नाही."

विश्वरत्न बोधीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेले दोन पाक्षिके मूकनायक व बहिष्कृत भारत हे होत. बाबासाहेब म्हणाले होते, "कोणतीही चळवळ यशस्वी करण्यासाठी त्या चळवळीचे वर्तमानपत्र असावे लागते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसते, तीची अवस्था पंख तूटलेल्या पक्षाप्रमाणे होते." या पाक्षिकाने अस्पृश्य वर्गात जागृती निर्माण केली व त्यांना आपल्या अधिकारांची जाणिव निर्माण करून दिली. मूकनायकाचे ध्येय धोरण स्पष्ट करण्यासाठी त्यावर बिरुदावली म्हणून जगदगुरु संत तुकाराम महराजांच्या अंभगाच्या ओळी छापल्या जात असत- "काय करू आता धरुनिया भीड| निशंक हे तोंड वाजविले ||१|| नव्हे जगी कोणा मुकियाची जाण| सार्थक लाजोनी नव्हे हित||२||" मूकनायक या पाक्षिकाचा मुख्य उद्देश दलित, गरीब व शोषित लोकांच्या व्यथा- त्यांचा आवाज सरकारपर्यंत आणि इतर जनतेपर्यंत पोहचवणे हा होता. त्यासाठी महामानव विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लेखांमधून बहिष्कृत अस्पृश्य समाजावर होत असलेल्या अन्यायावर प्रकाश टाकला. त्यातून त्या समाजाच्या उन्नतीसाठी तत्कालिन ब्रिटिश सरकारला काही उपाययोजना सुचवल्या.




अस्पृश्यांचा उद्धार किंवा विकास होण्यासाठी त्यांनी राजकिय सत्ता व शैक्षणिक ज्ञान मिळवणे गरजेचे आहे, असे त्यांना नेहमी वाटत असे. दि.५ जुलै १९२० रोजी बाबासाहेब पुढील शिक्षणासाठी लंडनला रवाना झाले. त्यानंतर दि.३१ जुलैपासून मूकनायकाचे संपादक पद ज्ञानेश्वर ध्रुवनाथ घोलप यांच्याकडे आले.

पहिल्या अंकाच्या संपादकीयमध्ये जन्मप्रतिज्ञा अशी व्यक्त केली होती- "आमच्या या बहिष्कृत लोकांत होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचविण्यास तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रासारखी अन्य भूमीच नाही. परंतु मुंबई इलाख्यात निघत असलेल्या इतर वृत्तपत्रांकडे पाहिले असता असे दिसून येईल की, त्यातील बरीचशी पत्रे विशिष्ट अशा जातीचे हितसंबंध पाहणारी आहेत. इतर जातीच्या हिताची त्यांना पर्वा नसते. इतकेच नव्हे तर, केव्हा केव्हा त्यांना अहितकारक असेही त्यातून प्रलाप निघतात. अशा वृत्तपत्रकारांना आमचा इशारा एवढाच, की कोणतीही एखादी जात अवनत झाली, तर तिच्या अवनतीचा चटका इतर जातीत बसल्याशिवाय राहणार नाही. समाज ही नौकाच आहे. ज्याप्रमाणे आगबोटीतून प्रवास करणाऱ्या उतारूने जाणूनबुजून इतरांचे नुकसान करावे, म्हणून म्हणा किंवा आपल्या विनाशक स्वभावामुळे म्हणा, जर का इतरांच्या खोलीस छिद्र पाडले तर सर्व बोटीबरोबर त्यालाही आधी किंवा मागाहून जलसमाधी ही घ्यावीच लागणार आहे. त्याचप्रमाणे एका जातीचे नुकसान केल्याने, अप्रत्यक्ष नुकसान करणाऱ्या जातीचेही नुकसान होणार यात बिलकूल शंका नाही.

म्हणूनच स्वहितसाधू पत्रकारांनी इतरांचे नुकसान करून आपले हित करावयाचे पढतमूर्खाचे लक्षण शिकू नये." सद्यस्थितीत मूकनायकाचे १९ अंक उपलब्ध आहेत. त्यांत डॉ.आंबेडकरांनी वैचारिक लिखाण केलेले आढळते. मूकनायक या पत्राने सामाजिक व धार्मिक क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रातही अस्पृश्यांनी बलवत्तर स्थान निर्माण केले पाहिजे, ही जाणीव निर्माण केली. सदर पत्रात विविध विचार, वर्तमानसार, निवडक पत्रातील उतारे, क्षेम, समाचार, कुशल प्रश्न, शेला पागोटे ही सदरे होती. मात्र काही अपरिहार्य कारणास्तव मूकनायक हे एप्रिल १९२३मधे बंद पडले. जरी ते बंद पडले असले तरी ते बहुजन समाजाला आपल्यावरील अन्यायाचा टाहो असा फोडून संबंधितांचे लक्ष वेधता येते, ही शिकवण व प्रखर पत्रकारितेचे विविध पैलू उलगडून दिले. त्याची फलश्रुती म्हणजे आज निर्माण झालेले सर्व समाजातील असंख्य प्रज्ञावंत पत्रकार होत. जय भीम, जय शिवराय, जय जोती, जय क्रांती! !! मूकनायक पाक्षिकाच्या आरंभ दिनानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा !!


# गौर सर्कलमधील श्रीक्षेत्र गंगाजीबापू-सोमेश्वर महादेव देवस्थान व कंठेश्वर महादेव देवस्थान तीर्थक्षेत्र दुर्लक्षित

## पूर्णा तालुक्यातील जागृत देवस्थानांच्या विकासाकडे प्रशासनासह लोकप्रतिनिधी लक्ष देतील काय ?

आधुनिक केसरी न्यूज

**दिनेश चौधरी**

**पूर्णा :** हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ या तालुक्याला धार्मिक तिर्थक्षेत्राचा दर्जा मिळवून देणाऱ्या बारा ज्योतीर्लिंगा पैकी एक असलेल्या औंढ्यातील औंढा नागनाथ या जागृत देवस्थाशींच साम्य असलेले पुर्णा तालुक्यातील गौर जिल्हा परिषद सर्कल मधील गौर गावातील अत्यंत जागृत देवस्थान असलेल्या श्री सोमेश्वर महादेव देवस्थान तर याच सर्कल मधील मौ कठेश्वर येथील पुर्णा-गोदावरी नदी संगमावरील श्री कोटेश्वर महादेव देवस्थान ही मंदीरसुद्धा अत्यंत पुरातन व हेमाडपंथी असतांना सुध्दा याकडे प्रशासनासह लोकप्रतिनिधी का दुर्लक्ष करीत असतील ? या प्रश्नाने संपूर्ण तालुक्यातील जनता प्रश्नार्थक मुद्रेत वावरतांना दिसत असून या दोन जागृत देवस्थानांसह याच गौर सर्कलमधील श्रीक्षेत्र गंगाजीबापू देवस्थानाकच्या विकासाकडे सुध्दा प्रशासनासह लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष होत असल्याने या जागृत देवस्थानाच्या दर्शनासाठी दर अमावश्या व पोर्णिमेला येणाऱ्या हजारो भाविकभक्तांना या अविकसित देवस्थांच्या दर्शनासाठी येतांना असंख्य समस्यांना सामोरे जावे लागत आहे. तालुक्याला धार्मिक पर्यटन क्षेत्राचा दर्जा प्राप्त करून देण्याची क्षमता असलेल्या गौर येथील श्री.सोमेश्वर महादेव देवस्थान,कंठेश्वर येथील श्री कोटेश्वर महादेव देवस्थान व ज्या देवस्थानाच्या दर्शनासाठी राज्यासह अंतरराज्यातीलही भाविक दर्शनासाठी येतात असे श्रीक्षेत्र गंगाजीबापू देवस्थान या तिनही देवस्थानांच्या जोडणाऱ्या रस्त्यांचा सुध्दा विकास झालेला नसल्याने प्रशासन व लोकप्रतिनिधींची अकार्यक्षमता उजागर होतांना पाहावयास मिळत असून या गौर सर्कल मधील रस्त्यांचाच विकास झाला नाही तर या तिर्थक्षेत्रांचा विकास काय खाक होणार ? या जागृत देवस्थानांचा अद्याप पर्यंत कुठल्याही प्रकारचा विकास झाल्याचे निदर्शनास येत नसून गौर गावातील श्री सोमेश्वर मंदीर व मंदीर परिसरातील हेमाडपंथी बारव धार्मिक पर्यटकांसाठी अत्यंत आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरत असतांना या हेमाडपंथी बारवाची झालेली पडझड सुध्दा या गौर सर्कलसह तालुक्याती लोकप्रतिनिधींना निदर्शनास येत नसल्याने एकंदर 'आंधळ दळतय अन् कुत्र पिठ खातय' अशी अवस्था या परिसराची झालेली दिसत आहे. तालुक्यातील अत्यंत जागृत व भक्तांच्या नवसाला पावणारी ही तिन्ही धार्मिक स्थळ अत्यंत जागृत मानली जात असल्यामुळे या देवस्थानांना प्रतिवर्षी हजारो भाविक भेट देत असतात तर याच जिल्हा परिषद सर्कल मधील मौ.पिंपळगाव लिखा शिवारातील गोदावरी नदीपात्रावर असलेल्या श्रीक्षेत्र गंगाजीबापू देवस्थानाला प्रत्येक आमावश्या-पोर्णिमेला हजारो भाविक दर्शनाला येत असल्याने या परिसराला अक्षरशः जत्रेचे स्वरूप प्राप्त होत असते परंतु अत्यंत दुर्दैवाची बाब म्हणजे या परिसराच्या विकासाकडे प्रशासनासह स्थानिक लोकप्रतिनिधींचेही दुर्लक्ष होत असल्यामुळे हा परिसर विकासापासून अद्यापही कोसो दुर असल्याचे निदर्शनास येत असून यास सर्वस्वी या तिनही गावातून निवडून येणारे लोकप्रतिनिधी अर्थात सरपंच-उपसरपंचांसह जिल्हा परिषद सदस्य-पंचायत समिती सदस्य अशिक्षित निवडून येत असल्यामुळे या जिल्हा परिषद सर्कल मधील गावांसह या जागृत देवस्थान परिसरात कुठलाच विकास झाला नसल्याचे स्पष्टपणे दिसत असून संबंधित तिनही गावातील ग्राम पंचायतींनी धार्मिक पर्यटनस्थळ घोषित करण्या संदर्भात ग्राम पंचायतींमध्ये ठराव पास केल्यास या गौर जिल्हा परिषद सर्कल मधील देवस्थानांचा विकास होण्यास वेळ लागणार नाही असे मतजनसामान्यांतून व्यक्त होत आहे.


श्रीक्षेत्र गंगाजीबापू देवस्थान





# अली अलाना माध्यमिक विद्यालय कुंजखेडामध्ये प्रजासत्ताकदिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** अली अलाना उर्दु प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कुंजखेडा ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे प्रजासत्ताक दिन मोठ्या अभिमानाने आणि श्रद्धेने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात झहीर पटेल सर, नजमुस्सहर मॅडम आणि अताउल्लाह सरांनी केली संस्थेचे सचिव फारुक इसहाक रंदेरा व मुख्याध्यापक.मोगल शरीफ बेग यांच्या शुभ हस्ते तिरंगा ध्वज फडकविण्यात आला. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत झाला मुख्याध्यापकांनी शाळे ची सुरुवात पासून ते आज पर्यंत ची प्रगती ची माहिती थोडक्यात दिली. विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम मोढया उत्साहाने सादर केले त्या मध्ये भाषणे , देशभक्तीपर गीते ऐकली आणि गायली यामुळे मुलांमध्ये आणि शिक्षकांमध्ये देशाप्रती अभिमानाची भावना निर्माण झाली , देशाबद्दल अभिमान, प्रेम आणि आदर, कला प्रकार; रेखाचित्रे सादरीकरणाने निष्ठा, देशभक्ती निर्माण होते आणि आपला समृद्ध ऐतिहासिक, पारंपारिक आणि सांस्कृतिक वारसा, प्रदर्शित होतो. "सारे जहाँ से अच्छा हिंदुस्थान हमारा" या गोष्टीचा अभिमान वाटल्याशिवाय कोणताही उत्सव पूर्ण होत नाही. झाहिद अंजुम सरांनी खुप छान अँक्शन साँग आणि ड्रामा तयार करुन सादरीकरण केले. कुंजखेडा गाँव चे सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामस्थ, पालक, उमर बिन खत्ताफ वेल्फेर ट्रस्ट चे सर्व युनिट चे प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी , मौलाना इब्राहीम आणि अनेक मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी इकबाल अन्सारी, एजाज अन्सारी, मोहसीन हसन, हाशिम देशमुख,साजिद सैय्यद, मोबिन पटेल, साकिब अहमद, अनवर सिद्दीकी, वसीम खान, इल्यास पटेल, नगमा शादाब,सीमा शेख, फायका नसरीन, सना शेख तसेच शिक्षकेतर कर्मचारी इब्राहीम खान, शेख अतीक, मुख्याध्यापक शरीफ बेग यांनी परिश्रम घेतले.

# चेअरमनपदी यशंवत देवकर यांची बिनविरोध निवड

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** सहकार खाते कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन पदी यंशवत देवकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. पतसंस्थेच्या रिक्त असलेल्या पदासाठी ही निवडणूक घेण्यात आली होती. सहकार खाते कर्मचारी सहकारी पतसंस्थेची दर पाच वर्षांनी निवडणूक घेतली जाते. दरम्यान मागील वर्षी झालेल्या निवडणुकीत पतसंस्थेच्या चेअरमन पदी शरद तनपूरे हे निवडूण आले होते. त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने हे पद रिक्त होते. जिल्हा निवडणुक आधिकारी यांनी संबंधित पदाची निवडणूक घ्यावी असेआदेश विभागाला दिले. या अनुषंगाने प्रशांत सदाफुले यांनी नियुक्ती करण्यात आली होती. निवडणूक जाहिर झाल्यानंतर पदासाठी नावे मागवण्यात आली होती. दरम्यान चेअरमन पदासाठी केवळ यंशवत उत्तमराव देवकर याचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची संचालक मंडळाच्या वतिने बिनविरोध निवड करण्यात आली. या प्रसंगी संचालक मंडळातील सदस्याची उपस्थिती होती. सदाफूले यांनी यंशवत देवकर यांची पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.



आधुनिक केसरी न्यूज

कैलास विद्यालय बोडखा तालुका खुलताबाद येथे कैलास ससे, मुख्याध्यापक यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळेस घृष्णेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सोनवणे सर, उपाध्यक्ष निकम सर, संस्थेचे सचिव साहेब श्री खंडागळे सर, संस्थेचे सदस्य जाधव सर तसेच गावातील सरपंच उपसरपंच चेअरमन पोलीस पाटील ग्रामपंचायत सदस्य व गावातील प्रतिष्ठित नागरिक, माजी विद्यार्थी बहुसंख्याने उपस्थित होते.


नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा
• घाऊक आणि किरकोळ
• किराणा, सुका मेवा, मसाले
• क्रॉकरी, घरगुती उपकरणे
• प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
• घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद

# आ. आवताडे यांची जिल्हा नियोजन समितीच्या विशेष सदस्यपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**ज्योती खिलारे**

**पंढरपूर :** बोले तैसा चाले... त्याची वंदावी पाऊले.. पंढरपूर मंगळवेढा विधानसभा पोटनिवडनुकीमध्ये ज्याप्रमाणे कासेगाव येथील जनतेला आपल्या गावच्या धोरणात्मक विकासासाठी हवा तेवढा निधी उपलब्ध करून देऊ असा शब्द दिला होता. दिलेला शब्द शिरोधैर्य ठेवून एका वर्षात भरघोस निधी मंजूर करून दिल्याबद्दल व आमदार मा.समाधान दादा आवताडे यांची जिल्हा नियोजन समिती वर विशेष सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा जंगी स्वागत पर सत्कार करण्यात आला. यावेळी आमदार महोदय यांनी आपल्या भाषणात बोलताना तालुक्यातील व पंचक्रोशीतील हजारो युवकांना रोजगार देण्याचे उद्देश डोळ्यासमोर ठेवत

त्या अनुषंगाने MIDC च्या कामास लवकरच प्रारंभ होणार असल्याचे ही सांगितले .

तसेच आपल्या ला पाणी प्रश्न असू द्या लाईट चा प्रश्न असू द्या किंवा रस्ते असू द्या त्या प्रश्ना साठी कायम कटिबध्द राहून आपले सर्व प्रश्न मार्गी लावण्यासाठी सदैव प्रयत्नशिल असल्याचेही त्यांनी आवर्जून यावेळी सांगितले. मतदार संघात पाहिजे तिथे पाहिजे तेवढ्या निधीची मागणी करा कारण केंद्रात पण आपले सरकार आणि राज्यात पण आपले सरकार डबल इंजिन सरकार आहे निधीला कमी पडू देणार नाही फक्त तुम्ही मागणीला कमी पडू नका. यावेळी सत्कार समारंभ



संपन्न होत असताना श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन साखर सम्राट अभिजीत आबा पाटील यांनी शेतकऱ्यांचा बंद पडलेला राजवाडा चालू केल्याचे सांगत यांच्या ही कामाची प्रशंशा करीत त्यांचे कौतुक केले शेवटी कासेगाव गटनेते समाधान घायाळ यांनी आमदार समाधान दादा अवताडे साहेबांचा व विठ्ठल सहकारी चे चेअरमन अभिजीत पाटील सर्व संचालक, रोंगे सर, मारापुरचे लोकनियुक्त सरपंच विनायक यादव साहेब विविध पदाधिकारी या सर्व मान्यवरांचा व विविध खेळात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचाही यावेळी सत्कार घेतल्याबद्दल व आमदार अवताडे साहेबांनी कासेगाव येथे दिलेल्या भरघोस निधीबद्दल अभिनंदन करीत आभार मानले. यावेळी विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजित आबा पाटील,तसेच व्हा.चेअरमन डॉ. बी पी रोंगे सर, मारापुरचे लोकनियुक्त सरपंच विनायक यादव, तुकाराम आबा कूरे, गट नेते समाधान घायाळ, भास्कर घायाळ, लक्ष्मण जाधव, भिमा आबा भुसे, हनुमंत ताटे, पांडूरंग खिलारे, अनिकेत देशमुख, औदुंबर निकम, विठ्ठल लवटे महाराज, मारुती नाना काळे मेंबर, संभाजी पाटील, संभाजी कुरे, तसेच भुसे परिवारातील सर्व सदस्य पदाधिकारी ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.



# दयानंद वाणिज्य महाविद्यालयात 'स्टॉक मार्केट अवेअरनेस' कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि 'एनआयएसएम' आणि 'फिन्लीट' सेलच्या वतीने 25 जानेवारी 2023 रोजी 'स्टॉक मार्केट अवेअरनेस' या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी एक दिवसीय कार्यक्रम पार पडला. सदर कार्यक्रम नॅशनल स्टॉक एक्सचेंज आणि नॅशनल सेक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला. यावेळी एनएसडीएलचे संदीप वर्मा आणि एनएसईचे व्यवस्थापक अमित पाठक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. राजाराम पवार होते, तर मंचावर संदीप वर्मा, अमित पाठक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.बालाजी कांबळे, एनआयएसअम-फिन्लीट सेलच्या प्रभारी डॉ. रूपा गिल्डा आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.बालाजी कांबळे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ.रूपा गिल्डा यांनी करून दिला. यावेळी संदीप वर्मा आणि अमित पाठक यांनी स्टॉक मार्केटबद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप प्रभारी प्राचार्य डॉ. राजाराम पवार यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अनुजा कांबळे यांनी तर शेवटी आभार प्रा.पंकज भराडिया यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.लक्ष्मीकांत सोनी, डॉ.खदीर शेख, प्रा. प्रेमसागर मुंदडा, प्रा.प्रसाद पाटील आदींनी परिश्रम घेतले.

# वीरभद्र यात्रेत भगत यांनी ओढल्या १२ बैलगाड्या

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** शहराचे आराद्य दैवत असलेल्या श्री वीरभद्र यात्रेत रोहिदास भगत यांनी पूर्वापार चालत आलेली बारा गाड्या ओढण्याची परंपरा दि.२९/१/२३ रविवार रोजी बारा गाड्या ओढून राखली त्यांनी कमरेला हुक लावला दोर उभ्या एकाला एक अशा बांधलेल्या १२बैल गाड्याना स्वामी समर्थ मंदिर ते वीरभद्र मंदिरपर्यंत बारा गाड्या ओढत नेल्या. त्यांना सहकार्य करण्यात आले. या प्रसंगी जेष्ठ पत्रकार घनश्याम वाणी, धोंडीरामसिंह राजपूत सेवानिवृत्त गटशिक्षण अधिकारी, शिवसेना तालुका प्रमुख राजेंद्र



पा, साळुंके, बाबुराव गावडे, रामकीसन जोरे,बापू गावडे, ललित गावडे, प्रणव गावडे,गणेश डुकरे, पप्पू लांडे, सुरेश घाटे, कैलास वाघ, गोरख गावडे, अक्षय मोटे, बाबुराव गावडे यानी प्रतिष्ठित नागरिकांचा श्रीफळ देऊन सत्कार केला. सकाळी पालखी व छडी मिरवणूक काढण्यात आली. या निमित्ताने शोभेची दारू सोडण्यात आली. रात्री आठ वाजता पारंपरिक ओव्या व फडसुद्धा आयोजित केला होता, बाबुराव गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली गोरख गावडे यांनी नियोजन केले. ललित गावडे यांनी आभार मानले.

# शिवाजी विद्यालयात महात्मा गांधी यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील जय कालिंका देवी शिक्षण प्रसारक संस्था संचलित कै लक्ष्मणराव भीमराव कोलते पाटील कला वाणिज्य विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय सावळदबारा येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथी व हुतात्मा दिन दिन साजरा करण्यात आला याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष सचिव व संचालक मंडळ उपस्थित होते संस्थेचे कार्याध्यक्ष श्री नारायण रायभान कोलते यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले त्याबद्दल प्राध्यापक पंजाबराव शेळके यांनी सविस्तर माहिती दिली व या हुतात्मा दिनामध्ये शहीद



झालेल्या सर्वांना अभिवादन करून या लढ्यासाठी हुतात्मा बहाल केलेल्या नेतृत्वांचे आभार मानण्यात आले व यलत्याचे औचित्य साधून सलग्न महाविद्यालयात नामविस्तार दिनाचे कार्यक्रम साजरे केले जातात.

याप्रसंगी वरिष्ठ महाविद्यातील प्राचार्य जयराम घोती शिक्षकबंधू विकास पाटील विजयसिंह राजपूत भास्कर ससाने विनोद जाधव सुदाम राठोड पोपटराव सोनवणे शिवाजी सत्रे व प्राध्यापक योगेश थोटे दीपक सिसोदे किशोर चोपडे योगेश राठोड सुनील कुमार चव्हाण योगेश शेळके प्रवीण महाले अनिता घोडके संजय अमृतकर हिरालाल सोनवणे अनिल सुरडकर मनोहर पडोळ सतीश गावंडे मोहन बोरे सतीश खवले गणेश मोहने सुभाष राठोड विकास पंडित व इतर शिक्षकेतर कर्मचारी विनोद राठोड राहुल बडक गजानन चव्हाण उपस्थित होते.



# परिवर्तन कॉम्प्युटर्स येथे प्रजासत्ताक दिन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** प्रजासत्ताक दिन निमित्ताने व याच दिवशी भारताने संविधान लागू केले असल्यामुळे परिवर्तन कॉम्प्युटर्स, जयभवानीनगर, मुकुंदवाडी येथे झेंडावंदन कार्यक्रम आयोजित केला होता. डॉ. उमाकांत राठोड सिनेट मेम्बर डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, सुभाष महेर, संघटक राष्ट्र सेवा दल यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. याप्रसंगी परमेश्वर दसपुते, कैलास मगारे, विष्णू साळसकर, भारतीय महिला फेडरेशनच्या राज्य सह सहसचिव शाहीर वसुधा कल्याणकर, व महिला सल्ला केंद्राच्या प्रमुख ॲड. नीता शिंगणे, मधुकर खिल्लारे, बाळासाहेब सोळंके, दिलीप पवार, तुळशीराम खरात, सुरेश ठोंबरे, रूपचंद ढवळनपुरे, संजय अंभोरे, प्रा प्रकाश कांबळे आदी मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती.

# घाटीने आम्हाला घडवले आता हे ऋण फेडणार

## दीडशेहून अधिक प्रतिथयश डॉक्टरांचा मेळा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अर्थात घाटीने आम्हाला केवळ चांगले डॉक्टरच नाही बनवले तर सामाजिक, वैयक्तिक आणि व्यावसायिक जिवनात घाटीमुळेच आम्ही सक्षमपणे उभे आहोत. हे ऋण फेडण्याची वेळ आता आली आहे. माजी विद्यार्थी या नात्याने यापुढे घाटीच्या विकासात आणि गरीब रुग्णांच्या सेवेसाठी सक्रिय मदत करणार असा निर्धार आज घाटीच्या माजी विद्यार्थ्यांच्या मेग गेट टुगेदर मध्ये शहरातील प्रतिथयश डॉक्टरांनी केला.



१९९५ ते २००५ च्या अकरा बॅचचे आणि शहरातले आजचे प्रतिथयश डॉक्टर आज घाटी या एका सामायिक बंधात एकत्र बांधले गेले होते. निमित्त होते माजी विद्यार्थ्यांच्या मेग गेट टूगेदर चे. अकरा बॅचचे शहरातील सुमारे दिडशे ते दोनशे डॉक्टर एकाच मंचावर येण्याची ही बहुदा पहिलीच वेळ असावी. हॉटेल ॲम्बेसिडर मध्ये भरलेल्या या मेळयास दुपारी चार वाजेपासून सुरुवात झाली. नोंदणी टेबलपासूनच आठवणींच्या पे*Nयांना सुरुवात झाली होती. एकाच बॅचच्या डॉक्टरांचा ग्रुप जमला तर वेगवेगळ्या बॅचच्या डॉक्टरांनी परस्परांची ओळख करुन घेतली. आपल्यापेक्षा वरिष्ठ बॅचच्या डॉक्टरांप्रती आदर आणि त्यांच्या अनुभवांची देवाण घेवाण सुरुच होती. सहाच्या सुमारास एका मागोमाग एक डॉक्टरांनी मंचावर येऊन आपला परिचय करुन देण्यास सुरुवात केली त्यावेळी घाटीने घडवलेले डॉक्टर किती मोठ्या प्रमाणात सेवा बजावत आहेत याचा उलगडा झाला. फॅमिली डॉक्टर्सपासून ते गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया करणारे, कॅन्सर सारख्या दुर्धर आजावर उपचार करणारे तर अवघ्या काही दिवसांच्या बाळावर शस्त्रक्रिया करणारे बालरोगशल्यचिकित्सक अशा अनेक वैद्यकीय शाखांमध्ये सेवा बजावणारे डॉक्टर घाटीने घडवले हेच डॉक्टर आता घाटीच्या विकासात योगदान देणार असल्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. घाटीच्या माजी अधिष्ठाता डॉ. कानन येळीकर यांनी यावेळी बोलताना वैद्यकीय व्यवसायात असताना रोज रात्री स्वतःला विचारावे मी आज काय कमावले ? याचे उत्तर समाधान असेल तर तुम्ही तुमचा व्यवसाय सचोटीने करत आहात असे समजा. डॉक्टरांनी पैसे कमवतानाच प्रत्येकाने नैतिकताही जपल्या पाहिजेत अशी अपेक्षा व्यक्त केली. संयोजन समितीचे डॉ . शिवाजी पोले यांनी घाटी माजी विद्यार्थी संघटनेचे भविष्यातील उपक्रमाबद्दल माहिती दिली तर, डॉ. अमोल उबाळे यांनी सर्व डॉक्टरांनी एकत्र कुटुंब म्हणून काम करण्याची अपेक्षा व्यक्त केली. केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड, अधिष्ठाता डॉ संजय राठोड, डॉ. एस.तालिब, पी.वाय. मुळे , डॉ. सचिन खळाळ, डॉ. उज्जवला दहिफळे यांनी ऑनलाईन शुभेच्छा दिल्या . डॉ . प्रकाश देवडे आभार मानले . डॉ . प्रशांत सोळंके, डॉ . सुनील भोकरे यांचीउपस्थिती होती.



# वरखेडे येथे अमोल महाराज यांचे कीर्तन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सुशीलाबाई लोखंडे यांच्या द्वितीय पुण्यस्मरण निमित्त वरखडे येथे प्रख्यात कीर्तनकार अमोल महाराज घुगे (आळंदीकर) यांचा रविवारी कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला गेला. यात शेकडोच्या संख्येने परिसरातील नागरिक उपस्थित होते. पुण्यतिथीनिमित्त अनेक उपक्रम राबवत असतात परंतु लोकांमध्ये कीर्तनाच्या माध्यमातून माणुसकी जागृत होण्यासाठी अविनाश लोखंडे यांच्या माध्यमातून हा कार्यक्रम राबवण्यात आला. जिवंत असताना पाप पुण्य चे भागी कसे बनायचे व आयुष्याचा संपूर्ण सार कीर्तनाच्या माध्यमातून अमोल महाराजांनी सादर केले. या कीर्तनामुळे सगळ्यांचे मन भरून गेले त्यामुळे सगळ्यांनी अविनाश लोखंडे यांचे आभार मानले.

# नादरपूर येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण

## सरपंच सविता निकम यांच्या उपस्थितित विविध विकास कामांचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** नादरपूर, ता.कन्नड येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त 75 वा ध्वजारोहण कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ग्रामपंचायत कार्यलयाचा ध्वजारोहण नादरपूर येथील भूमिपुत्र श्री रमेश विटोरे माजी सैनिक तथा पोलीस उपनिरिक्षक राज्य उत्पादन शुल्क औरंगाबाद यांचे हस्ते करण्यात आले व औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सह.बँकेचे ध्वजारोहण शाखा व्यवस्थापक एम.के. सुरे यांचे हस्ते करण्यात आले तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे ध्वजारोहण शालेय समितीचे उपाध्यक्ष सौ.वैशाली शिंगारे यांचे हस्ते करण्यात आले. त्यानंतर ग्रा.पं. च्या वतीने गावांतील पुरातन अशा वेशीसमोर भालदार व चोपदार यांचे पुतळे बसवून त्याचे अनावरण करण्यात आले तसेच नादरपूर येथील माजी सरपंच व गावातील आजी, माजी सैनिक यांचे फोटो जेष्ठ नागरिक कक्ष येथे लावण्यात आले. यानिमित्ताने गावातील आजी माजी सैनिकांचा ग्राम पंचायतच्या वतीने सत्कार करण्यात आला. पाणी पुरवठा ठेकेदार सोकिया शेठ यांचाही सत्कार करण्यात आला.याप्रसंगी श्री रमेश विटोरे यांनी गावातील मुलांना स्पर्धा परीक्षेसाठी उपयुक्त असे 100 पुस्तके ग्रा.पं.च्या ग्रंथालयास मोफत दिले. ग्रामीण जन आरोग्य अभियान अंतर्गत ग्रामीण व शहरी पर्यावरण सेवाभावी संस्था औरंगाबाद यांचे वतीने भव्य आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट अशी भाषणे सादर केली. भानुदास पा.निकम नादरपूर ह.मु.वाफी यांनी त्यांचे मुलाच्या विवाह निमिताने वृक्षलागवड( कुंडीसह )साठी र.रु.11000 ची देणगी दिल्याबद्दल त्यांचाही ग्रा.पं. वतीने सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी श्री रमेश विटोरे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री रामहरी निकम, लक्ष्मण बळी तर आभारप्रदर्शन सामाजिक कार्यकर्ते दिलीप निकम, प्रशासन अधिकारी यांनी केले. कार्यक्रमास ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**गांवकऱ्यांनी दिली विकास कार्य करण्यास देणगी :** नादरपुर येथे दिनांक 28 रोजी चि . कृष्णा भानुदास निकम व सौ .कां .काव्या( गायत्री ) यांच्या हस्ते श्री भानुदास दगडू निकम वर पिता यांनी लग्नानिमित्त दिलेली देणगी र .रु .11000/– मधून ग्राम पंचायत च्या वतीने लावण्यात आलेले पोस्टल पाम चे 5 मोठे झाडे त्यास सरंक्षण कुंडी तयार करून नव दाम्पत्याच्या हस्ते पूजन करण्यात आले या आगळ्या वेगळ्या प्रसंगी वर पिता यांनी पर्यावरणाचा समतोल राखणे हा पुढील पिढीसाठी आवश्यक असल्याचे सांगितले व त्यासाठी ग्राम पंचायत नादरपूर करीत असलेल्या वृक्षरोपणाच्या कार्यक्रमास मी प्रेरित होऊन गावासाठी काही देणे लागते या हेतूने मुलाच्या लग्नानिमित्त देणगी दिलेली, असून मला माझ्या गावाचा अभिमान असल्याचे त्यांना म्हटले .वृक्षरोपण नव दाम्पत्याच्या हस्ते पूजन कार्यक्रमास सरपंच, उपसरपंच, कार्यकारी मंडळ, ग्रामसेवक, शालेय समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, तंटा मुक्ती समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, वि .वि .का .सोसायटी चे व्हा .चेअरमन, संचालकासह वर व वधू कडील नातेवाईक मंडळी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते .



# राष्ट्रीय कविसंमेलनात प्रकाश क्षीरसागर यांचा सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**पणजी :** मी असे सोडून आले सर्वही गणगोत माझे पण पतीचे बोचणारे लावते मी नाव आता'' या ओळीने रसिकांचे मन हेलावून गेले. निमित्त होते आयएमबीतील कविसंमेलनाचे. ही गझल होती प्रकाश रामचंद्र क्षीरसागर अर्थात सागर शायर यांची. 'इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझा' तर्फे प्रजासत्ताक दिनाच्या अनुषंगाने पणजीतील आयएमबीच्या सभागृहात बहुभाषिक कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी ही गझल सादर केली. यावेळी बबन भगत यांनी 'आयक पुता सांगता तुका भारत भुंयची काण' ही कोकणी कविता सादर केली. रुसी परब या महाविद्यालयीन युवतीनेही आपल्या दोन कविता सादर केल्या. संस्थेचे अध्यक्ष दशरथ परब यांची कविता कालिका बापट यांनी गाऊन सादर केली.वैशाली मोहिते यांनी 'राधे .. तू पुरती कृष्ण झालीस मुरली झालीस' ही मराठी कविता सादर केली. राजस्तानातून आलेल्या प्रो. कलाधर आर्य व श्रीमती मोनिका गौर यांनी आपल्या भाषेतील रंगतदार व गेय कवितांनी बहार आणली. त्यांच्याशिवाय डॉ. ब्रायन मेंडोंसा यांनी इंग्रजीतून व राकेश शर्मा यांनी हिंदीतील आपल्या रचना सादर केल्या. शेतकऱ्यांच्या गळ्याला शेवटी फासच असतो.'भारत एक कृषि आधारित देश है जहाँ किसान की मौत और बाकी भरपेट है' ही कविता सादर केली. रसिक श्रोत्यांनी याही कवितेला दाद दिली. गुलाम गौस अन्सारी याने हिंदीतून तर साजीव पुंथापल्ली यांनी मल्याळम भाषेतील कविता सादर करून रसिकांची मने जिंकली.

# बाजार सावंगी येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** बाजार सावंगी (ताः खुलताबाद) येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा झाला. शैक्षणिक संस्थांच्या विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढली. विविध घोषणा फलक व लेझीम पथक थोर पुरुषांचे वेश परिधान भारत माता प्रति कृती आदींसह गावातील रस्त्यावरून फेरी काढून विविध ठिकाणी ध्वजवंदन संपन्न झाले. बाजार सावंगी पोलीस चौकी तील ध्वजवंदन मुख्य जमादार नवनाथ कोल्हे यांच्या हस्ते झाले जमादार ठोकळ श्री बनसोड संतोष पुंड पोलीस पाटील कारभारी नरवडे तंटामुक्तीचे माजी अध्यक्ष पुंजाजी नलावडे संदीप काटकर गुलाब शिंदे सह ग्रामस्थांची उपस्थिती होती. सहकार सेवा संस्थेचे ध्वजवंदन चेअरमन किशोर नलावडे यांच्या हस्ते झाले सचिव जाधव सदस्य, माणिक राऊत विठ्ठल नलावडे भिकन घुले पंडित नलावडे सह ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामपंचायत कार्यालयाचे ध्वजवंदन सरपंच आप्पाराव नलावडे यांच्या हस्ते झाले उपसरपंच कारभारी नलावडे वसंतराव नलावडे ग्राम विकास अधिकारी ए. बी. बनसोड पोपट काटकर कल्याण काटकर भाजप जिल्हा सरचिटणीस ज्ञानेश्वर नलावडे सचिन नलावडे विलास सोनवणे रामेश्वर नलावडे विनोद नलावडे सय्यद लाल चांद का पठाण हरदास सराटे समीर शहा सचिन गवळी बबन नलावडे दगू सोनवणे गणेश नलावडे यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन श्रीधर पाटील यांनी केले. ज्ञान कुंज कला वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाचे ध्वजवंदन पुंजाजी नलावडे यांच्या हस्ते झाले संस्थाप्रमुख राधाकृष्ण दारकुंडे प्राचार्य योगेश झिंजुर्के कृष्णा नलावडे श्री गंडे मनोज राणे नितीन पवार सर्व प्राध्यापक शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते. सह्याद्री इंग्लिश स्कूलचे ध्वजवंदन पुंजाजी नलावडे यांच्या हस्ते झाले संस्था प्रमुख सतीश सोळंके मुख्याध्यापक योगेश कुचे राजेंद्र सोनवणे सर्व शिक्षक विद्यार्थी पालक उपस्थित होते. रायझिंग स्टार इंग्रजी शाळेचे ध्वजवंदन माजी सैनिक कारभारी नलावडे यांच्या हस्ते झाले संस्थाप्रमुख विश्वंभर नलावडे दीपक काळे संभाजी नलावडे पंचायत समिती माजी उपसभापती प्रभाकर शिंदे सुखदेव नलावडे जानकीराम नलावडे चंद्रभान गंडे सर्व विद्यार्थी शिक्षक उपस्थित होते. गीता बाल विद्यामंदिर व साई पब्लिक स्कूलचे ध्वजवंदन संस्थाप्रमुख किशोर नलावडे यांच्या हस्ते झाले प्राचार्य गिरीधर जाधव संजय नलावडे श्रीमती गंडे सर्व शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलचे ध्वजवंदन माजी सैनिक शेषराव आघाडे यांच्या हस्ते झाले संस्था उपप्रमुख अरुण साळुंखे सर्व शिक्षक विद्यार्थी पालक उपस्थित होते. जिल्हा परिषद हायस्कूल चे ध्वजवंदन मुख्याध्यापक हरिभाऊ दहिफळे यांच्या हस्ते झाले सर्व शिक्षक पालक विद्यार्थी उपस्थित होते. जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे ध्वजवंदन मुख्याध्यापिका विमल दिवेकर यांच्या हस्ते झाले सर्व शिक्षक विद्यार्थी पालक उपस्थित होते. प्राथमिक आरोग्य केंद्रातील ध्वजवंदन वैद्यकीय अधिकारी डॉक्टर अंजुमन निलोफर यांच्या हस्ते झाले. पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी एकचे ध्वजवंदन पशुधन विकास अधिकारी डॉक्टर एस जे विजापूरे यांच्या हस्ते झाले पशुपालक व कर्मचारी उपस्थित होते. महाराजा सयाजीराव गायकवाड कला वाणिज्य विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातील ध्वजवंदन प्राचार्य सुशील निकम यांच्या हस्ते झाले. संजय गायकवाड डॉक्टर सरोज पगारे, जयेश गायकवाड, घोलप, साळुंखे पवार संतोष नलावडेसह पालक उपस्थित होते. वीज वितरण ३३ के व्ही कार्यालयातील ध्वजवंदन प्रदीप काळे यांच्या हस्ते झाले.






काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in